◆ सप्टेंबर २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक नववा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **पुस्तक परिचय** | |
| **व्हाईट मुघल्स** : अनु. सुधा नरवणे | ३० |
| **मृत्यू अमृताचे द्वार - ओशो** : अनु. मीना टाकळकर | ३६ |
| **गांधर्वी** : अनु. मृणालिनी गडकरी | ४२ |
| **आंधळ्याचे डोळे** : अनु. शांता ज. शेळके | ४८ |
| **दीपयोजना** | ५६ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ६४ |
| **पुरस्कार** | ६९ |
| **श्रद्धांजली** | ८० |
| **बालनगरी** | १०० |

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट ! पोस्टेज २०रु.**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### अनुवाद - वाचकांची प्रथम पसंती

कुणी कितीही आधुनिकतेचा आव आणला तरी अजूनही सण-समारंभांचा, धार्मिक, सामाजिक उत्सवांचा माणसांच्या मनावरचा प्रभाव काही कमी होत नाही. कारण मुळातच भारतीय माणूस हा उत्सवप्रिय आहे. गणपती, दसरा, दिवाळी या सणांच्या निमित्तानं उत्साहाचे, आनंदाचे वारे वाहत असतात. मराठी साहित्यक्षेत्रात तर दिवाळी अंकांच्या निमित्ताने कितीतरी आधीपासून नवनिर्मितीला, कल्पकतेला जणू धुमारे फुटत असतात. वेगवेगळे विषय शोधले जातात आणि दिवाळीच्या चमचमीत फराळाप्रमाणेच हे दिवाळी अंक वाचकांची रूची वाढवण्यासाठी सादर केले जातात. निदान प्रत्येकाचा तसा प्रयत्न असतो.

पण खरोखरच वाचकांची रूची नक्की कशात असते? मराठीत निघणाऱ्या किती दिवाळी अंकांना भरघोस प्रतिसाद असतो? आणि नेमका कोणत्या अंकांना हा प्रतिसाद मिळतो? हे प्रश्न मनात डोकावतात. पण हे प्रश्न फक्त दिवाळी अंकांपुरतेच मर्यादित नाहीत. तर वेगाने विस्तारत जाणाऱ्या ग्रंथविश्वाबद्दलही आहेत.

आज जग वेगानं बदलत आहे. त्याप्रमाणे प्रकाशनविश्वही बदलत आहे. जीवनात घडून येणारे सगळे बदल, वेग हे ग्रंथांमध्ये प्रतिबिंबित होत असतात. म्हणूनच साहित्याचा इतिहास लिहिला जातो. अभ्यासालाही जातो. परंतु साहित्यनिर्मिती ज्याच्यासाठी केली जाते त्या वाचकांची रूची हीसुद्धा काळानुसार बदलत जाते. वास्तविक वाचकांच्या रूचीवरच साहित्यातले प्रवाह वळण घेत असतात.

आज वाचकांची रूची कशी आहे, कोणती पुस्तके, कोणते लेखक आणि लेखन त्यांना आवडते, थोडक्यात सध्याचा 'ट्रेंड' काय आहे हे जाणून घेण्यासाठी एक सर्व्हे घेतला या सर्व्हेमध्ये निरनिराळ्या वाचकमंचातील जाणकार रसिक वाचक, लेखक आणि प्रकाशनक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संपादकांचा समावेश होता.

यातून समोर आलेलं चित्र खूपच समाधानकारक आहे. जवळजवळ प्रत्येकाच्या चर्चेत एक मुद्दा समान होता तो म्हणजे आज वाचक सजग झाला आहे. वेळ कमी असल्यामुळं तो मोजकंच वाचतो पण चांगलंच वाचतो.

आज कथा कादंबऱ्यांकडे वाचक वळत नाही. मध्यमवर्गीय जीवन चितारणाऱ्या कौटुंबिक कहाण्यांमध्ये वाचक आता रमत नाही. त्याला वेगळी माहिती देणारी



पुस्तके हवी आहेत. वर्तुळाबाहेरच्या जीवनाचा शोध त्याला हवा आहे. जे जीवन, जे जग माहित नाही त्याचं दर्शन घडवणारी पुस्तकं त्याला हवी आहेत. पूर्वी फक्त इंग्लंड, अमेरिका, युरोप याबद्दलच उत्सुकता असे. परंतु आज सगळ्या जगाबद्दलच उत्सुकता वाढली आहे. आज पाकिस्तानात काय चाललंय, अफगाणीस्तान, जपान, चीन, कोरिया येथे काय चाललंय हे जाणून घ्यायची उत्सुकता आहे. त्यामुळेच पूर्वी कधीच नव्हते एवढे अनुवादित साहित्याचे महत्व वाढले आहे.

तसेच नवीन विषय, नवे प्रयोग याला वाचकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळतो. म्हणूनच 'द दा विंची कोड' या पुस्तकानं आणि त्याच्या मराठी अनुवादानंही विक्रीचे उच्चांक मोडले. मुलांसाठी आम्ही नुकत्याच सादर केलेल्या 'एक पान एक ओळ' या अभिनव पद्धतीनं लिहिलेल्या पुस्तकमालिकेचं सादर होताच प्रचंड स्वागत होत आहे ते यामुळेच.

आज चरित्रं, आत्मचरित्रं वाचली जातात. परंतु त्यातही स्वत:चा उदोउदो करणारी आत्मकथनं वाचली जात नाहीत. आत्मचरित्रातही अनुवादित चरित्रं अधिक वाचली जातात कारण ती अधिक थेट असतात असं वाचकांचं मत आहे.

सत्यकहाण्या आणि खरेखुरे जीवनानुभव व्यक्त करणारी पुस्तकं जास्त वाचली जातात. उदा. सुधा मूर्ती यांची वाइज ॲण्ड अदरवाइज, गोष्टी माणसांच्या ही पुस्तके. तसेच मयादा - इराकची कन्या, द ब्रेडविनर, काबुलीवाल्याची बंगाली बायको, मनातलं अवकाश, एका खेळियाने वगैरे.

माहिती देणारी, व्यक्तिमत्वविकसन, आरोग्यविषयक या पुस्तकांनाही आजकाल मोठा वाचकवर्ग आहे कारण रोजच्या धावपळीच्या, ताणतणावांच्या जीवनक्रमात काहीतरी सुयोग्य बदल व्हावा असं प्रत्येकालाच वाटत असतं आणि त्यासाठीच ही सकारात्मकता जागृत करणारी, मार्गदर्शन करणारी पुस्तके वाचली जातात.

संशोधन करून, परिश्रमपूर्वक लिहिलेली पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर वाचली जातात. विश्वास पाटील यांची 'संभाजी' हे त्याचं मोठं उदाहरण.

पूर्वी लेखकांची एक फळी होती. लेखक म्हटले की खांडेकर, रणजित देसाई, फडके, अत्रे, पु.ल., पेंडसे, माडगुळकर अशी नावं समोर येत असत. आज अशी नावं समोर येत नसली तरी लिहिणारा प्रत्येकजण, जरी त्यानं एकच पुस्तक लिहिलं तरी एका खास पद्धतीनं, नेमकेच लिहितो आहे. मिलिंद बोकील, आशा बगे, अच्युत गोडबोले, डॉ. रणजित मिरजे, माधुरी शानभाग यांचे लेखन याची साक्ष देते.

'विश्वास लायब्ररी' या लोकप्रिय वाचनालयाच्या श्री. देशपांडे यांच्या मते आता प्रकाशकांनीच आपला खास ठसा असा उमटवला आहे की लेखकांच्या नावापेक्षा प्रकाशकांच्या नावाने नवीन पुस्तके वाचली जातात. मेहता, मौज, राजहंस ही नावं पाहूनच वाचक नवी पुस्तके हातात घेतात. आणि सर्वात महत्वाचा बदल

म्हणजे आता वाचक सर्व प्रकारची पुस्तके वाचतात. हा बदल फारच आनंददायी आहे.

प्रत्येकाच्या चर्चेतून एका गोष्टीवर एकमत झाले ते म्हणजे अनुवादित साहित्याबद्दल वाचकांचे वाढलेले आकर्षण. पूर्वी अनुवादित साहित्याकडे तुच्छतेने, उपहासाने पाहिले जाई. पण आता अनुवादाला केवळ मान्यताच नाही तर वलयही प्राप्त झाले आहे. त्यामुळेच विं.दा. करंदीकरांनी नुकताच अनुवादित साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी एक लाख रुपयांचा स्वतंत्र पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे.

अनुवादित साहित्यातून वाचकाला अपेक्षीत आहे ते नव्या, वाढत्या जगाचे विस्तारलेले अवकाश, नवी ओळख आणि समृद्ध जीवनानुभव.

पूर्वी अनुवादाला प्रतिष्ठा नसतानाही आम्ही अनुवादाची कास धरली ती यामुळेच. गेली अनेक वर्षे या नव्या जगाची ओळख अनुवादाद्वारे करून देण्याचे प्रयत्न आम्ही सातत्याने करीत आहोत. वाचकांचाही भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

या सर्व चर्चेतून अजून एक नवीन मुद्दा समोर आला तो म्हणजे आजपर्यंत पुस्तके, टिव्ही, सिनेमा ही माध्यमे एकमेकांची प्रतिस्पर्धी मानली जात होती. तशा चर्चाही वारंवार घडत होत्या. परंतु आता ही माध्यमेही एकमेकांची प्रतिस्पर्धी नसून पूरक आहेत हे लोकांना पटले आहे. म्हणूनच 'द दा विंची कोड' चित्रपटही पाहिला जातो आणि त्याबाबत अधिक समजून घेण्यासाठी पुस्तकही वाचले जाते. 'हॅरी पॉटर'चा फक्त चित्रपट पाहून मुलांचे समाधान होत नाही तर पुस्तकंही तितक्याच अधिरतेने वाचली जातात.

वाचकाची ही सजगता हे या आधुनिक युगाने दिलेले वरदान आहे.


**द मॅजिक ऑफ थिंकींग बिग**

**डेव्हिड श्वार्त्झ**

**अनु. प्रशांत तळणीकर**

भव्य उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य त्या साधनांचा अवलंब करण्याची क्षमता, मोठं यश मिळवण्याची जिद्द याविषयी प्रभावी मार्गदर्शन करणारे पुस्तक.

**२००रु.**
पोस्टेज **२५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# साहित्यवार्ता

### * 'औषधाविना आरोग्य'चे प्रकाशन

ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. रमा आणि डॉ. रवी मराठे लिखित 'औषधाविना आरोग्य' या पुस्तकाचे २ ऑगस्ट रोजी दै. सकाळचे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. पुण्यातील आचार्य अत्रे सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. कार्यक्रमप्रसंगी प्रकाशक सुनील मेहता, पाटील बुक सर्व्हिसचे उमेश व उदय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. मालकर म्हणाले, 'कथा, कविता आणि कादंबऱ्यांप्रमाणे जीवनोपयोगी विषयांवरील पुस्तकनिर्मितीमध्ये सध्या वाढ होत आहे. ही स्वागतार्ह गोष्ट आहे. केवळ वाङ्मयापुरतेच मर्यादित न राहता इतरही आवश्यक विषयांचे पुस्तकरूपाने मार्गदर्शन होणे ही काळाची गरज आहे.'

याप्रसंगी विनिता आपटे यांनी मराठे दांपत्याची प्रकट मुलाखत घेतली.

'लहानपणापासूनच लेखन हा माझा स्थायीभाव बनला. लेखिका म्हणून मेहतांनी प्रकाशात आणले. व्यवसायाने डॉक्टर असले तरी वेदना हा साहित्यनिर्मितीचा

**याप्रसंगी (डावीकडून) श्री. उमेश पाटील, डॉ. रमा मराठे, डॉ. रवी मराठे, संपादक श्री. यमाजी मालकर**

आणि वैद्यकशास्त्राचा केंद्रबिंदू असल्याने हातून लिखाण घडले. याकामी पती डॉ. रवि यांचे उत्तम सहकार्य लाभले, माझ्या लेखनाचे ते सहप्रवासी आहेत.' अशा शब्दांत डॉ. रमा मराठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

'सध्याच्या ताण-तणावाच्या जीवनात औषधाविना निरोगी राहण्याचा मंत्र या पुस्तकातून वाचकांना मिळेल अशी अपेक्षा डॉ. रवी मराठे यांनी व्यक्त केली.

### * 'अ कॉल टू ऑनर' लवकरच मराठीत

माजी परराष्ट्रमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते जसवंतसिंग यांच्या 'अ कॉल टू ऑनर' या वादग्रस्त आत्मचरित्राचा मराठी अनुवाद लवकरच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित होणार आहे. अशोक पाध्ये हा मराठी अनुवाद करीत आहेत.

सदर पुस्तकाचा दिल्लीत प्रकाशन समारंभ झाल्यादिवशीच मराठी अनुवादाचे हक्क 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला मिळाले. अल्पावधीतच मूळ पुस्तकाच्या ४० हजार प्रती खपल्या असून अजूनही पुस्तकाला प्रचंड मागणी आहे.

जसवंतसिंग यांनी या आत्मचरित्रात त्यांच्या प्रदीर्घ राजकीय जीवनातील अनुभवांवर भर दिला असून हे पुस्तक बरेच वादग्रस्तही ठरले आहे. अल्पावधीत प्रकाशित होणाऱ्या या मराठी अनुवादालाही वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळेल अशी खात्री आहे.

### * हृद्य समारंभात महाराष्ट्राच्या महाकवीला ज्ञानपीठ प्रदान

''सामान्यांना समजेल अशा भाषेतील विंदा करंदीकरांच्या कवितांनी मराठी काव्याला वेगळे वळण लावले. जीवनाचा एकात्मिक दृष्टीतून शोध घेणारा प्रकाशमान मनाचा हा अष्टपैलू कवी आहे,'' अशा शब्दांत राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी कविवर्य विंदांचा गौरव करून, त्यांना एकोणचाळिसावा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान केला. मानवी जीवनाची गुंतागुंत आणि विविधता यांचा वेध घेण्याची क्षमता काव्यात असली पाहिजे, हीच आपली काव्यविषयक दृष्टी असल्याचे विंदांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

श्रीफळ-शाल, सरस्वतीची प्रतिमा, प्रशस्तिपत्र आणि पाच लाख रुपये असे ज्ञानपीठ पुरस्काराचे स्वरूप आहे. राष्ट्रपतींनी चंदनाचा टिळा लावून विंदांना पुरस्कार प्रदान केला. 'एक विलक्षण प्रयोगशील कवी' असे विंदांचे वर्णन या प्रशस्तिपत्रात करण्यात आले.

लहान मुलांबद्दल विशेष प्रेमभाव बाळगणाऱ्या राष्ट्रपतींच्या भाषणात विंदांच्या बालकवितांचा उल्लेखही अटळ होता. विंदांनी त्यांचे चिरंजीव उदय यांना लहानपणी मानसिक घुसमटलेपणातून बाहेर काढण्यासाठी लहान मुलांच्या कविता लिहिण्यास सुरुवात केली आणि त्यातून उदय बरे झाले, याची आठवण राष्ट्रपतींनी सांगितली. विंदांनी अंधश्रद्धेविरुद्ध कवितेतून प्रचार केला आणि यंत्रयुगाची व आधुनिकतेची



कास धरली. एवढेच नव्हे, तर त्यांच्या काव्यात 'आकाशगंगा', 'कृष्णविवर' या वैज्ञानिक गोष्टींचे उल्लेखही आढळतात. असे सांगून हा वैज्ञानिक व सदसद्विवेकबुद्धी असलेला कवी असल्याचा उल्लेख डॉ. कलाम यांनी केला. विंदांची काव्यदृष्टी जातपात व धर्मापलीकडे जाणारी, मानवतेची आहे आणि त्यांच्या काव्यात गरिबांबद्दलचा कळवळा आढळतो, असेही राष्ट्रपती म्हणाले.

विंदांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या कवितेमागील भूमिका सांगितली. सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव असलेल्या समाजाचे आपले स्वप्न आहे. या समाजात सर्वांच्या मूलभूत गरजा भागलेल्या असतील, हा शोषणमुक्त समाज असेल व या समाजात अंधश्रद्धा नसेल, असे सांगून विंदांनी 'विज्ञान व तंत्रज्ञान हे मानवी मुक्तीचे साधन आहे,' असे सांगितले. मानवी जीवन विज्ञान व तंत्रज्ञानाने कसे व्यापलेले आहे, असे सांगताना त्यांनी, 'अंगातील शर्ट ही विज्ञानाचीच निर्मिती आहे,' असे उदाहरण देऊन डॉ. कलाम यांच्यासह उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. आपल्या भाषणाच्या अखेरीस त्यांनी त्यांची 'यंत्रावतार' ही कविता मराठीतून म्हटली आणि हा विष्णूचा अकरावा अवतार असल्याचे सांगून पुन्हा टाळ्या मिळविल्या.

या निमित्ताने भारतीय ज्ञानपीठातर्फे विंदांच्या जीवनावरील एक लघुपट दाखविण्यात आला. त्यांच्या कवितांच्या हिंदी भाषांतराचा संग्रह 'अपने ही होने पर'चेही प्रकाशन करण्यात आले.

### * आगामी साहित्य संमेलन नागपुरात

तब्बल ७३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नागपुरात ८० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

यापूर्वी १९३३ मध्ये कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरात साहित्य संमेलन झाले होते. त्यानंतर मात्र जवळपास पाऊण शतकाचा कालावधी होऊनही हा मान नागपुरला मिळालेला नाही. मध्यंतरी अनेकदा प्रयत्न करूनही अडचणींमुळे संमेलन घेण्याची संधी हुकत गेली. साहित्य संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नागपूरच्या साहित्य क्षेत्रातील दिग्गजांचे प्रयत्न यंदा रंग दाखवतील अशी शक्यता निर्माण झाली आहे. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्षपदही नागपुरातच असल्याने या प्रयत्नांना विशेष बळ मिळू शकते, असे वातावरण आहे. यासंदर्भात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी नागपुरात संमेलन घेण्याबाबत हालचाली सुरू असल्याची पुष्टी दिली.

### * शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे- वय वर्षे ८५

''माझ्या जीवनात खूप गंमतीजमती आहेत. आत्मचरित्रासाठी त्यांची कालानुक्रमे

जुळणी करण्यात मी सध्या गुंतलो आहे. जसं आठवतंय, तसं लिहितोय. आठवणींचा पसारा आवरतोय,'' अशा शब्दांत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी जन्मदिनानिमित्त आपल्या भावना व्यक्त केल्या.

शिवशाहिरांनी नागपंचमीस वयाच्या ८५ व्या वर्षात पदार्पण केले. ते म्हणाले, ''आत्मचरित्राकरिता 'देवाशप्पथ खरं सांगेन' असं अगोदर ठरवलेलं नाव चिरंजीव आणि प्रकाशक अमृत पुरंदरेंना पसंत नव्हतं. त्यामुळं आता 'हकीकतनामा' असं नाव देण्याचा विचार आहे. चारशे पानं लिहून तयार आहेत. आयुष्यात डायरी न लिहिण्याची चूक केली. त्यामुळं जसं आठवेल, तसं लिहावं लागतंय. कधी लहानपणचं लिहितोय; तर कधी ७५ वर्षांचा असतानाचं.

सगळंच छापून येईल असं नाही. जे उरेल, ते पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडेल. निसर्गानं माझ्यावर सक्तीची निवृत्ती लादलीय. नाहीतर अजूनसुद्धा किल्ला चढावासा वाटतो. पण मग कळतं, की आता भटकंती शक्य नाही. आता शरीर थकलंय.

व्याख्यानं देणं मी बंद केलंय. लोक प्रेमानं बोलवतात, हे खरंय; पण ८४ वर्षांचं झाल्यावर फिरणं अवघड आहे. लोकसंस्कृती हळूहळू लुप्त होतेय, याची खंत वाटते'' असे ते म्हणाले.

### * खाशाबांच्या स्मृतीस पाठ्यरूपाने उजाळा...

भारताने पहिले व महाराष्ट्राचे एकमेव ऑलिंपिक पदक विजेते खेळाडू खाशाबा जाधव यांच्या चरित्राचा इयत्ता नववीच्या मराठी पाठ्यपुस्तकात समावेश करण्यात आला आहे. गेले वर्षभर खाशाबा जाधव प्रतिष्ठानकडून या ऑलिंपिकपदक विजेत्याचा पाठ्यपुस्तकात समावेश करावा म्हणून पाठपुरावा केला जात होता. अखेर शालेय शिक्षण व क्रीडामंत्री वसंत पुरके यांनी जातीने लक्ष घातल्यामुळे विस्मृतीत गेलेल्या ऑलिंपिकवीराच्या स्मृतीस उजाळा मिळाला.

कुस्तीगीर खाशाबा यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिपिंकमध्ये इतिहास घडवताना भारताला पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक मिळवून दिले होते. मराठमोळ्या मल्लाची ही संघर्षपूर्ण कहाणी प्रत्येक भारतीयाला प्रेरणादायी ठरणारी आहे. लेखक संजय दुधाणे यांच्या 'ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव', या पुस्तकामधून हा पाठ घेण्यात आला आहे. अभ्यासक्रम बदलण्याची प्रक्रिया सुरू असताना राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी योग्य दखल घेत खाशाबांना न्याय मिळवून दिला.

बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर, लिटिल मास्टर सुनील गावस्कर, धावपटू भाग्यश्री बिले यांच्या यशाच्या कहाणीचा मराठी पाठ्यपुस्तकात समावेश आहेच. आता खाशाबांचाही पाठ अभ्यासक्रमात आल्यामुळे ग्रामीण भागातील एका जिद्दी खेळाडूने मारलेली ऑलिंपिक भरारी मराठी मनात कायमची कोरली जाईल.



सरावाच्या अपुऱ्या सुविधा, मार्गदर्शनाचा अभाव आणि गरीब परिस्थिती. अशा सर्व प्रतिकूल वातावरणात खाशाबाने जे यश मिळवले ते विद्यार्थ्यांना प्रेरणादायक ठरेल. हेलसिंकी ऑलिंपिकसाठी त्यांची निवड झाल्यानंतर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एकदोन रुपये गोळा करून उभारलेली वर्गणी आणि ऐन ऑलिंपिकमधील कुस्त्यांचा थरार हे सर्वच स्फूर्ती देणारे आहे.

### * वृत्तपत्रांमधील स्पर्धा हानिकारक- जोशी

भारतातील वृत्तपत्रे राष्ट्रीय की क्षेत्रीय या वादात सापडली आहे. जागतिकीकरणाच्या या काळात वृत्तपत्रातील स्पर्धांमुळे नीतीमूल्यांचा ऱ्हास होत असून, विश्वसनीयताही कमी होऊ लागल्याची खंत व्यक्त करत प्रसारमाध्यमे आजही स्वतंत्र असून देशाच्या विकासाला दिशा देण्यास सक्षम आहेत. स्वत:ला काही मानदंड घालून वाटचाल केल्यास पत्रकारितेची उंची वाढण्यास मदत होईल, असे प्रतिपादन कुशाभाऊ ठाकरे पत्रकारिता विश्वविद्यालयाचे कुलपती सच्चिदानंद जोशी यांनी यांनी केले.

राष्ट्रीय पत्रकारिता कल्याण न्यास, दिल्ली यांच्या वतीने पुण्यात आयोजित कै. बाबूराव लेले स्मृती समारोह सोहळ्यात 'जागतिकीकरण व भारतीय प्रसारमाध्यमांसमोरील आव्हाने' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी दै. 'केसरी'चे संपादक दीपक टिळक यांच्या हस्ते स्मृती पुरस्कार चं. प. भिशीकर यांना, महिला पत्रकार पुरस्कार दै. 'लोकसत्ता'च्या शुभदा चौकर, तर छायाचित्रकार पुरस्कार जयंत हरकरे यांना देण्यात आला. या कार्यक्रमास न्यासाचे अध्यक्ष श्री. घटाटे, श्रीकांत जोशी, दशरथ पारेकर, प्रसाद ठाकूर आदी उपस्थित होते.

जागतिकीकरणाच्या रेट्यात भारतात अनेक समस्या व आव्हाने उभी राहिली आहेत. या आव्हानांना स्वीकारून विकासाला निश्चित दिशा देण्याचे काम वृत्तपत्रांचे आहे. अशा काळातही भारतीय वृत्तपत्रात विरोधाभासच दिसून येत आहे. आजकालची पत्रकारिता ध्येयवादी न राहता ती व्यावसायिक झाली आहे. संपादक पदाऐवजी व्यवस्थापकालाच अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे व्यापार व व्यवहार या आधारावरच भारतीय वृत्तपत्रांचीच चाटचाल सुरू आहे. ती निश्चितच वृत्तपत्र सृष्टीसाठी घातक ठरणारी आहेत, असे मत श्री. जोशी यांनी व्यक्त केले.

प्रारंभी समारोह समितीचे अध्यक्ष बापूसाहेब पुजारी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास माधव गांगुर्डे, हरिभाऊ मिरासदार, चिंतामणी लेले, बबन गोरे, डॉ. वाय. के. शिंदे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### * 'सत्यजित रे' वेबसाईटवर

केवळ बंगालीत चित्रपट निर्मिती करूनही दिग्दर्शीय कौशल्याने जगाला मोहिनी घालणारे ऑस्कर विजेते भारतीय दिग्दर्शक सत्यजित रे यांच्यावर वेबसाइट

सुरू होत आहे. भारतासह परदेशी चित्रपट अभ्यासक-समीक्षकांनाही पर्वणी ठरेल, अशी ही स्वतंत्र वेबसाइट २६ ऑगस्ट रोजी सुरू झाली. रे यांचा गाजलेल्या 'पाथेर पांचाली' हा २६ ऑगस्ट १९५५ रोजी प्रदर्शित झाला होता आणि त्या तारखेचे औचित्य साधत त्यांचे पुत्र संदीप रे ही वेबसाइट सुरू करत आहेत. worldofray.com या नावाची ही वेबसाइट दर दोन-तीन महिन्यांनी अपडेट केली जाईल, असे संदीप रे यांनी सांगितले.

जगभरातील दिग्दर्शकांना त्यांच्या चित्रपटांबद्दल कुतूहल आढळते. बंगाली चित्रपटसृष्टीचे असूनही रे यांच्या चित्रपटांना जागतिक प्रेक्षकांनी पसंती दिली. ३७ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी ३६ चित्रपट बनविले. 'लाइफटाइम अचिव्हमेंट'साठी ऑस्कर पटकावणारे ते एकमेव भारतीय होते.

त्यांच्या कारकीर्दीची माहिती देणाऱ्या काही वेबसाइट सध्या आहेत. पण त्या फक्त जुजबी माहिती देतात, असे संदीप रे म्हणाले. १९९३ साली रे यांच्या सर्व कलाकृती जतन करण्यासाठी संदीप रे यांनी 'रे सोसायटी' स्थापन केली आणि अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर्सशी टायअप केले.

वेबसाइटवर त्यांच्या चित्रपटांखेरीज, त्यांची महत्त्वाची कागदपत्रं, शूटिंग स्ट्रिप्स, दुर्मिळ फोटो, अशी माहिती असेल. ही वेबसाइट इंटरॲक्टिव्ह असेल. सत्यजीत रे यांची १९६४ मध्ये दिग्दर्शित केला. 'चारूलता' ही सगळ्यात आवडती कलाकृती होती. त्याबद्दल ते हळवे होऊन बोलत असत. संदीप रे यांनी मात्र रे यांच्या शेवटच्या तीन चित्रपटांपैकी 'आगंतुक'ला पसंती दिली आहे.

## * डॉ. नरेंद्र जाधव पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्त

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधच यांची निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. डॉ. जाधव पुणे विद्यापीठाचे १७ वे कुलगुरू असून डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यानंतर कुलगुरुपदी विराजमान होणारे दुसरे अर्थतज्ज्ञ आहेत. डॉ. जाधव सूत्रे स्वीकारणार त्या दिवसापासून पाच वर्षे पदावर राहतील.

डॉ. जाधव (वय ५३) सध्या रिझर्व्ह बँकेचे प्रधान आर्थिक सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यकारी संचालकाच्या पदावर कार्यरत आहेत.

डॉ. जाधव यांच्या व्यतिरिक्त रसायनशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक डॉ. श्रीधर गद्रे, 'स्कूल ऑफ हेल्थ सायन्स'चे डॉ. भूषण पटवर्धन आणि नगर येथील 'न्यू आर्टस् सायन्स'चे प्राचार्य व गणिताचे ज्येष्ठ अध्यापक डॉ. सर्जेराव निमसे यांच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. मावळते कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांची पाच वर्षांची मुदत २५ फेब्रुवारी २००६ रोजी संपली. नव्या कुलगुरूंची निवडप्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे 'यशदा'चे महासंचालक रत्नाकर



गायकवाड यांची पुणे विद्यापीठाचे हंगामी कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी सुमारे पाच महिने हे पद सांभाळले. एवढा प्रदीर्घ काळ प्रभारी कुलगुरुपद सांभाळणारे ते पहिलेच असावेत.

पहिल्या कुलगुरूंची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांत नव्या कायमस्वरूपी कुलगुरूंची निवड व्हावी लागते. त्यानुसार पाच महिन्यांनंतर पुणे विद्यापीठाला नवा कुलगुरू मिळाला आहे.

कुलगुरू निवड समितीत प्रारंभी बी. जी. देशमुख व डॉ. विजय भटकर यांचा समावेश होता; परंतु दोघांनीही निवड समितीचे राजीनामे दिले. त्यामुळे निवडप्रक्रिया लांबली. निवडप्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची नियुक्ती करण्यात आली.

## * नाझी राजवटीचा इतिहास उपलब्ध

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नाझी भस्मासुराने लक्षावधी ज्यूंचे हत्याकांड घडवून आणले, याच्या भीषण कथा या होरपळीतून सुदैवाने बचावलेल्यांच्या आठवणींतून, मुलाखतींमधून आणि वार्तांकनाद्वारे जगासमोर आल्या; परंतु या काळ्याकुट्ट कालखंडाचा अधिकृत इतिहासच आता उपलब्ध होणार आहे. आजवर गोपनीय ठेवण्यात आलेल्या नाझींच्या फायली अभ्यासकांसाठी खुल्या करण्यात येणार असून त्यासंबंधीच्या तरतुदींना मान्यता देण्याचा निर्णय जर्मन सरकारने घेतला आहे. नाझी अत्याचाराच्या वरवंट्यातून सुदैवाना बचावलेल्या अनेक व्यक्ती आता वयस्कर आहेत. आपल्या गमावलेल्या नातलगांचा, प्रियजनांचा अंत ज्या परिस्थितीत झाला, त्याचा इतिहास विस्मृतीत जाऊन नये, अशी त्यांपैकी अनेकांची इच्छा होती. त्यांनी जर्मन सरकारकडे तशी मागणीही केली होती. आता या निर्णयामुळे ती पूर्ण होत असून, इतिहासातील काही अंधारे कोपरे यामुळे प्रकाशात येतील.

## * चिनी, स्पॅनिश शिकण्यासाठी झुंबड!

परदेशी भाषेत नैपुण्य मिळवणे हा चांगला करिअर ऑप्शन आहे, याची वाढती जाणीव विद्यार्थ्यांना होऊ लागली आहे. तो एक पूर्णवेळ करिअर ऑप्शन होऊ शकतो, हे गेल्या चार वर्षांत सिद्ध झाले आहे.

जर्मन, फ्रेंच, जपानी या भाषा शिकण्याकडे जनरेशन नेक्स्टचा कल काही वर्षे होता. पण आता सुपरपॉवर होणाऱ्या चीनकडे आणि पर्यायाने त्या भाषेकडे अनेकांचे लक्ष गेले आहे. मुंबईत ही भाषा शिकण्याच्या सोयी फार नाहीत. पण रुईया कॉलेजने चिनी, स्पॅनिश, जर्मन आणि जपानी भाषा शिकवण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन केला आहे. येथे प्रवेशाला कोणतीच अट नाही. तेथे चिनी शिकवणाऱ्या रिचा सिंघल यांच्या मते ही भाषा क्लिष्ट असली तरी शिकणाऱ्यांची संख्या वाढते आहे. त्या म्हणाल्या, 'अनेक चिनी कंपन्या भारतात येत आहेत.

भारतीय उद्योजकांनीही चीनचा रस्ता धरला आहे. यामध्ये भाषेची अडचण सर्वात मोठी आहे. एखाद्या विषयामधील ग्रॅज्युएशनसह तुम्हाला चिनी येत असेल तर कोणत्याही कंपनीत तुम्हाला हसत संधी दिली जाते.'

स्पेन ही युरोपियन युनियनमधील सर्वात वेगाने वाढणारी इकॉनॉमी. अमेरिकेतही बऱ्याच ठिकाणी या भाषेचा वापर होतो. त्यामुळे पुढच्या काळात स्पॅनिश भाषेला मागणी असेल. रुईयातल्या स्पॅनिशच्या वर्गाला उदंड प्रतिसाद आहे.

परदेशी भाषा शिकल्या की नोकरी, व्यवसायाचे अनेक पर्याय उपलब्ध होतात. वाढत्या जागतिकीकरणामुळे कंपन्यांना दुभाष्या, अनुवादक, दुसऱ्या देशात नोकरीसाठी जाणाऱ्यांना तेथील एटीकेट्स, मॅनर्स, संस्कृती शिकवणारे यांची गरज भासते. तुलनेने अशा तज्ज्ञांची संख्या कमी पडते.

हा व्यवसाय करणाऱ्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते गरज असूनही चांगले लोक मिळत नाहीत. एखाद्या सायन्स प्रोजेक्टचे भाषांतर करायचे असेल आणि तो आर्ट्‌सचा पदवीधर असेल तर त्याचा सर्व शब्दांचे अर्थ नीट समजत नाहीत. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीने एखादी परदेशी भाषा शिकली तर त्याचे करिअर नवी उंची गाठू शकते.

## * बेल्जियममधील महोत्सवात 'चौक' नाटकाचे अभिवाचन

मकरंद साठे लिखित 'चौक' या नाटकाचे फ्रेंचमध्ये भाषांतर होणार असून, बेल्जियममधील 'बोझार' या राष्ट्रीय मुक्त कला केंद्रातर्फे त्याचे अभिवाचन सादर करण्यात येणार आहे.

''ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत बेल्जियममध्ये 'इंडियन फेस्टिव्हल' सादर होणार आहे. यामध्ये भारतीय भाषांमधील तीन नाटकांची निवड करण्यात आली असून, त्यात निवड झालेले 'चौक' हे एकमेव मराठी नाटक आहे. बेल्जियम आणि फ्रान्समधील 'लिल' या ठिकाणी नाटकाचे अभिवाचन होणार आहे.''

नंदिता वागळे सध्या मराठीतील 'चौक'चे भाषांतर फ्रेंचमध्ये करीत असून, लिंडा लुकोविझ या प्रख्यात नाट्यलेखिका त्याचे बोली भाषेत रूपांतर करणार आहेत. नाट्यविषयाची माहिती त्यांना व्हावी, या उद्देशाने मकरंद साठे बेल्जियमला रवाना होणार असून, लिंडा लुकोविझ यांच्यासोबत त्यांची कार्यशाळा होणार आहे.

'क्वीन क्वेनाल' या नाट्य समूहातर्फे 'चौक'च्या फ्रेंच अनुवादाचे अभिवाचन केले जाणार असून, त्यानंतर त्याचा रंगमंचीय आविष्कार तेथे सादर होण्याचीही शक्यता आहे.

## * श्री. ना. पेंडसेंची लोकमान्यांवर कादंबरी

जनस्थान पुरस्कारविजेते श्री. ना. पेंडसे यांनी लोकमान्य टिळकांना आदरांजली अर्पण केली आहे... वयाच्या ९४ व्या वर्षी कादंबरी लिहून! कुमारवयापासून हृदयाला साद घालणाऱ्या टिळकांवरील कादंबरी हातावेगळी झाल्याने एकीकडे अतिशय आनंद वाटतो आहे, तर दुसरीकडे थकवाही जाणवतो आहे... श्री. ना. सांगत होते आणि मनाला मोहिनी घालणाऱ्या टिळक चरित्राचे स्मरण करीत होते...

श्री. ना. सांगत होते, ''वयाच्या चौदाव्या वर्षीच टिळक चरित्रामुळे मी भारावून गेलो. नवथर वय ते. त्या वेळी या भारावण्यामागे होती ती केवळ भावना. वय वाढत गेले तसतशी भावनेची जागा विचाराने घेतली. टिळकांवर कादंबरी लिहिण्याचा निश्चय अधिकच दृढ होत गेला. अन्य विषयांवर माझे कादंबरीलेखन सुरू असे. पण टिळकांचा विषय डोक्यातून जात नसे. लेखनाच्या धकाधकीत त्यांच्या चरित्राचा अभ्यास करायला निवांत वेळ मात्र मिळाला नाही. वय झाले आणि आता ही कादंबरी आपण लिहूच शकणार नाही, असेही वाटू लागले.''

या वर्षीच्या जानेवारीत पुण्याला गेलेल्या श्री.नां.ना लोकमान्यांची अभ्यासाची खोली पाहायची होती. गायकवाडवाडा तर नवे रूप ल्यालेला; पण अभ्यासिका, मंडालेच्या कोठडीचे प्रतीकरूप तयार! प्रा. ग. प्र. प्रधान आणि माधव वैद्य श्री.नां.ना तेथे घेऊन गेले. टिळकांवर लिहायचे राहूनच गेले, अशी खंत श्री.नां.नी व्यक्त केली. मात्र, प्रधान मास्तर पुढे झाले. लागेल ती मदत करतो, पण तुम्ही लिहा, अशी गळ त्यांनी घातली. दादर सार्वजनिक वाचनालयाच्या माहीम शाखेने संदर्भसाहित्य उपलब्ध करून दिले अन् ९४ वर्षांचे श्री. ना. पुन्हा लिहिते झाले.

## * ना. सी. फडकेंच्या लघुकथा लवकरच चार खंडांमध्ये

ना. सी. फडके यांच्या साहित्यातील समग्र लघुकथा वाङ्मय चार खंडात प्रकाशित करण्यात येणार आहे.

फडके यांनी लिहिलेल्या सुमारे दोनशे कथा आणि ७५ अनुवादित कथा यांचा समावेश या चार खंडांमध्ये असेल. त्याचप्रमाणे 'लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र' या ग्रंथाचा समावेशही या लघुकथा वाङ्मयात करण्यात येणार आहे. के. ज. पुरोहित यांनी त्याची प्रस्तावना लिहिली आहे.

सुमारे तीन हजार पाचशे पानांच्या या चार खंडांची किंमत तीन हजार रुपये असून, प्रकाशनपूर्व सवलत योजनेत हे खंड अवघ्या बाराशे रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रकाशनपूर्व सवलतीची मुदत एक सप्टेंबरपर्यंत आहे.

## * तंत्रज्ञानातून साधावी गावांची उन्नती

''ग्रामीण भागातील लोकांच्या अन्न, पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत गरजा पूर्ण झाल्या, तरच तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग झाला म्हणता

येईल. ग्रामीण जनतेच्या उन्नतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असून, 'इस्रो'चाही तोच प्रयत्न आहे,'' असे मत भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) अध्यक्ष जी. माधवन नायर यांनी व्यक्त केले.

लोकमान्य टिळक यांच्या ८६ व्या पुण्यतिथीनिमित्त लोकमान्य स्मारक ट्रस्टतर्फे विश्वस्त डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते श्री. नायर यांना 'टिळक सन्मान पारितोषिक' प्रदान करण्यात आले. श्री. नायर यांच्या पत्नी राधाकुमारी नायर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षा प्रभा राव, ट्रस्टचे विश्वस्त रोहित टिळक आदी या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

'सर्व पुणेकरांना माझा मन:पूर्वक नमस्कार' अशी मराठीतून भाषणाची सुरुवात करून 'टिळक स्मारक पुरस्कार' हा 'इस्रो'तील सहकाऱ्यांच्या समर्पित वृत्तीमुळेच मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तंत्रज्ञानाचा वापर सर्वसामान्यांसाठी हे भविष्यकाळातील प्रगतीचे सूत्र असले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''आजही देशातील बहुसंख्य जनता खेडेगावात राहते. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करता येऊ शकतो. एज्युसॅट उपग्रहाद्वारे देशातील तीन हजार शाळा जोडण्यात आल्या असून, देशातील कानाकोपऱ्यात आरोग्य सुविधा त्वरेने उपलब्ध व्हाव्या, यासाठी 'टेलि-मेडिसीन' उपक्रमाला चालना देण्यात येणार आहे.''

'इस्रो'मध्ये काम करण्याची मिळालेली संधी म्हणजे देवाने पदरात टाकलेले दान आहे, असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, ''विविध क्षमतांचे 'सॅटेलाईट' विकसित करण्यापासून त्याच्या उड्डाणापर्यंतची सक्षम यंत्रणा 'इस्रो'मध्ये आहे. आगामी काळात जगातील सर्वोत्तम अवकाश संशोधन केंद्र म्हणून 'इस्रो' नावारूपाला येईल.'' असा विश्वास नायर यांनी व्यक्त केला.

राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम आणि जी. माधवन नायर यांच्या कार्यपद्धती एकसारख्या असल्याचे गौरवोद्गार डॉ. वसंत गोवारीकर यांनी काढले. त्यांच्या समर्पित कार्यशैलीला मिळालेला हा सन्मान योग्यच असल्याचे त्यांनी सांगितले.

'लोकमान्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व', 'कॉन्ट्रिब्युशन ऑफ लोकमान्य टू इंडियन स्टडीज', 'रिव्होल्युशनरी महाराष्ट्राज सिलेक्टिव्ह क्रोनोलॉजी', 'केसरीकरांच्या पाच पिढ्या' या चार पुस्तकांचे आणि ऋग्वेदाच्या 'दृक्‌श्राव्य' सीडीचे प्रकाशन या प्रसंगी करण्यात आले.

### * पालक आणि शिक्षकांसाठी 'शिकता-शिकविता' व्हीसीडी

मुलांना वाढविण्याची, शिकविण्याची, त्यांना वळण लावण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षक आणि पालकांचंही मुलांसोबत वाढणं असतं. मुलांच्या भावना समजून घेऊन, त्यांना नाराज न करता त्यांचं व्यक्तिमत्त्व कसं खुलवावं, हे



उदाहरणांच्या माध्यमातून शिकविणारा लघुपट क्लायडोस्कोप कम्युनिकेशन्सने तयार केला आहे. मुलांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या आणि गरवारे बालभवनच्या संचालिका शोभा भागवत यांच्या हस्ते पुण्यात नुकतेच क्लायडोस्कोप कम्युनिकेशन्सच्या 'शिकता-शिकवता' या व्हीसीडीचे प्रकाशन झाले.

व्हीसीडी पाहणारे पालक आणि शिक्षक या लघुपटातील प्रसंगामध्ये स्वत:ला पाहू शकतील. शिवाय, असे वागू नका, असा पोकळ सल्ला या व्हीसीडीमध्ये नाही तर त्याऐवजी मुलांच्या भावना समजून घ्या, त्यांच्या मागण्यांना नकार देण्याऐवजी त्यांना वेगळे पर्याय द्या, त्यांच्या कृतीला चांगले किंवा वाईट म्हणा पण मठ्ठ, विसराळू अशी लेबल मुलांना जोडू नका. मुलांवरचा राग व्यक्त करा पण योग्य पद्धतीने आणि ती पद्धत कशी योग्य आहे, हे मुलांनाही पटवून द्या, असे घरात आणि शाळेत रोज घडणाऱ्या प्रसंगांमधून ही व्हीसीडी आपल्याला सांगते. मुलांना वाढविण्यातला एक महत्त्वाचा साथीदार म्हणून ही व्हीसीडी पालक आणि शिक्षकांची मार्गदर्शक बनू शकते.

या व्हीसीडीची किंमत १५० रुपये असून त्यात देवकी दफ्तरकार आणि रोहिणी केतकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ही व्हीसीडी पुण्यात कर्वेरोड वरील अलूरकर म्युझिक शॉप व डेक्कन जिमखान्यावरील पॉप्युलर बुक स्टोअर्स येथे उपलब्ध आहे.

### * 'जगावेगळे छांदिष्ट'चे प्रकाशन

जगण्याचे सुंदर भान मिळालेली छांदिष्ट मंडळी इतरांचे नीरस जीवनही निश्चितपणे आनंदी करतील, अशा शब्दांत 'लोकसत्ता' पुणेचे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी छांदिष्टांचा गौरव केला.

'लोकसत्ता'चे मुख्य उपसंपादक आणि लेखक श्रीकांत ना. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'जगावेगळे छांदिष्ट' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संगोराम बोलत होते.

जगण्याचे भान ज्यांना आले आहे; असे अनेक छांदिष्ट आपल्याला भोवताली दिसतील. त्यांचा चेहरा नेहमीच आनंदी असतो. म्हणूनच दुर्मुखलेल्या चेहऱ्याने जगणारे लोक पाहिल्यानंतर त्यांनी एखादा छंद जोपासला, तर हे लोक आनंदी होतील, अशी खात्री पटते, असे संगोराम म्हणाले.

एखादा छंद आयुष्यभर जोपासणे ही काही सोपी गोष्ट नाही. छांदिष्ट, नादिष्ट मंडळी मला नेहमीच आवडतात. हे काम छांदिष्टांच्या हातून जे कोणी करून घेतात, त्यांनाच मी या साऱ्याचे श्रेय देतो. माझ्या छंदाचा आनंद मी केवळ एकट्याने घेणार नाही, तर तो इतरांनाही वाटीन, असा छांदिष्टांचा स्वभाव असतो,' असे तेंडुलकर म्हणाले.

## * वडिलांचे कर्तृत्व सांगणारा मी दूत : पंडित हृदयनाथ मंगेशकर

''संगीत तपस्वीच्या घरीच जन्म झाला. जन्मापासून संगीताची देणगी मिळाली. आमच्या वडिलांचे कर्तृत्व मोठे होते, ते जगाला सांगणाऱ्या दूताचे काम आम्ही भावंडे करतो आहोत,'' असे मत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले.

पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीत कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अजय धोंगडे प्रॉडक्शन्सतर्फे आयोजिण्यात आलेल्या 'हे माझे जीवनगाणे' कार्यक्रमात स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते त्यांचा पुणे येथे सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, उषा मंगेशकर, सुवर्ण सहकारी बँकेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर आगाशे, 'आयडिया'चे संजय जोशी आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

हृदयनाथ मंगेशकर यांचा सत्कार झाल्यानंतर 'त्यांचे संगीत ऐकताना वडिलांचे संगीत ऐकल्याचा भास होतो. बाबांचे संगीत तुम्ही कसे घ्यायला शिकलात,' असा थेट प्रश्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी पं. हृदयनाथ मंगेशकर यांना केला. त्याला उत्तर देताना पं. हृदयनाथ मंगेशकर म्हणाले, ''सूर्याच्या प्रकाशाची, हिमालयातून उगम पावणाऱ्या गंगेची आणि साखरेच्या माधुर्याची कारकीर्द मोजता येत नाही. त्याप्रमाणे जन्मच संगीताच्या उदरी झाला आहे. त्यामुळे माझ्या सांगीतिक कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा सत्कार होत असला, तरी या क्षेत्रातली कारकीर्द जन्मापासून सुरू झाली.''

दीदींच्या स्वरांनी सजलेले गाणे कोणालाही इतरांच्या स्वरांमधून ऐकणे सहन होत नाही. त्याचा त्रास होतो, असे मतही त्यांनी या वेळी व्यक्त केले.

## * अरुण कोलटकर... एक मनस्वी कवी!

'अस्मितेला दिवस गेलेत, असं ऐकलं मी, म्हणे चकरा येतात तिला वारंवार आताशा आणि फार हळवी झालीय ती. एवढ्यातेवढ्यानं भावना दुखावतात तिच्या आजकाल'... दिवंगत कवी अरुण कोलटकर यांची ही सामाजिक परिस्थितीवर कोरडे ओढणारी कविता 'अरुण कोलटकरच्या चार कविता' या नव्या कवितासंग्रहातून नुकतीच प्रकाशित झाली आहे. प्रखर अस्मितांवरून दंगली होण्याच्या आजच्या काळातील या कवितेबरोबरच कोलटकरांवर 'डार्क हॉर्स' हे नाटकही आता 'आयुका'मधील रंगमंचावरही लवकरच सादर होतंय.

'अरुण कोलटकरांच्या चार कविता' प्रकाशित करणाऱ्या प्रास प्रकाशनाचे अशोक शहाणे यासंबंधी म्हणाले की, एक मनस्वी कवी म्हणून कोलटकरांमधला तिरकसपणा विलक्षण आहे. 'अस्मितेचे लाड चाललेत, तिचं डोहाळ जेवण घातलं जातंय, तिला मुलगा झालाच तर झोटिंगशहा असं त्याचं नाव ठेवून त्यालाच तख्तावर बसवायला तयार आहेत लोक,' असे खास 'कोलटकरी टच' असणारे बोचरे विनोद 'अस्मिता' या कवितेमधून वाचणाऱ्याला नक्कीच अस्वस्थ करतील.

कोलटकरांच्या या भेदक काव्यात्म दृष्टीवर आधारित गौरी रामनारायण यांनी लिहिलेलं 'डार्क हॉर्स' हे इंग्रजी नाटक कोलटकरांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त आयुकातील चंद्रशेखर सभागृहात सादर करण्यात येत आहे. ललित कला केंद्राचे सतीश आळेकर तसेच ज्येष्ठ रंगकर्मी माधव वझे यांच्या प्रयत्नातून हे नाटक पुण्यात प्रथमच होत असून कोलटकरांची न घेतलेली एक प्रकट मुलाखत हा या नाटकाचा विषय आहे. शहाणे म्हणाले की, यामध्ये कोलटकरांच्या 'चिरीमिरी' या कवितासंग्रहातील काही मराठी कविताही सादर करण्यात येणार आहेत.

## * गदिमा कविता महोत्सव

कविता ही हृदयाची मातृभाषा असते, त्यामुळे तिला चांगली प्रतिष्ठा द्या, असे आवाहन ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांची चिंचवड येथील गदिमा कविता महोत्सवात केले.

चिंचवडच्या एसकेएफ युनियन सभागृहात महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेतर्फे पाचव्या राज्यस्तरीय गदिमा कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. यादव यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले.

गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त श्रीधर माडगूळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वेळी ज्येष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना गदिमा काव्य प्रतिभा पुरस्कार, लोकमान्य रुग्णालयाचे डॉ. नरेंद्र वैद्य यांना गदिमा स्नेहबंध पुरस्कार, लावणी नृत्यांगना मोहना महाळंग्रेकर यांना गदिमा लोककला पुरस्कार, नृत्यभक्ती कलावर्धिनीच्या सई परांजपे, पुण्याच्या ललित रंगभूमीला गदिमा रंगयात्री पुरस्कार व कीर्तिश्री सांस्कृतिक कला केंद्राच्या रवी वाघमारे यांना गदिमा कलाकार पुरस्कार देण्यात आला.

## * पुरातन हस्तलिखिते राष्ट्रीय संग्रहालयात मांडणार

सातव्या शतकातील पवित्र कुराणचे हस्तलिखित तसेच महाभारत, रामायण व गीतेचा अकबरकालात केलेल्या फारसी अनुवादांचा राष्ट्रीय संग्रहालयात आता स्थायी स्वरूपातील हस्तलिखितांचा विभाग तयार करण्यात येणार असून तो दोन महिन्यांच्या आत कार्यरत होईल. त्यामध्ये ५०० पुरातन हस्तलिखिते असतील.

तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, फलज्योतिष, धर्मशास्त्र, इतिहास आणि साहित्य या सर्व विषयांवर लिहिलेली पुरातन हस्तलिखिते या कायमस्वरूपी प्रदर्शनात मांडण्यात येणार असून सर्वसामान्य जनतेलाही आता त्यांचा लाभ घेता येऊ शकेल. पाच वर्षांपूर्वी धार्मिक ग्रंथांची हस्तलिखिते बाहेर काढण्यात आली; कारण ती खूपच खराब झाली होती. त्यांची व्यवस्थित बांधणी करून आता ती पुन्हा प्रदर्शनासाठी सज्ज झाली आहेत. सम्राट अकबरने बदायुनी यांच्याकडून रामायण, महाभारताचा

तर फैजीकडून गीतेचा अनुवाद फारसी भाषेत करून घेतला होता. राष्ट्रीय संग्रहालयाकडे प्राचीन व दुर्मिळ अशा १३५ हस्तलिखितांचा साठा असून देशासाठी ही गौरवास्पद बाब आहे. देशोदेशीची अभ्यासू मंडळी ही प्राचीन हस्तलिखिते पाहण्यासाठी संग्रहालयाला आवर्जून भेट देतात.

## * प्रमोद कर्नाड यांच्या कादंबरीचा कन्नडमध्ये अनुवाद प्रकाशित

गतकालीन ख्यातनाम लेखिका हिरा कर्नाड यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'व्यथाफूल' या मराठी कादंबरीच्या कन्नड अनुवादाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गिरीश कर्नाड नुकतेच धारवाड येथे झाले. श्रीमती सुचेता आष्टेकर यांनी हा अनुवाद केला असून मनोहर ग्रंथमाला या प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशन करण्यात आले.

मूळ कादंबरी 'व्यथाफूल' प्रमोद कर्नाड यांनी लिहिली असून डिंपल पब्लिकेशन्सतर्फे ही प्रकाशित झाली. ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर, मधु मंगेश कर्णिक, रविंद्र पिंगे आदी प्रभृतींनी या कादंबरीचा गौरव केला आहे.

कादंबरीबद्दल बोलताना डॉ. गिरीश कर्नाड म्हणाले, डिस्टेमिनेटेड स्क्रोलोसिससारख्या दुर्धर व्याधीशी झगडत साहित्यलेखन करणाऱ्या हिरा कर्नाड यांचे जीवनचरित्र त्यांचे सुपुत्र प्रमोद कर्नाड यांनी उत्कटतेने मांडले आहे. याचा मराठी अनुवाद सुचेता आष्टेकरांनी समर्थपणे केला आहे.

मराठी आणि कन्नड भाषेतील उत्तमोत्तम साहित्याचे अदान-प्रदान होत आहे, ही एक उल्लेखनीय बाब असून युरोपमध्ये फ्रेंच भाषेतील पुस्तक गाजले तर त्याचा ताबडतोब स्पॅनिश, इंग्रजी, जर्मनी भाषेत अनुवाद होतो. भारतासारख्या अनेक भाषा बोलल्या जाणाऱ्या खंडप्राय देशात विविध भाषेत ह्याच पद्धतीने अनुवाद झाल्यास वाचकांना सर्व भागातील सकस साहित्याचा आस्वाद घेता येईल, असेही डॉ. गिरीश कर्नाड याप्रसंगी म्हणाले. ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित तसेच कन्नड साहित्यातील दिग्गज लेखकांच्या उपस्थितीत व्यथाफूल ह्या मराठी कादंबरीचे कन्नडमध्ये प्रकाशन होत आहे, ही लाखमोलाची गोष्ट असल्याचे मनोगत लेखक प्रमोद कर्नाड यांनी केले. कन्नडमधील ज्येष्ठ कवी चन्नवीर कणवी यांच्यासह अनेक नामवंत साहित्यिक व रसिकांनी खचाखच भरलेल्या ह्या प्रकाशन समारंभाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर ग्रंथमालेच्या डॉ. रमाकांत जोशी यांनी केले.

## * पुणे विद्यापीठात साकारते आहे 'मराठी भवन'

'अमृतातेही पैजा' जिंकणाऱ्या मराठी भाषेचा झेंडा सातासमुद्रापार पोहोचविण्यासाठी पुणे विद्यापीठात मराठी भवन साकार होते आहे. दोन कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे मराठीच्या संवर्धन व संशोधनास चालना मिळणार आहे.

मराठी संस्कृती व साहित्याचे संवर्धन करण्यासाठी मराठी माणसांचे एक विद्यापीठ असावे, अशी ज्ञानपीठ पारितोषिकप्राप्त वि. स. खांडेकर यांची इच्छा



होती. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेचा हाच उद्देश होता. विद्यापीठ स्थापनेपासून अद्याप या 'मराठी भवन' उभारण्याकडे दुर्लक्ष झाले होते. हे स्वप्न आता प्रत्यक्षात लवकरच साकार होणार आहे.

विद्यापीठातील मराठी विभागाजवळ तेरा हजार स्क्वेअर फुटांत हे 'मराठी भवन' उभे राहणार आहे. विद्यापीठाचा विकास आराखडा-२०२० मध्ये या प्रकल्पासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात विविध भाषाघटकांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र कक्ष आहेत. 'भाषांतरमीमांसा', 'लोकसाहित्य', 'भाषाशास्त्र', 'पाश्चात्य साहित्य' अशी स्वतंत्र दालनं असणार आहेत. तसेच 'मराठी भाषेचे स्वतंत्र ग्रंथालय', 'हस्तलिखितांचे ग्रंथालय', 'भाषाशास्त्रासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा' आदी दालने आहेत, अशी माहिती विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रामुख डॉ. अविनाश आवलगावकर यांनी दिली.

## * विश्राम बेडेकर यांच्या आठवणींना मिळाला उजाळा...!

''आत्मशोध वृत्ती, चित्रपटांच्या तंत्राविषयी जाण असणारा, परखडपणा आणि इतरांसह स्वत:चे मूल्यमापन करणारा लेखक,'' अशा शब्दांत लेखक विश्राम बेडेकर यांच्या लेखनकार्यासह त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित विश्राम बेडेकर जन्मशताब्दी कार्यक्रमानिमित्त विविध वक्त्यांनी त्यांच्या लेखनकार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ होते. यावेळी कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, मुंबईच्या रुईया महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख प्रा. मीना गोखले, डॉ. नीलिमा गुंडी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्य परिषदेचे डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले. यावेळी भटकळ यांच्या हस्ते महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

मीना गोखले यांनी विश्राम बेडेकर यांच्या 'एक झाड दोन पक्षी' या आत्मचरित्र पुस्तकाविषयी विवेचन केले. त्या म्हणाल्या की, स्वत:च्या जीवनाकडे तटस्थपणे पाहण्याचा हाच हेतू त्यांच्या या पुस्तकातून स्पष्ट होतो. लेखनामागे आत्मशोधनाची प्रेरणा असल्याचे दिसत असले, तरी पुस्तकाला प्रारंभी खूप मोठी उंची लाभली आहे. बेडेकर यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून एक प्रकारचा चिंतनाचा सूर व्यक्त करून आत्मशोध घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते, असे त्या म्हणाल्या.

## * क्रीडामहर्षी हरीभाऊ सानेंच्या चरित्राचे लवकरच प्रकाशन

वयाच्या शतकाकडे वाटचाल करत असताना अचानक 'आऊट' झालेले क्रीडामहर्षी हरी गणेश उर्फ हरीभाऊ साने येत्या १२ नोव्हेंबर रोजी वयाच्या शंभरीमध्ये पदार्पण करणार होते. त्यानिमित्त त्यांच्यावरील 'संस्थानिक' या नावाच्या

गौरवग्रंथाच्या लेखनास लेखक सविता भावे यांनी सुरुवातही केली होती. या महत्त्वाकांक्षी पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार करण्याचे घटत होते. आता पुस्तक ठरल्यावेळी निघेल. पण अनेकांचे 'सन्मित्र' हरीभाऊ मात्र नाहीत ही हुरहूर मात्र कायम राहील!

हरिभाऊंच्या दुकानासमोरील फुटपाथवर पुस्तके विकून नंतर प्रकाशन व्यवसाय सुरू करणाऱ्या उत्कर्ष प्रकाशनाच्या सुधाकर जोशी यांच्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे हरिभाऊंना वाहिलेली आदरांजलीच आहे. हरी गणेश, क्रीडा महर्षी, साने सर आणि संस्थापक अशा चार भागांत हे पुस्तक लिहिले जात असून त्यामध्ये हरिभाऊंच्या अनेक अज्ञात पैलूंचाही परामर्श घेतला आहे.

'संस्थानिक'मध्ये सुमारे दीडशे जणांच्या हरिभाऊंवरील मुलाखती आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ संगीतकार पं. भास्कर चंदावरकर यांच्यापासून गायक रवींद्र साठे, मूर्तीकार डी. एस. खटावकर, 'केसरी'चे संपादक डॉ. दीपक टिळक, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक, संस्कृतपंडित वसंत गाडगीळ, क्रीडासमीक्षक हेमंत जोगदेव आणि संत नामदेव अध्यासनाचे डॉ. अशोक कामत यांचा समावेश आहे.

## * 'व्यावसायिक रंगभूमीची अवस्था बिकट'

''व्यावसायिक रंगभूमीची आजची अवस्था बिकट आहे. प्रायोगिक रंगभूमीवर साचलेपण आलेय, तर व्यावसायिक रंगभूमीवर गल्लेभरू, दृष्टिहीन प्रवृत्तींचा शिरकाव झाला आहे. जीवनावर भाष्य करणारी नाटके निर्माण होत नाहीत,'' असे मत प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाट्यविभागाचे उद्‌घाटन गोखले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमानंतर गोखले यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली; तीत ते बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे, सुरेशचंद्र पाध्ये, श्रीनिवास भणगे आदी होते. अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार होते. गोखले म्हणाले, ''अभिनेत्याने आपण जे करतो त्यावर विश्वास ठेवला पाहिजे, याची जाणीव मला विजया मेहता यांनी करून दिली. त्यापूर्वी मी अक्षरश: अभिनय विकत होतो. उपजत गुण असतील, तर प्रशिक्षणाने चांगला नट घडू शकतो. नटाला सदैव अभ्यासाची गरज असते. मात्र, सध्या प्रथितयश नटांचाही अभ्यास दिसत नाही. त्यांच्या आकलनाविषयी मला शंका वाटते. नुसते नाट्यविभाग उघडून उपयोग नाही. अभिरुचीसंपन्न तरुण प्रेक्षक घडवला पाहिजे.''

प्रा. मिरासदार यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. देशपांडे यांनी स्वागत केले. डॉ. माधवी वैद्य यांनी सूत्रसंचालन केले.



## * पुणे विद्यापीठातील तत्त्वज्ञानविषयक खजिना आता डिजिटल स्वरूपात

रेने, कान्ट यांच्यासह जगभरातील संशोधकांची पुस्तके, इंडियन फिलॉसॉफिकल क्वार्टरली, परामर्श आदी नियतकालिकांमधील तत्त्वज्ञानाचा खजिना आता जगभरातील अभ्यासकांसाठी खुला होणार आहे. या शब्दसंपदेचे 'डिजिटलायझेशन' करण्याचा प्रकल्प पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाने हाती घेतला असून त्यासाठी निधिसंकलनाचे आव्हान विभागापुढे उभे आहे.

मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेत तत्त्वज्ञानविषयक नियतकालिकांचे प्रकाशन, संपादन या विभागातर्फे केले जाते. २५ वर्षांहून अधिक काळ अशी स्वतंत्र शैक्षणिक त्रैमासिके चालविणारा हा एकमेव विभाग आहे. केवळ भारतामधीलच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील तत्त्वज्ञानविषयक संशोधकांमध्ये या विभागाच्या माध्यमातूने समन्वय साधला गेला आहे. शैक्षणिक नियतकालिके प्रकाशित करण्यासाठी प्रतिवर्षी इंग्रजीसाठी दहा हजार रुपये व मराठी-हिंदी भाषांना मिळून दहा हजार रुपये, एवढेच अनुदान उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळेच विभागातर्फे स्वतंत्र देणगी निधी उभारण्यासाठी अथक प्रयत्न करावा लागतो. विभागातील प्राध्यापकवर्ग विनामोबदला व सेवाभावी वृत्तीने या नियतकालिकांचे काम करीत आहेत, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. शरद देशपांडे यांनी दिली.

इंटरनेटच्या युगामध्ये हा खजिना जगभरातील अभ्यासक, संशोधकांसाठी खुला व्हावा, यासाठी विभागातील तत्त्वज्ञानविषयक पुस्तकांचे 'डिजिटलायझेशन' करण्याची योजना हाती घेण्यात आली.

## * 'आनंदयात्रा' एका जातिवंत छायाचित्रकाराची

व्यवसायाने पॅथॉलॉजिस्ट असूनही छायाचित्रणाचा छंद जातिवंतपणे जोपासणारे डॉ. श्रीनिवास गोखले यांच्या 'आनंदयात्रा' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नुकताच पुण्यात संपन्न झाला.

पुस्तकाचे प्रकाशन एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक सदा डुंबरे होते.

हिमालयापासून केरळपर्यंतच्या आपल्या भटकंतीतील निवडक अप्रतिम छायाचित्रांचा संग्रह 'आनंदयात्रा' या पुस्तकात आहे. विशेष म्हणजे कुठल्याही प्रकाशकाची मदत न घेता डॉ. गोखले यांनी हे पुस्तक स्वत:च प्रकाशित केले आहे. चित्रकलेची आवड, सौंदर्यदृष्टी आणि भटकंतीचा ध्यास या मिश्रणातून डॉ. गोखले यांची फोटोग्राफी बहरली. 'ही सृष्टी ज्याने घडवली आहे ती किती सुंदर आहे, आपण त्याचे रसग्रहण करायला कमी पडतो. अवतीभवती बऱ्याच सुंदर गोष्टी असतात, त्यांना विशिष्ट चौकट दिल्यास त्या नक्कीच भावतील ही डॉक्टर गोखल्यांची धारणा.'

या पुस्तकाचे मूल्य तीनशे पन्नास रुपये असून डॉ. गोखले यांना (०२०) २५४३५०९८ या क्रमांकावर प्रत्यक्ष संपर्क साधल्यास पुस्तक मिळू शकेल.

*** ग्रंथसंपादन आणि प्रकाशन यावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ पुणे विद्यापीठाच्या वतीने मान्यताप्राप्त ग्रंथसंपादन आणि प्रकाशन यावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे नियोजन करत आहे.

विद्यापीठ स्तरावरील हा कदाचित पहिलाच अभ्यासक्रम असून याबाबत नुकताच पुणे विद्यापीठ आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या संयोजक समितीमध्ये डॉ. किरण ठाकूर (प्रमुख, संज्ञापन व वृत्तविद्या विभाग, पुणे विद्यापीठ), डॉ. ए. डी. शाळीग्राम (कुलगुरुंचे प्रतिनिधी), श्री. शरद गोगटे (माजी अध्यक्ष, अ.भा. मराठी प्रकाशक संघ) आणि श्री. विश्वास दास्ताने (अध्यक्ष, अ.भा. मराठी प्रकाशक संघ) असून श्री. अविनाश पंडित अभ्यासक्रमाचे संयोजक आहेत.

१ ऑक्टोबर २००६ पासून सुरू होणारा हा अभ्यासक्रम सहा महिने असेल. या अभ्यासक्रमाची व्याख्याने शनिवारी दुपारी व रविवारी सकाळी संज्ञापन व वृत्तविद्या विभाग, पुणे विद्यापीठ, रानडे इन्स्टिट्यूट, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, पुणे येथे होतील.

संपूर्ण अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रु. ५,०००/- असून ते अभ्यासक्रमाच्या सुरुवातीला पूर्ण भरावे लागेल. हे शुल्क परत करण्यात येणार नाही. परीक्षेचे शुल्क वेगळे राहील. हा अभ्यासक्रम स्वयंनिर्वाही आहे.

या अभ्यासक्रमाचे चार विषय असतील : प्रकाशन व्यवसायाचा परिचय, ग्रंथसंपादन, ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रसार. याचे माध्यम इंग्रजी असून परीक्षेत उत्तरे मराठीत लिहिण्याची मुभा राहील. प्रत्येक विषयाला दोन श्रेण्यांक असतील.

या अभ्यासक्रमासाठी इच्छुक व्यक्ती कोणत्याही शाखेतील पदवीधर असाव्यात किंवा त्यांच्याकडे वृत्तपत्रविद्या/मुद्रण तंत्रज्ञान याची पदविका असावी किंवा ISBN चे रजिस्ट्रेशन असणाऱ्या प्रकाशनगृहातील संपादन, निर्मिती अथवा विक्री यापैकी कोणत्याही क्षेत्रातील तीन वर्षांचा अनुभव असावा. संगणकाचे प्राथमिक ज्ञान आवश्यक. प्रवेश इच्छुकांनी इंग्रजी/मराठी भाषा कौशल्य, सांख्यिकी कौशल्य आणि सामान्य ज्ञान यांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

प्रवेशासाठी कोरे अर्ज खाली दिलेल्या पत्त्यावरून प्रत्यक्ष रोख किंवा डी.डी.द्वारे रु. १२५/- भरून मिळतील. बाहेरगावच्या उमेदवारांनी रुपये १५०/- पाठवावेत. या शुल्कात प्रवेश परीक्षेच्या शुल्काचा समावेश आहे. भरलेले पूर्ण अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २० सप्टेंबर २००६ असून प्रवेश परीक्षा २४ सप्टेंबर



२००६ रोजी होईल. या परीक्षेचा निकाल २६ सप्टेंबर २००६ रोजी लागल्यानंतर तारीख २९ सप्टेंबर २००६ पर्यंत उमेदवाराने आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. (डी.डी. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे (सर्टिफिकेट कोर्स) या नावाने, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या पुण्यातील शाखेवर काढावेत.)

अभ्यासक्रमासाठी सरकारी नियमान्वये आरक्षण राहील.

हा अभ्यासक्रम प्रकाशन क्षेत्रात काम करत असणाऱ्या त्याचप्रमाणे काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना उपयुक्त आहे.

संपर्क- अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, १९४५, सदाशिव पेठ, पुणे ३० विश्वास दास्ताने : मोबाइल ९४२२५५५७९०, श्री. अविनाश पंडीत २५३८२२२६, श्री. शरद गोगटे ५६३४५८७९

*** जवळीक सोलापूरतर्फे एक अभिनव अभिवाचन! 'गोष्टी माणसांच्या'**

'इन्फोसिस', नारायण मूर्ती, सौ. सुधा मूर्ती ही नावे महाराष्ट्रीयन माणसाला आता नवी राहिलेली नाहीत. नीतिमत्तेने संपत्ती मिळविता येते आणि लोकशाही मार्गाने तिचा विनियोग विधायक कामासाठी करता येतो. हे ध्येय ठेवून काम करणारी 'इन्फोसिस' ही भारतातील अग्रेसर उद्योजक कंपनी. नारायण मूर्ती यांचा हा वेलू गगनावरी गेला असून अध्यक्षपदाहून निवृत्त होणाऱ्या नारायण मूर्ती यांच्या ज्ञानाचा आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाभ व्हावा म्हणून अमेरिका आणि युरोपमधील अनेक जण प्रयत्नशील आहेत.

भारतात अठरा विश्व दारिद्र्यात राहणाऱ्या माणसांच्या दारात शिक्षणाच्या आणि आरोग्याच्या सुविधा नेऊन पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपयांहून अधिक पैसे 'इन्फोसिस'च्या माध्यमातून मदत म्हणून दिले गेले आहेत. श्रीमान नारायण मूर्ती यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुधा मूर्ती या उच्च विद्याविभूषित प्राध्यापिका, उच्च पदस्थ अधिकारी आणि कन्नड साहित्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या संवेदनशील लेखिका आहेत. वाईज अँड अदरवाईज आणि गोष्टी माणसांच्या ही सुधा मूर्ती यांनी लिहिलेली दोन पुस्तके. या पुस्तकांचा अनुवाद कोल्हापूरच्या प्रा. सौ. लीना सोहोनी यांनी केला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. या आधीही त्यांची अशीच अनेक चांगली अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

सोलापुरात 'जवळीक' या संस्थेतर्फे 'गोष्टी माणसांच्या' या नावाने एक सुंदर अभिवाचनाचा प्रयोग नुकताच 'ॲम्फी' थिएटरमध्ये करण्यात आला. 'वाईज अँड अदरवाईज' आणि 'गोष्टी माणसांच्या' अशा दोन्ही पुस्तकांतील गोष्टींचे वाचन यात करण्यात आले. हे अभिवाचन सौ. लीना सोहोनी आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांच्या उपस्थितीत झाले. या अभिवाचनाची संकल्पना आणि दिग्दर्शन श्री. शशिकांत लावणीस यांचे होते.

अभिवाचनास पुरक प्रवाही संगीत आकाशवाणी सोलापूरचे निवेदक अभिराम सराफ यांनी दिले होते. या अभिवाचनात शशिकांत लावणीस यांच्या समवेत सौ. वनिता म्हैस्कर, मंजूषा गाडगीळ, सुनीता तारापुरे आणि विद्या लिमये यांचा सहभाग होता. वाचनाच्या आणि श्रवणाच्या आनंदाबरोबरीने माणसांच्या जाणिवा रुंद करणारे आणि चांगले विचार देणारे हे अभिवाचन संस्मरणीय ठरले. अभिवाचनाच्या वेळी ॲम्फी थिएटर रसिक साहित्य नाट्यप्रेमी प्रेक्षकांनी खचाखच भरून गेले होते.

केबल वाहिन्यांच्या नकली, बेगडी टी.व्ही. मालिकांची संस्कृती आपल्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. स्वतंत्रपणे विचार करण्याची लहान मुलांची आणि युवा पिढीची क्षमताच लोप पावते आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत अभिजात साहित्य जिवंत ठेवणं - चांगले विचार पोहोचवणे - हे काम जवळीक संस्था करते आहे. याबद्दल खरोखर कौतुक वाटते, असे उद्गार अनुवादिका लीना सोहोनी यांनी काढले. कार्यक्रमास लेखिका सौ. सुधा मूर्ती यांनीही फोनवरून शुभेच्छा दिल्या.

सांगावेसे वाटले म्हणून (शांता शेळके), स्पीडपोस्ट (शोभा डे), गुलजार बोलतो त्याची कविता होतो (अमोल चाफळकर), विनशन (राजन खान), कृष्णकिनारा (अरुणा ढेरे) असे अनेक संस्मरणीय अभिवाचनाचे कार्यक्रम या आधी 'जवळीक'तर्फे पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी येथे झाले आहेत. ❐




**पुस्तक परिचय**

# व्हाईट मुघल्स

## अठराव्या शतकात घडलेली प्रेम व प्रतारणेची विलक्षण कहाणी

**विल्यम डॅलरिंपल**
**अनु. सुधा नरवणे**

अठराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध या काळात निजामाच्या हैदराबाद शहरात घडलेली ही विलक्षण प्रेमकहाणी मेजर जेम्स अचिल्स कर्कपॅट्रिक आणि बेगम खैरुन्निसा यांचं जगावेगळं प्रेम. जेम्स कर्कपॅट्रिक हा हैदराबादच्या दरबारातला ब्रिटिश रेडिसेंट. त्यानं पूर्णपणे पौर्वात्य चालीरीती, पोषाख उचलला होता. पत्नी-प्रेयसी खैरुन्निसासाठी त्यानं तिचा धर्मासह स्वीकार केला. त्याला हैदराबादमध्ये हशमतजंग नवाब फक्र-उद्दौला बहादूर या नावानं ओळखलं जाई. म्हणून तो गोरा ब्रिटिश असूनही मोगल व्हाइट मुघल.

खैरून्निसा ही शुइतारी कुटुंबातली, कर्तबगार अशा बाकर अली खान याची नात. ती अत्यंत सुंदर, लावण्यवती होती. तिच्या अनुपम सौंदर्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती.

या पुस्तकात एका कुटुंबातल्या तीन पिढ्यांची कहाणी आहे. लेखक विल्यम डॅलरिंपल यानं चारपाच वर्षं अथक संशोधन करून ती लिहून ठेवली आहे. त्याच्या मते केवळ हैदराबादेतच नव्हे तर हिंदुस्थानात एकेक पिढी भाषा- धर्म-संस्कृती यात हेलकावे खात होती. एक वेगळं जग हैदराबादमध्येही अस्तित्वात होतं आणि त्याची कल्पना फार थोड्यांना होती.

या लिखाणाचं बीज लेखकाच्या मनात कसं पडलं त्याची हकीगत रोचक आहे. लेखक डॅलरिंपल १९९७ साली मोहरमच्या दिवसांत हैदराबादला गेला असता त्यानं प्रथम जेम्स अचिल्स कर्कपॅट्रिक याच्याबद्दल ऐकलं. हैदराबाद या शहराचा, तिथल्या इतिहासाचाही शोध घ्यावा असं त्याला तीव्रतेनं वाटलं. कारण अद्याप कुणी या गोष्टींचा नीटसा शोध घेतलेला नाही असं त्याच्या लक्षात आलं.



सध्या उस्मानिया विद्यापीठाचं महिला विद्यालय ज्या वास्तूत आहे, तिथं ब्रिटिश रेसिडेन्सी होती. या वास्तूचं बांधकाम हैदराबादचा ब्रिटिश रेसिडेन्ट लेफ्टनंट कर्नल जेम्स कर्कपॅट्रिक यानं केल्याचं लेखकाला कळलं. तो १७९७ ते १८०५ या काळात हैदराबादच्या दरबारात ब्रिटिश राजदूतही होता. त्यानं तेव्हा हैदराबादी पोशाख आणि हैदराबादी रीतीरिवाजांचा अंगिकार केला होता. हैदराबादच्या पंतप्रधानांच्या नात्यातील एक मुलगी खैरुन्निसा हिच्या तो प्रेमात पडला. इ.स. १८०० मध्ये मुस्लिम कायद्यानुसार त्यानं तिच्याशी लग्न केलं. खैरुन्निसा याचा अर्थ सर्वात सुंदर स्त्री.

> **खैरून्निसा ही शुइतारी कुटुंबातली, कर्तबगार अशा बाकर अली खान याची नात. ती अत्यंत सुंदर, लावण्यवती होती. तिच्या अपुनपम सौंदर्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती.**

या प्रेमकहाणीमुळे या कालखंडात गोवल्या गेलेल्या अनेकानेक व्यक्तींच्या व्यामिश्र पटानं लेखक मंत्रमुग्ध झाला. लंडनला परत गेल्यावर त्यानं कर्कपॅट्रिक विषयी जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. लंडन-दिल्ली-हैदराबाद अशा अनेक फेऱ्या लेखकानं केल्या. असंख्य पत्रं, कागद, हस्तलिखितं, पुस्तकं त्यानं परिश्रमपूर्वक मिळवली. (ही सगळी हकीगत लेखकाच्या प्रस्तावनेत मुळातूनच वाचायला हवी. म्हणजे एखाद्या विषयानं झपाटून जाणं म्हणजे काय ते कळतं.) इतकंच नव्हे तर इंग्लंडमध्येच स्थायिक असलेल्या खैरुन्निसाच्या मुलीपर्यंत (किटी कर्कपॅट्रिक) तो पोहोचला.

हे पुस्तक म्हणजे खरोखर लेखकाचं फार मोठं संशोधनकार्य आहे. केवळ जेम्स खैरुन्निसाची प्रेमकहाणीच नव्हे तर त्या काळाचा, सबंध परिस्थितीचा खोलात जाऊन केलेला अभ्यास आहे. या पुस्तकात अंतर्भूत असलेल्या नुसत्या पैलूंचा विचार केला तरी थक्क व्हायला होतं. ब्रिटिशांची एखाद्या कॅन्टोन्मेंटमध्ये सीमित असलेली जीवनशैली, भारतीयांची जीवनशैली, संस्कृती, राष्ट्रीयत्व, धार्मिक कल्पना, वांशिकता, संकरातून उदयाला आलेला अँग्लो इंडियन समाज, भारतीय समाज, त्यांची भाषा, पेहराव, खाद्यपदार्थ आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे ब्रिटिश-भारतीयांचे संबंध. पुस्तकाच्या विशाल आवाक्यात कितीतरी घराणी आणि कुटुंबं येतात. खैरुन्निसाचं शुइतारी कुटुंब, जेम्सचं कर्कपॅट्रिक कुटुंब, वेलस्ली कुटुंब, पामर कुटुंब, रसेल कुटुंब, निजामाचं घराणं आणि इतर

**एका रात्री जेम्स आणि खैरुन्निसाची भेट झाली. त्यावेळी त्या लावण्यवणीला त्यानं जवळून पाहिलं. ही भेट घडवून आणण्यात तिच्या आईनं आणि आजीनं पुढाकार घेतला होता.**

एकदोन लहान कुटुंबं. यातून विस्तारत जाणारी ही एक महाकथा बनत जाते.

खैरुन्निसा जन्मभर एका स्वतंत्र बीबीघरात पडद्यात राहिली. पतीनं निर्माण केलेली नितांत सुंदर रेसिडेन्सीची वास्तू तिला बघता येणं शक्य नव्हतं. म्हणून जेम्सनं आपल्या महालाची एक छोटी प्रतिकृती तिच्यासाठी बनवली आणि ती बीबीघराच्या जवळच उभारली. ही प्रेमकहाणी जगावेगळीच होती यात शंका नाही. एखाद्या ब्रिटिश पुरुषाच्या आयुष्यात क्वचितच अशी घटना घडली असेल.

एका रात्री जेम्स आणि खैरुन्निसाची भेट झाली. त्यावेळी त्या लावण्यवतीला त्यानं जवळून पाहिलं. ही भेट घडवून आणण्यात तिच्या आईनं आणि आजीनं पुढाकार घेतला होता. ती भेट जेम्सच्याच घरी झाली. त्याला भेटावं ही तिची अनावर इच्छा होती. तिनं स्वतःच्या प्रेमाची पुनः पुन्हा त्याला ग्वाही दिली होती.

या प्रेमकहाणीचा शेवट शोकपूर्ण झाला हे तर खरंच. पण बराच शोध घेऊनही लेखकाला कर्कपॅट्रिकच्या मृत्यूनंतर खैरुन्निसाचं काय झालं ते निश्चित कळेना. शेवटी कौटुंबिक कागदपत्रांतून त्याला सर्व कहाणी उलगडली. खैरुन्निसाची मुलगी किटी कर्कपॅट्रिक हिचा आणि तिच्या आजीचा अखेरच्या काळात अत्यंत हृद्य असा पत्रव्यवहार झाला. किटी इंग्रजीत पत्रं लिही, तर आजी आपल्या कारकुनाला पर्शियन भाषेत तोंडी मजकूर सांगून उत्तर धाडत असे. या पत्रांमधून जेम्स आणि खैर कसे प्रेमात पडले, खैरचा दुःखद अंत कसा झाला ते लेखकाला कळलं. तसंच किटीलाही कळलं.

पूर्व-पश्चिम संस्कृतींचा विलक्षण मिलाफ अनेक पातळ्यांवर घडत होता. अनेक इंग्रज लोकांनी भारतीय रीतिरिवाज आपलेसे केले होते, तसंच भारतीयांनी पाश्चात्य जीवनपद्धती आत्मसात केली होती. या प्रेमकहाणीमध्ये खैरुन्निसाच्या जवळचे दोन पुरुष होते. एक हेन्री रसेल. हा पुढे खैरुन्निसाचा प्रियकर झाला. दुसरा, महंमद अली खान. याच्याशी खैरचा विवाह ठरला होता.

खैरुन्निसाला जेम्सपासून मीर गुलाम अली हा मुलगा आणि नूर उन्निसा ही मुलगी झाली. दोन्ही मुलं लहानपणीच शिक्षणासाठी इंग्लंडला गेली. मुलगा विल्यम जॉर्ज कर्कपॅट्रिक म्हणून, तर मुलगी कॅथरिन (किटी) कर्कपॅट्रिक म्हणून



ओळखली जाऊ लागली.

**खैरुन्निसा अतिशय क्षीण झाली होती. तिला उचलून रंगमहालात आणावं लागलं. ज्या बिछान्यावर तिनं आपल्या मुलीला जन्म दिला होता, तीच तिची मृत्यूशय्या बनली.**

खैरुन्निसा धार्मिक प्रवृत्तीची होती. जेम्स कुटुंबात तिला मध्यवर्ती स्थान होतं. ती शांत व्यक्तिमत्त्वाची होती. तिला आणि जेम्सला दोघांनाही मौल्यवान रत्नं जमवण्याची आवड होती. १८०५ साली जेम्सचा मृत्यू झाला. त्यावेळी खैरुन्निसा फक्त एकोणीस वर्षांची होती. पतिनिधनाचं दुःख तर होतंच, पण आता आपली मुलं आपल्याला कधीच भेटणार नाहीत या विचारानं ती उरी फुटून गेली. तिच्या भविष्यकाळाला काहीच अर्थ उरला नाही. अशा वेळी हेन्री रसेलनं तिला बरीच मदत केली. दोघांमध्ये जवळीक निर्माण झाली; पण त्यानंही तिला सोडून दिलं आणि जेन नावाच्या तरुणीशी विवाह केला. हा आणखी एक धक्का खैरुन्निसाला सहन झाला नाही.

खैरुन्निसा अतिशय क्षीण झाली होती. तिला उचलून रंगमहालात आणावं लागलं. ज्या बिछान्यावर तिनं आपल्या मुलीला जन्म दिला होता, तीच तिची मृत्यूशय्या बनली. तिच्या आजाराचं नक्की कारण कळत नव्हतं. पण तिनं स्वतःला अखेरचं मिटून घेतलं. दुःखाचा लोट तिला असह्य झाला आणि २२ सप्टेंबर १८१३ रोजी ती मृत्यूच्या स्वाधीन झाली. तिची जगण्याची इच्छाच नष्ट झाली होती. तरुण, सुंदर मुलीच्या मृत्यूनंतर ते दुःख सोसायला तिची आई शरफुन्निसा मात्र जिवंत होती.

खैरुन्निसा सरदार घराण्यातली असल्यानं दागदागिने, जडजवाहिर भरपूर होतं. पण तिच्या मृत्यूनंतर आई शरफुन्निसाची फार दैन्यावस्था झाली. बरेच दागिने विकावे लागले. रसेलनं शेवटी का होईना, दया दाखवून खैरुन्निसाला रंगमहालात आणलं. पण ती फक्त पंधरा दिवस जगली. ती एक असामान्य स्त्री होती. जेम्सची लाडकी प्रिया आणि हेन्री रसेलनं त्यागलेली प्रेयसी. तिचं आयुष्य म्हणजे पराकोटीची दुःखगाथा होती. तथापि तिनं रुढीरिवाजाविरुद्ध बंड करून आपल्या आवडत्या पुरुषाशी, वेगळ्या वंशाच्या पुरुषाशी विवाह केला ते कौतुकास्पद होतं. तिच्या या कृत्यामुळं कुटुंबात दुही माजली. तिची आजी, आई आणि ती या तिघींचाही सर्वनाश व्हायची वेळ आली पण ती डगमगली नाही.

तिसऱ्या पिढीतली किटी हिची कहाणी म्हणजे जीवन सनातन, शाश्वत, पुढं

> **जेम्सची लाडकी प्रिया आणि हेन्री रसेलनं त्यागलेली प्रेयसी. तिचं आयुष्य म्हणजे पराकोटीची दुःखगाथा होती. तथापि तिनं रुढीरिवाजाविरुद्ध बंड करून आपल्या आवडत्या पुरुषाशी, वेगळ्या वंशाच्या पुरुषाशी विवाह केला.**

चालूच राहणार आहे याचं प्रत्यंतर देणारं प्रकरण. ते हेलावून टाकणारं आहे. तिला तिच्या आईच्या स्वर्गीय सौंदर्याबद्दल, प्रेमाबद्दल आजीमार्फत कळतं तेव्हा ती लिहिते- "स्वप्नात आई दिसली की मला खूप आनंद होतो, पण आम्हाला एकमेकींचं बोलणं कळत नाही. आम्ही तिच्यापासून दूर जाताना ती स्वत:चे केस उपटून रडत होती असं तू (किटीची आजी) सांगितलंस. तिच्या सुंदर केसांची एक बट जरी मला मिळाली असती तरी त्या बदल्यात मी वाटेल ते दिलं असतं. तुझं माझ्यावर इतकं प्रेम आहे हे कळायला सुद्धा पस्तीस वर्षं जावी लागली!"

या पुस्तकात खैरुन्निसा, जेम्स यांची व इतरही बरीच चित्रं आहेत. मुखपृष्ठावर तर तिची अप्रतिम, सुंदर छबी आहे. प्रत्यक्षात ती याहूनही फारच सुंदर होती म्हणतात. तिचा अकाली मृत्यू चटका लावणारा आहे.

आता या पुस्तकाच्या अनुवादाबद्दल. तो उत्तम साधला आहे. वास्तविक पुस्तक खूप गुंतागुंतीचं, त्यात अनेक व्यक्ती, पण ते सारं समजून, नुसतं समजूनच नव्हे तर स्वत:च आपण हे लिहीत आहोत अशा प्रकारे मनात मुरवून सुधा नरवणे यांनी अनुवाद केला आहे. हा एक कथनात्मक इतिहास आहे. पुस्तकांच्या मलपृष्ठावर म्हटल्याप्रमाणे "आपल्या काळातल्या सर्व धार्मिक सांस्कृतिक राजकीय जोखडांना झुगारून एकमेकांवर उत्कट प्रेम करणाऱ्या दोन जीवांची ही शोकांतिका आहे. जेम्स अचिल्स कर्कपॅट्रिक हा ईस्ट इंडिया कंपनीचा सैनिक भारतात आपलं नाव व्हावं या महत्त्वाकांक्षेनं आला होता. निजामाच्या दरबारात रेसिडेन्ट असताना त्याची प्रथम १७९८ मध्ये खैरुन्निसा या तरुणीची नजरानजर झाली. ती पडदानशीन होती, तिचा विवाह आधीच ठरला होता. पण या सर्व अडचणींवर मात करून त्यानं इस्लाम धर्म स्वीकारला. तिच्याशी विवाह केला. ब्रिटिश रेसिडेन्ट असूनही तो ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध हैदराबादींना सहाय्य करीत होता असा त्याच्याबद्दल प्रवाद होता."

हे सारं वाचून आपण पुस्तक वाचायला नक्कीच उद्युक्त होऊ.

**-आशा कर्दळे**

**पृष्ठे :४६८ ● किंमत :३५०रु. ● सभासदांना :२६३रु. ● पोस्टेज :३०रु.**






# पुढाकार घ्या
## प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र

**संजीव परळीकर**

**२००रुपये**


**सभासदांना १५०रु.**

पोस्टेज **२५रु.**

स्पर्धेच्या युगात संधी उपलब्ध होणं हे तसं दुर्मिळच. मात्र संधी उपलब्ध होण्यासाठी पुढाकार घेणं हेही तितकचं महत्वाचं.

पुढाकार घेतल्याशिवाय कोणालाही काहीही मिळत नाही. परंतु पुढाकार घ्यायचा म्हणजे नक्की काय करायचं याचही मार्गदर्शन महत्वाचं. म्हणूनच कायमस्वरूपी यश मिळवण्यासाठी मन:शांती टिकवण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी, कंटाळवाणं आयुष्य झटकून मजेत जगण्यासाठी पुढाकार घ्या हे पुस्तक वाचलंच पाहिजे.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# मृत्यू अमृताचे द्वार

## ओशोंच्या ओघवत्या शैलीतील जीवन-मृत्यूसंबंधी तत्त्वज्ञान सांगणारे मूलगामी चिंतन

**ओशो अनु. मीना टाकळकर**

आपल्या जीवनाविषयी, भोवतालच्या जगाविषयी आपल्याला अनेक प्रश्न असतात. त्यातलाच एक प्रश्न 'मृत्यू'विषयीचा असतो. जन्माकडून मृत्यूकडे होणाऱ्या प्रवासात आपण सुखदुःखाच्या छायाप्रकाशात चाचपडत असतो. अशा वेळेस जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणारी भगवान श्री. रजनीश उर्फ ओशो यांची पुस्तके निश्चितच मार्गदर्शक ठरतात. त्यातलेच एक पुस्तक 'मृत्यू अमृताचे द्वार'. ओशो इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या 'कहे कबीर मैं पूरा पाया' या हिंदी पुस्तकातील सात ते तेरा प्रकरणे मीना टाकळकर यांनी मराठीत अनुवाद केली आहेत. ही प्रकरणे म्हणजेच ओशोंची प्रवचने आहेत. या सात प्रवचनांचे संकलन म्हणजेच 'मृत्यू अमृताचे द्वार', संत कबिराच्या सुंदर दोह्यांमधून ओशो यांनी जीवनाचा नवा अर्थ शोधला आहे.

**प्रवचन पहिले -**

पहिले प्रवचन आहे, 'जो जागा झाला त्यालाच ईश्वर भेटला!' कबीर म्हणतात, 'भरै चढै सो अधधर डूबै।' या दोह्याचे विश्लेषण ओशोंनी केले आहे. कोणत्याही नावेमध्ये चढलात तरी प्रवाहाच्या मध्यभागी ती डुबणारच. 'निराधार भार पार'- ज्यांनी कोणताही आधार घेतला नाही, ते पैलतीरी सहज पोहोचतील. याबद्दल ओशो म्हणतात, जो नावेमध्ये चढला तो प्रवाहाच्या मध्यभागी डुबलाच. ज्या क्षणी तो नावेत चढला त्याच क्षणी त्याचे डुबणे सुरू झाले; कारण तो पोहू शकत नव्हता म्हणून तर तो चढला. हा जीवनाचा प्रवास खरे तर एकट्याचा आहे. तो एकट्यानेच पोहून पार करावयाचा आहे. कुणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या सामर्थ्याने, श्रद्धा-विश्वासाने पार पाडायचा असतो.



जर सभोवताली अंधार असेल अन् दिवा लावला असेल तर तो दिवा बाहेरचा असेल तो केव्हाही विझेल त्याचा काही उपयोग नाही. त्यापेक्षा आपल्या अंतरंगातील दिवा पेटवायला पाहिजे. तोच शेवटपर्यंत साथ देईल.

> **तुमचा परमेश्वर म्हणजे तुमची कल्पना आहे. जर तुम्ही स्वतःच स्वतःचा आधार झालात तर तिथेच परमेश्वर आपण होऊन आधार देतो; त्याआधी नाही.**

कबीराच्या वचनांचा अर्थ ओशोंनी वेगवेगळ्या दृष्टांतांनी, दाखले देऊन उलगडून सांगितला आहे. जो निराधार आहे तो त्याचा त्यालाच आधार आहे. जर परमेश्वराला आधार बनवले तर तुमच्या परमेश्वराची काय किंमत राहिली? तुमचा परमेश्वर म्हणजे तुमची कल्पना आहे. जर तुम्ही परमेश्वराचा आधार न मानता स्वतःच स्वतःचा आधार झालात तर तिथेच परमेश्वर आपण होऊन आधार देतो; त्याआधी नाही.

मानवी स्वभावाबद्दल सांगताना ओशो म्हणतात; अहंकार नसावा. अहंकार तुम्हाला लुटून नेतो. अहंकार तुमची नशा आहे. ती तुम्हाला बरबाद करते. तुम्ही जितके अहंकारी व्हाल तितके तुम्ही बरबाद व्हाल. जितके तुम्ही निरहंकारी व्हाल तितके कुणीही लुटून नेऊ शकणार नाही. अहंकार असला तर लुटले जाण्याचे ते एकमेव आधारसूत्र आहे.

ओशो म्हणतात, आपण आपल्या मनाचे ऐकतो आणि दुःखी होतो. त्यापेक्षा मन मारून टाका म्हणजे दुःख होणार नाही. मन बाजूला होताक्षणीच तुम्ही मंदिरात प्रवेश कराल. जिथे मंदिर सुरू होते तेथून अमृताचा वर्षाव होण्यास सुरुवात होते.

**प्रवचन दुसरे-**

'एक परम समाधान' या दुसऱ्या प्रवचनातही 'अहंकारा'विषयीचे कबिराचे वचन उलगडून सांगितले आहे. ते म्हणतात, अहंकार अडचण आहे, समर्पण उकल आहे. अहंकाराने रोग निर्माण केले तर समर्पणामुळे ते संपतील म्हणून तर सगळ्या शास्त्रांनी, सगळ्या परंपरांनी समर्पणाचा महिमा गायला आहे.

एक महत्त्वाचे सूत्र ओशोंनी सांगितले आहे की, आपला प्रश्न नीटपणे समजून घेण्यातच उत्तर येईल. ज्यांनी समस्या व्यवस्थितपणे समजून घेतल्या आहेत त्यांचे समाधान होईल. दुसरे कुठेही नाही तर प्रश्नामध्येच उत्तर लपले आहे. ज्याला तुम्ही शोधताय ते कुठेही दुसरीकडे नसून ते तुमच्यातच दडले आहे.

कबिराच्या प्रार्थनेतील भावरस कसा गहन स्वरूपात आहे हे सांगताना ओशोंनी

**बघण्याच्या दृष्टिकोनावर सारे अवलंबून आहे. तुम्ही 'कसे' बघता यावर सारे अवलंबून आहे. ज्याचा अभाव आहे तेच मनाला दिसते. जे तुमच्या जवळ आहे ते दिसत नाही. मन नेहमीच अभावामध्ये जगते. म्हणून ते नेहमी दुःखी राहते.**

म्हटले आहे की, संसारात दोन प्रकारचे मार्ग आहेत. ध्यानाचा आणि प्रार्थनेचा. ध्यानाचा मार्ग हा ज्ञानीचा मार्ग आहे. प्रार्थनेचा मार्ग हा प्रेमिकांचा मार्ग आहे. ध्यानाच्या मार्गावर धोका आहे तो अहंकार कायम राहण्याचा! कारण की मी ध्यान करीत आहे, कुणी दुसरा तर नाहीच, मीच ध्यानात आहे. अशा वेळेस तुम्ही सावध राहिला नाहीत तर तुम्हाला ध्यानातही अहंकार निर्माण होईल. ध्यानी माणसाला शेवटच्या क्षणी अहंकार बाजूला ठेवावा लागतो. तीच शून्यता आहे.

योगी, ज्ञानी, ध्यानी हे सगळ्यात शेवटी अहंकार सोडतात. प्रार्थना करणारे भक्त अहंकार सुरुवातीलाच सोडतात कारण प्रार्थनेचा अर्थच समर्पण आहे. तुमच्यापेक्षा मोठा कुणीही नाही. परंतु हे मोठेपण तुम्हाला तेव्हा प्राप्त होईल जेव्हा तुम्ही समर्पण कराल.

**प्रवचन तिसरे-**

'अमृताचे दार मृत्यू आहे.' या तिसऱ्या प्रवचनात 'मृत्यू' संकल्पनेचा अर्थ उलगडून दाखवला आहे. एका बाजूने बघताना जीवन मृत्यू आहे. दुसऱ्या बाजूने बघताना जीवन संपूर्ण परमानंद वाटते. ते पूर्ण परमानंद आहे. ते उच्च परमजीवन आहे. बघण्याच्या दृष्टिकोनावर सारे अवलंबून आहे. तुम्ही 'कसे' बघता यावर सारे अवलंबून आहे. ज्याचा अभाव आहे तेच मनाला दिसते. जे तुमच्या जवळ आहे ते दिसत नाही. मन नेहमीच अभावामध्ये जगते. म्हणून ते नेहमी दुःखी राहते. हा मुद्दा समजविण्यासाठी ओशो शिडीचे उदाहरण देतात. शिडीचे दोन भाग असतात एकतर शिडीमध्ये लावलेले दांडे असतात की जे अस्तित्वाचे दांडे आहेत, ज्याच्यावर तुम्ही पाय ठेवून चढता आणि दोन दांड्याच्या मध्ये जी पोकळी असते ती म्हणजे अभावाची! समजा तुम्ही त्या अभावाच्या ठिकाणी पाय ठेवलात तर तुम्ही खाली पडाल. खोल अंधारात हरवून जाल. तोच मृत्यू आहे. अंधार आहे. समजा तुम्ही अस्तित्वात 'भावा'च्या दांड्यावर पाय ठेवलात तर तुम्ही पूर्ण परमानंदापर्यंत पोहोचाल.

कबीर म्हणतात, ''सारे जग ज्या मृत्यूला घाबरते, भयभीत होते त्याच मृत्यूने माझे मन आनंदित होते.'' तुम्ही कसे बघता? कसे जगता? तुमचा जगण्याचा ढंग कसा आहे? नकारात्मक! आस्तिक का नास्तिक! मी मात्र त्यालाच आस्तिक म्हणतो जो सकारात्मक भावाने जगतो. ओशो म्हणतात, शत्रूंची संख्या तुमच्या भयावर अवलंबून आहे. भय संपले तर तुमचा कोणी शत्रू नसेल. कबिराचा कोणीच शत्रू होऊ शकत नाही.

**ज्याने मृत्यूचा शोध घेतला त्याला राम भेटला. ज्याने स्वतःला मृत्यूपासून वाचवले त्याने कितीही राम-राम म्हणून धावा केला, कितीही रामनामाचा जप केला, तुमच्या रामनामाच्या जपामधून मरा-मराचा ध्वनी निर्माण होईल.**

ओशो, कबिराचे विचार गोष्टीरूपातून उदाहरणे देऊन समजावून सांगतात. मृत्यूविषयीचे विवेचन करताना तात्पर्य देतात, की ज्याने मृत्यूचा शोध घेतला त्याला राम भेटला. ज्याने स्वत:ला मृत्यूपासून वाचवले त्याने कितीही राम-राम म्हणून धावा केला, कितीही रामनामाचा जप केला, तुमच्या रामनामाच्या जपामधून मरा-मराचा ध्वनी निर्माण होईल. वाल्मीकीच्या मरा-मरामधूनच त्यांना राम प्रसन्न झाले.

**प्रवचन चवथे-**

चवथे प्रवचन 'संन्यास परम सौभाग्य आहे' या शीर्षकाचे आहे. प्रत्येकच प्रवचनात सुरुवातीला कबिराच्या ओव्या दिल्या आहेत. आणि पुढे प्रवचनात त्या ओवीचा अर्थ उदाहरणं, दाखले देऊन ओशोंनी समजावून सांगितला आहे. या प्रवचनात कबिरांच्या ओव्यांबद्दल लिहिण्यापूर्वी काही नोंदी दिल्या आहेत; मनाविषयीच्या गोष्टी सांगितल्या आहेत. ओशो म्हणतात, मन तर ना कधी आजारी होते अन् ना कधी निरोगी कारण की मन हाच आजार आहे. मन कधीच शांत नसते. जोपर्यंत मन आहे, अशांती राहणार आहे. मनाचे नसणे म्हणजेच शांती. मन हे सेतूसारखे आहे. एक किनारा आत्मा आहे. एक किनारा शरीर. मन दोन्हींना जोडणारा सेतू आहे.

मन संघर्ष आहे. मनापासून निर्माण झालेला संसार हा अपवित्र आहे. फक्त तीच माणसे या संसारात पवित्र आहेत ज्यांच्या वाणीत सतत रामाचेच नाव आहे.

**प्रवचन पाचवे-**

पाचवे प्रवचन आहे 'पंडितांपासून सावधान'. या प्रवचनात कबिराविषयी आपल्याला काय वाटते ते ओशो सांगतात. ते म्हणतात, संतांमध्ये कबिराच्या तोडीचे कोणीच नाही. सगळं संत अद्भुत आहेत. त्याचे अद्वितीयपण हे आहे की त्याचे उसने असे काहीच नाही.

**जेव्हा मनामध्ये तिरस्कार निर्माण होईल तेव्हा एकांतात बसा. परमेश्वराचे स्मरण करा. शीतल व्हा, शीतल बोला. शांतता ही जीवनशैली बनवा.**

कबिराचा मार्ग मोठा सरळ-साधा आहे. खूप कमी लोकांचा रस्ता इतका सरळ साधा असतो. वाकड्या-तिरक्या गोष्टी कबिरांना पसंत नाहीत म्हणूनच त्यांच्या मार्गाचे नाव आहे- 'सहजयोग'!

कबीर स्वत: पंडित नाही. तो म्हणतो मी जे बघितले तेच सांगितले, ज्याचा अनुभव घेतला तेच सांगितले त्यात काही उधार नाही, असे ओशो या प्रवचनात पुन्हा पुन्हा सांगतात. कबिराच्या जन्मरहस्याविषयी म्हणतात, कबीर हिंदू का मुस्लीम हेही आपल्याला माहीत नाही. तरीही त्याच्याविषयी कल्पित रंजक गोष्टी सांगितल्या जातात. ओशो म्हणतात, कबीर जेव्हा मरण पावले तेव्हा प्रेत समोर पडले होते त्यावर कफन घातले गेले. हिंदू म्हणाले, आम्ही जाळणार, मुसलमान म्हणाले आम्ही पुरणार. मृत्यूसमयी हा संघर्ष चालू असताना प्रेतावरील कफन बाजूला केले तर दिसले की तिथे कबीर नाहीत. फक्त काही फुलेच आहेत. ही कथासुद्धा प्रतीकात्मक आहे. पण ती कथा असे तात्पर्य सांगते की, 'संतांचे जीवन फुलांसारखे आहे. ते सुगंध ठेवून जातात.' कबिराला जर समजून घ्यायचे तर त्याच्या आयुष्याशी ज्या ज्या कहाण्या जोडल्या गेल्या आहेत त्या सगळ्यांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे; असे ओशो म्हणतात.

**प्रवचन सहावे-**

सहावे प्रवचन आहे 'शून्यामध्ये उडी'. या प्रवचनात चर्चा केली आहे ते मुद्दे म्हणजे-

१) मी शून्य होत आहे आता काय करू?

२) धर्मगुरूंसारखा कबिराचा व्यापक प्रभाव का पडला नाही?

३) दु:खापासून मुक्ती कशी मिळेल?

४) माझ्यावर गुरुकृपा कधी होईल?

या चार मुद्द्यांवर कबिराच्या वचनांचा अर्थ सांगत- उदाहरणे देऊन ओशोंनी चर्चा केली आहे. त्यात शेवटी म्हटले आहे की, माळी कोणतीही फुले स्वत:हून उमलवत नाही. पाणी देतो, खाद्य देतो परंतु कोणतेही फूल हाताने उमलवत नाही. रोपट्याला सुद्धा संधी देतो, की जेव्हा केव्हा वेळ येईल तेव्हा पिकेल,



जेव्हा वसंत येईल, जेव्हा फुलाच्या आत उमलण्याची क्षमता निर्माण होईल, तेव्हा फूल आपणहून उमलेल. आपणहून उमलणे हा सहजयोग आहे. सहजतेला समजलात तर कबिराला समजलात.

**प्रवचन सातवे-**

या शेवटच्या प्रवचनाचे शीर्षक आहे 'शब्दांची साधना करा'. जे शब्द शांतता आणि शीतलतेपासून येतात असेच शब्द ऐका. क्रोध, शत्रुत्व, हिंसा आणि आणि तिरस्कारांचे शब्द ऐकायचे नाहीत. त्याचप्रमाणे युद्ध आणि विषाने भरलेले शब्द ऐकू नका. जेव्हा मनामध्ये तिरस्कार निर्माण होईल तेव्हा एकांतात बसा. परमेश्वराचे स्मरण करा. शीतल व्हा, शीतल बोला. शांतता ही जीवनशैली बनवा. तीच तुमची जीवनप्रणाली आहे. शांत होता होता, साधक होता होता एक दिवस तुम्ही साधू होऊन जाल. साधू होता एक दिवस तुम्ही कृतार्थ होऊन जाल.

हे पुस्तक वाचताना ते शब्द पुन्हा पुन्हा लक्षात घेतले की आपण नि:शब्द होऊन जातो. अंतर्मुख होतो. प्रत्येक प्रवचनाच्या शेवटी 'बस, आज एवढेच!' असे ओशो म्हणतात.


'ओशो' हा शब्द अतिपूर्वेकडील देशांमध्ये प्राचीन काळापासून वापरला जात आहे. अशा अर्थाने की, 'देवत्वाला योग्य अशी व्यक्ती जिच्यावर आकाश फुलांचा वर्षाव करते.' अशा भगवान श्री. रजनीश यांचे कबिराच्या दोह्यांवरील चिंतन वाचकांना निश्चितच दिशा देणारे आहे. या पुस्तकाच्या शेवटी ओशोंचा थोडक्यात परिचय करून दिला आहे आणि त्यांच्या हिंदी साहित्यातील ग्रंथाची सूची दिली आहे.

'मृत्यू अमृताचे द्वार' हे पुस्तक म्हणजे कबिराच्या सुंदर दोह्यांमधून 'ओशो'नी दिलेला जीवनाचा नवा अर्थ वाचकांना मार्ग दर्शविणारा आहे. ओशोंच्या रसाळ भाषेतील हे चिंतन जीवन-मृत्यूसंबंधी तत्त्वज्ञान सांगणारे आहे.

**'मृत्यू अमृताचे द्वार' हे पुस्तक म्हणजे कबिराच्या सुंदर दोह्यांमधून 'ओशो'नी दिलेला जीवनाचा नवा अर्थ वाचकांना मार्ग दर्शविणारा आहे. ओशोंच्या रसाळ भाषेतील हे चिंतन जीवन-मृत्यूसंबंधी तत्त्वज्ञान सांगणारे आहे.**

**-रजनी अपसिंगेकर**

**पृष्ठे : २४० ● किंमत :१८०रु. ● सभासदांना :१३५रु. ● पोस्टेज :२५रु.**




# गांधर्वी

## देवदत्त किन्नर कंठ लाभलेल्या गायिकेची कहाणी

**बाणी बसू**
**अनु. मृणालिनी गडकरी**

देवदत्त किन्नर कंठ लाभलेल्या गायिकेच्या स्वरमयी जीवनाभोवती गुंफलेली कादंबरी म्हणजे गांधर्वी. गांधर्वी हे नावच अतिशय समर्पक आहे आणि आशयाचे सूचन करणारे आहे. गंधर्व म्हणजे संगीताशी नाते असणारे दैवी रूप. गंधर्वांबद्दल एक संकल्पना आहे. कंठात वैखरी, हृदयात मध्यमा, स्वधिष्ठानात पश्यंती, त्यापुढे गभीरात गेल्यावर ती वाणी माणसाला ऐकू येत नाही. ती होते मग परा. सूरलोकांच्या मार्गावरून चालता चालता एखादा अन्यमनस्क देवगंधर्व मर्त्यलोकात येऊन पडला, तर त्याच्या दु:खाला पारावार रहात नाहीत. त्याला जेवढं देता येईल तेवढं तो देतो. गांधर्वीची नायिका 'अपाला' म्हणजे अशीच एक गांधर्वी आहे. सप्तसूर हेच तिचं संचित आहे, भाग्य आहे. आणि दुर्भाग्यही! गांधर्वी कादंबरीच्या लेखिका बाणी बसू या बंगालमधील सध्याच्या एक प्रथितयश लेखिका आहेत. लेख, कथा, काव्य, भाषांतर आणि कादंबरी या विविध साहित्यप्रकारात सिद्धहस्त लेखिका म्हणून त्यांनी आपल्या नावाची मोहोर उठवली आहे. बाणी बसू आपल्या लेखनातून जो विषय मांडतात त्याचा सखोल आणि परिपूर्ण अभ्यास त्या करतात. त्यामुळे वातावरणनिर्मिती, विषयाची मांडणी, व्यक्तिरेखाटने अतिशय तरल आणि संपन्नतेचे दर्शन घडवतात.

गांधर्वी कादंबरी अपाला या स्वरसम्राज्ञीच्या जीवनाभोवती गुंफली आहे. सप्तसूर गळ्यात घेऊन जन्मलेली ही गांधर्वी कोलकत्ता या कलेसाठी प्रसिद्ध असलेल्या महानगरात राहणारी आहे. कोलकत्ता म्हणजे संगीत, रविंद्र संगीत असं समीकरण. अपाला ही मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात राहणारी रुढार्थानं साधी तरुणी आहे. परंतु ती जेव्हा तानपुरा घेऊन सूर छेडत असे, तेव्हा साक्षात् स्वरही मंत्रमुग्ध होत. रामेश्वर ठाकूर या संगीतकार गुरूकडे ती गाण्याचे धडे



घेते. तिची शास्त्रीय संगीताची बैठक पक्की आहे. परंतु तिची अशी संगीताबद्दल ठाम मतंही आहेत. म्हणूनच कादंबरीच्या सुरुवातीलाच एका गायनस्पर्धेत अपाला जी भूमिका घेते, ती तिच्या व्यक्तिरेखेला उठाव आणते. कलकत्ता संगीत संमेलन, दिग्गज परीक्षक, देशभरातले कसलेले स्पर्धक, चंद्रकांतजी हे राष्ट्रीय कीर्तीचे महान गायक परीक्षक. अपाला अतिशय समरसून 'तोडी' म्हणते. नंतर पूरियाची बंदिश. अपालाला स्पर्धेचा विचार नाही. जिंकण्याची आसक्ती नाही. फक्त आवडते राग गायला मिळण्याचा आनंद महत्त्वाचा. अपालाने गायिलेले राग संध्याकाळचे राग नव्हते. मैफल तर संध्याकाळचीच. संयोजकांनी अपालाला तसे सुचविले. त्यावर अपाला विचारते, ''गाण्याच्या सगळ्याच मैफली संध्याकाळी होत असतील तर आम्ही आमचे आवडते पहाटेचे किंवा सकाळचे राग गायचे केव्हा?'' पंडितजी अपालाच्या संगीतावर आणि विचारांवर संतुष्ट होतात. परंतु नियमांमुळे ती पहिली मात्र येत नाही. रामेश्वर मात्र अपालाच्या सुरेल गायकीवर संतुष्ट होते. अपाला इतक्याच तोलामोलाचं गाणारा गुरूजींचा दुसरा शिष्य सोहम. सोहम आणि अपालाला रामेश्वरजी म्हणत, ''तू मला काय दिलं आहेस याची कल्पना नाही पोरी! तुम्ही दोघांनी माझा वसंत पुन्हा मिळवून दिलाय. देवाच्या शापानं तारुण्यातील गाणं माझ्या गळ्यातून गेलं. तुमच्या गळ्यातून ते मला पुन्हा मिळतं बघ.'' रामेश्वरांचे आणखीही शिष्य आहेत. खुद्द त्यांची मुलगी मितुल (मितश्री), दीपाली. मात्र अपाला आणि सोहम सारखे शिष्य तेच दोघे. संगीत म्हणजे अपालासाठी विद्या-कला-आवड असं नव्हतं. ते तर तिचं जगणंच होतं. श्वासाइतकेच हृदयस्थ होणारे आलाप... आरोह... अवरोह... राग... रागिण्या... बंदिशी... ताल...

**''तू मला काय दिलं आहेस याची कल्पना नाही पोरी! तुम्ही दोघांनी माझा वसंत पुन्हा मिळवून दिलाय. देवाच्या शापानं तारुण्यातील गाणं माझ्या गळ्यातून गेलं. तुमच्या गळ्यातून ते मला पुन्हा मिळतं बघ.''**

जिच्या शरीराच्या नसानसातून मल्हार, तोडी, पूरिया, यमन, मालकंससारखे राग वाहत आहेत, अशा अपालाचं रूढ रूप मात्र साधंसुधंच आहे. सावळा, सतेज वर्ण, नीटस चेहरा, सर्वसामान्य बंगाली मुलीसारखी राहणी. काहीसा मवाळ स्वभाव. यश, ईर्षा, अहंकार, प्रसिद्धी या कशाचाच हव्यास नाही. फक्त गाणं गाणं महत्त्वाचं. अपालाचे घर अगदी पारंपरिक. तिला वडील नाहीत. भाऊ प्रद्योत डॉक्टर झालेला युवक. आई सुनीताबाई पतीच्या निधनानंतर दीराकडे मुलांसह वास्तव्य करून आहेत. अपाला काकांच्या घरातच राहते. काका अविवाहित.

**गंधर्वलोक! तिथून देवगंधर्व विश्ववसू संगीतामृत सुरक्षित आहे की नाही हे पाहात असतो. तिथून मनाच्या आनंदातून सर्जन होतं आणि आनंदातून प्रतिभा फुलते. म्हणून तिथं बेसूर-बेताल यांना स्थानच नाही.**

पण त्यांची एक विशिष्ट पारंपरिक विचारसरणी आहे. दीरांच्या घरात राहत असल्याने सुजाताबाई कुटुंबप्रमुख दीरांच्या मर्जीनुसारच घर चालवतात. मुलांच्या बाबतीत निर्णयही दीराच्या विचारानुसारच घेतात.

अपालाच्या गाण्याबद्दल काकांना कौतुक असते. परंतु 'प्रेमचंद बडाल स्ट्रीट' सारख्या वाईट भागात गाणं शिकायला जाणं किंवा स्पर्धेतील तिचं गाणं ऐकून नाजनीन बेगमकडे ठुमरी-गजल शिकण्यासाठी तिची निवड झाली, तरी नाजनीनकडे गाणं शिकणं अशा गोष्टी अपालाच्या काकांना, पर्यायानं सुजाताबाईंना मंजूर नसतात. गाणं गाण्याच्या कंसातच रहायला हवं. त्यानं जीवन व्यापता कामा नये. आणि म्हणूनच शिवनाथ या सी.ए. असलेल्या, सरकारी नोकरीत अधिकारी असलेल्या घरंदाज तरुणाने अपालाला मागणी घालणं, तेही तिचं स्पर्धेतलं गाणं ऐकून... याहून अपालाच्या जीवनाला सार्थ करणारं काय असणार? अपालाची संगीताची जाण कळूनच शिवनाथने तिला मागणी घातलेली असते. अपालाची मात्र राजाराणीचा रूढ संसार करण्याची मनाची तयारी नसते. मल्हार रागाच्या विविध रूपातला स्वरमल्हारच तिच्या जीवाचा सखा असतो. अपाला लग्नाला तयार होते, ती नाइलाजानं.

रामेश्वरबाबू या संगीत शिक्षकाची कहाणीही कादंबरीत त्रोटकपणाने आली तरी चटका लावणारी आहे. रामेश्वरने वयाच्या पंधराव्या वर्षीच 'प्रॉडिजी' म्हणून भारतभर ख्याती मिळवली. गायक म्हणून लहान वयात प्रसिद्धी मिळवली. पण त्यांचा आवाज फार काळ टिकला नाही. पुढे ते गायक म्हणून पहिल्या श्रेणीतले राहिले नाहीत. तरी गानशिक्षक म्हणून अव्वल राहिले. विद्यार्थ्यांना भरभरून स्वर देणारे. रामेश्वरांना संगीताबद्दल गर्व नव्हता. 'गंधर्वलोक! तिथून देवगंधर्व विश्ववसू संगीतामृत सुरक्षित आहे की नाही हे पाहात असतो. तिथून मनाच्या आनंदातून सर्जन होतं. आणि आनंदातून प्रतिभा फुलते. म्हणून तिथं बेसूर-बेताल यांना स्थानच नसतं. तिथं तालभंग झालेला चालत नाही तसा तालगर्वही चालत नाही' अशी श्रद्धा असणारे आणि विद्यार्थ्यांना या श्रद्धेचा प्रसाद वाटणारे रामेश्वर. त्यांच्या घरात सोळा वर्षांची कन्या मितुल आहे. अवखळ, अल्लड, थोडी शिष्ट, ही मितुल गुरूजींची लाडकी लेक गाण्याच्या जगात वाढत असली तरी गाण्यात



समरसलेली नाही. तिची आई, गुरूजींची पत्नी, मितुल लहान असतानाच गुरूजींच्या शिष्याबरोबर पळून गेलेली आहे. मितुलचा सांभाळ गुरूजीच करतात. गुरुजी तरुण असताना ज्या गुरूकडे शिकायला गेले त्या उतारवयातल्या गुरूजींची मितुलची आई पत्नी होती. ती रामेश्वरांबरोबर मितुलला घेऊन घर सोडून पळून आली होती. मितुलच्या आईची, रामेश्वरांची आणि मितुलची कहाणी अशी दुनियादारीशी विसंगत आहे.

(पुढे मित्तुल ही एका फ्रेंच चित्रकाराची मुलगी असून मितुलच्या पित्याच्या शोधात तिची आई सैरावलेले जीवन जगत होती. असा भाग उत्तरार्धात येतो.)

**प्रस्तुत कादंबरी अपाला या व्यक्तिरेखेभोवती फिरणारी असली तरी इतर व्यक्तिरेखाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. केवळ पार्श्वभूमीपुरत्या मर्यादित नाहीत. सर्व व्यक्तिरेखांचं नातं मात्र आहे स्वर आणि सुरांशी.**

प्रस्तुत कादंबरी अपाला या व्यक्तिरेखेभोवती फिरणारी असली तरी इतर व्यक्तिरेखाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. केवळ पार्श्वभूमीपुरत्या मर्यादित नाहीत. सर्व व्यक्तिरेखांचं नातं मात्र आहे स्वर आणि सुरांशी. रामेश्वरांचे दोन आवडते शिष्य म्हणजे अपाला आणि सोहम. सोहम अत्यंत श्रीमंत घरातला आहे. त्याचे भाऊ, वडील भरपूर कमाई करणारे आहेत. त्यामुळे सोहमला उदरनिर्वाहासाठी काही करण्याची गरज नाही. स्वरसाधनेत तो मग्न असतो. अपाला सोहमचं नातं प्रेमाचं, विश्वासाचं, पण अनाम. सोहम मितुलवर प्रेम करतो आहे, पण मितुल प्रेमाचा अर्थ करण्याइतकी, संगीताची गहनता जाणण्याइतकी मॅच्युअर नाही. रामेश्वरांची आणखी एक शिष्या दिपाली ही कनिष्ठ मध्यमवर्गातली. संगीताच्या सर्वच प्रकारात गती असणारी. उदरनिर्वाहासाठी संगीताच्या शिकवण्या करणारी. दिसायलाही सुंदर दिसणारी दिपाली सोहमवर प्रेम करते. एकतर्फीच. आणि गरिबीला छेद देऊन सोहमच्या श्रीमंत घरातली सून होण्याचं स्वप्न पाहते. त्यापायीच ती सोहमला मितुलबद्दल म्हणजे तिच्या अनौरसपणाबद्दल आणि तिला 'सिन्हा'बद्दल असलेल्या (वास्तवात नसलेल्या) आकर्षणाबद्दल सांगते आणि मितुलवर प्रेम करणारा सोहम सैरभैर होतो. प्रथम सैरभैर आणि नंतर थेट मनोरूग्ण. खोलीत कोंडून घेतलेला. वस्तू फेकणारा, अन्नत्याग करणारा. त्याच्या या अवस्थेतून बाहेर काढते ती अपाला. सोहमची ही अवस्था पाहून दिपालीने त्याच्या घराचा रस्ता कधीच बंद केला.

सोहमला या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी अपालाला पहिल्यांदा घरच्या

**कला, संगीत आणि सांसारिक जीवनातील समस्या यांचा घनघोर मानसिक संग्राम अपालाच्या अंतर्मनात चालू होता. त्याचा परिणाम काय झाला? मनाला चटका लावणारा शेवट हा वाचकाला विलक्षण अस्वस्थ करतो.**

लोकांशी लढत द्यावी लागली. कारण तिचं लग्न पक्कं झालं होतं. मुहूर्त जवळ आला होता. लग्नाची जय्यत तयारी चालली होती. मनाजोगं स्थळ मिळालं म्हणून काका, डॉक्टर झालेला भाऊ प्रद्योत, आई सुजाताबाई संतुष्ट होत्या. अशात एका परक्या तरुणाकडे (सोहम) दररोज जायचं? घराला हे मंजूर नव्हतं. तरी अपाला सोहमकडे जात राहिली आणि 'संगीत' या तीन अक्षरांनीच सोहमला फिरून माणसात आणलंन. सोहम अपालाचं एक नवंच नातं जन्माला आलं. आरोह-अवरोहांइतकंच जवळचं. परंतु स्वतंत्र अस्तित्व असलेलं. त्यानंतर अपाला शिवनाथचं लग्न होऊन, अपाला एका साध्या, पारपंरिक घरात सून म्हणून येते. शिवनाथला गाणं प्रिय होतं. परंतु अपालाने गाणं पतीसाठी(च) म्हणावं असं त्याला वाटे. सासरच्या घरची माणसं वाईट मुळीचच नव्हती. आपल्या लेकानं ही काळीबहू घरी आणावी? हार्मोनियम, सूर, ताल, गाणं, यांत रमणारी सून त्यांना फारशी प्रिय नव्हती. कुणी पाहुणा आला तर 'म्हण ग गाणं' असं सासूबाई म्हणत. पण त्या घराला मालकंसच्या स्वरांपेक्षा 'कचोऱ्या' सुबक करणारी सून मंजूर होती. कीर्तीमान गायिका अपाला दत्तगुप्त रियाज, मैफली, सूर, स्वरांपासून दूर होत चालली. पहिला मुलगा 'रणो' प्रीमॅच्युअर बेबी. त्याचं संगोपन संपता संपताच टिटो आणि बनी या पाठोपाठच्या मुली. (अपालाने त्यांची नावे सोहनी आणि सहाना ठेवली) पाठोपाठ बाळंतपणं, घरचे रीतीरिवाज, कामधाम, यात अपालाचे गाणे मागे पडते. शिवनाथ कामात व्यस्त. हळूहळू अपाला मिटत जाते. जगाच्या दृष्टीने सुखी संसार असूनही ही गांधर्वी उमलत नाही.

मितुलने आता स्वर गोड नसतानाही सुरांवर हुकुमत मिळवली आहे. मितुल यशस्वी कलाकार आहे. आता ती 'मॅच्युअर' झाली आहे. अपालाच्या गुणांची खरी ओळख तिला पटली आहे. मितुलला कलेचा कुठलाच प्रकार वर्ज्य नाही. न शिकताही ती नृत्य उत्तम करते. आकर्षक रूप तिला आहेच. म्हणूनच गायिकेच्या जीवनावरचा चित्रपट ती अभिनेत्री आणि गायिका म्हणून स्वीकारते. आणि निर्मात्याला आग्रहाने शास्त्रीय गाण्यांसाठी म्हणून अपालाला घ्यायला लावते. अपाला दत्तगुप्त! इतके दिवस ही गुणी गायिका होती कुठे? जगाला पत्ताच नव्हता.



कला, संगीत आणि सांसारिक जीवनातील समस्या यांच्या घनघोर मानसिक संग्राम अपालाच्या अंतर्मनात चालू होता. त्याचा परिणाम काय झाला? मनाला चटका लावणारा शेवट हा वाचकाला विलक्षण अस्वस्थ करतो तरीही उंचावत जाणाऱ्या स्वराप्रमाणे एका उंचीवरही नेतो. त्यासाठी ही कादंबरी प्रत्यक्षच अनुभवायला हवी.


**-डॉ. सुवर्णा दिवेकर**

**पृष्ठे : २२४ ● किंमत :१७०रु. ● सभासदांना :१२८रु. ● पोस्टेज :२५रु.**

# पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय

**बी. जी. देशमुख**

**अनुवाद**
**अशोक पाध्ये**




**४०० रु.**

पोस्टेज ३५ रु.

पुण्यातील बी. जी. देशमुख आय. ए. एस. होवून **'कॅबिनेट सेक्रेटरी'** या सर्वोच्च हुद्यापर्यंत पोचले. तीन पंतप्रधानांबरोबर त्यांनी काम केले. या ३३ वर्षात त्यांनी अनुभवलेल्या खळबळजनक व पडद्याआडच्या घटनांची ही हकीकत.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# आंधळ्याचे डोळे

## दृष्टिहीनतेचे प्राक्तन धैर्याने स्वीकारणाऱ्या वेद मेहता यांची हृद्य व बोधप्रद गाथा

**अनु. शांता ज. शेळके**

'आंधळ्याचे डोळे' हा वेद मेहतांच्या 'फेस टू फेस' या आत्मचरित्राचा शांताबाई शेळके यांनी केलेला रसाळ अनुवाद. प्रतिकूल परिस्थितीत खचून न जाता, दृष्टीहीनतेचे प्राक्तन वास्तव म्हणून स्वीकारून, ज्ञानार्जनाच्या नव्या मार्गांचा कायम शोध घेणारे व डोळसांपेक्षाही आलेल्या संधीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणारे वेद मेहता व त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असणारे त्यांचे वडील यांची ही गाथा अतिशय हृद्य व बोधप्रद आहे. १९३४ साली जन्मलेले वेद मेहता साडेतीन वर्षांचे असताना मेनिन्जायटिसने दृष्टी गमावतात तेव्हापासून ते त्यांची अमेरिकेत पहिली पदवी संपादन होईपर्यंतचा साधारण बावीस वर्षांचा कालखंडच ह्या चरित्रात आहे. त्यावेळची त्यांची कौटुंबिक परिस्थिती, आजूबाजूची सामाजिक परिस्थिती, राजकारणाच्या चढउतारांनी ढवळून निघालेले पंजाबातले अस्थिर जीवन, त्यांच्या कर्तव्यनिष्ठ वडिलांनी न डगमगता घेतलेले फाळणीच्या वेळचे निर्णय, स्वातंत्र्योत्तर परिस्थिती, तत्कालीन अमेरिकन जीवनपद्धती व मूल्ये यांचे ह्या आत्मचरित्रामुळे अतिशय बोलके चित्र वाचकांपुढे उभे राहते. मूळच्या आशयाला धक्का न लावता, भाषांतरानंतरही तसाच अर्थगर्भ परिपाक वाचकांपुढे नेण्याचे शांताबाईंचे कसब वादातीतच आहे. ही ह्या अनुवादाची तृतीय आवृत्ती निघते आहे. ही मूळ लेखक व अनुवादकर्ती यांच्या प्रतिभेला मिळालेली वाचकांची पावतीच आहे.

वेद मेहतांचे पणजोबा पंजाबात रावी नदीकाठच्या एका खेड्यातील प्रतिष्ठित व दातृत्ववान आसमी होते. मृत्युसमयी आपली अर्धी जमीन गावच्या ब्राह्मणांना त्यांनी दान केली व अर्धी वेद मेहतांच्या आजोबांच्या– लालाजींच्या– नावे करून कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. लालाजींवर स्वत:च्या व पाठच्या दोन



भावांच्या कुटुंबांची जबाबदारी आली. तरीही आपल्या सर्व मुलांना त्या काळात त्यांनी कॉलेज शिक्षण दिले. एवढेच नव्हे तर परदेशातही पाठवले. वेद मेहेतांचे वडील लाहोरला किंग एडवर्ड मेडिकल कॉलेजमधून डॉक्टर झाले. नंतर लंडन युनिव्हर्सिटीतून 'सार्वजनिक आरोग्य' या विषयाचे शिक्षण त्यांनी आश्चर्यकारक अल्पावधीत संपवले. ते उत्तम खेळाडू व राजकारणात गांधीजींबद्दल आदर बाळगणारे होते. भारतात परतल्यावर ते सार्वजनिक आरोग्यखात्यात म्युनिसिपल हेल्थ ऑफिसर म्हणून रुजू झाले. याउलट वेद मेहतांच्या आईचे शिक्षण तत्कालीन प्रथेप्रमाणे आठव्या इयत्तेतच थांबले व उत्तम गृहिणी व माता बनण्याचे शिक्षण त्यांना देण्यात आले. तीन मोठ्या बहिणी व एक मोठा भाऊ यांच्या पाठीवर वेद मेहतांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मानंतर एक लहान भाऊ व बहीण यांचाही जन्म झाला. वेद साडेतीन वर्षांचे असताना मेनिन्जायटिसच्या आजारात त्यांची दृष्टी गेली. आईच्या मतिनुसार वडिलांच्या नकळत तिने हकीम, वैदू, सुरमे, अंजने, देवदेव इत्यादी उपाय वेदवर सुरू केले. वेदच्या वडिलांच्या ते लक्षात आल्यावर ते आईला खूप रागावले व असे उपाय त्यांनी बंद केले. याउलट आपला मुलगा आता आंधळा झाला आहे व या आपत्तीचा धैर्याने स्वीकार करून यातूनच त्याला शिकून स्वावलंबी बनण्याचा मार्ग शोधला पाहिजे या दृष्टीने त्यांनी अंधांसाठीच्या शिक्षणासंबंधी माहिती मिळवायला प्रारंभ केला. खूप शोधानंतर दादरच्या अंधशाळेतील अमेरिकन प्रिन्सिपॉल हॉल्डर यांच्याशी त्यांनी संपर्क साधला व आपल्या साडेचार वर्षांच्या चिमुकल्या वेदला तेथे शिक्षणासाठी ठेवण्याचा कठीण निर्णय त्यांनी घेतला.

**वेद साडेतीन वर्षांचे असताना मेनिन्जायटिसच्या आजारात त्यांची दृष्टी गेली. आईच्या मतिनुसार वडिलांच्या नकळत तिने हकीम, वैदू, सुरमे, अंजने, देवदेव इत्यादी उपाय वेदवर सुरू केले.**

आपल्या अंध अवस्थेबद्दल वेद मेहता म्हणतात : ''माझ्या जगात आता सूर्यप्रकाशाचा सोनेरी झोत, इंद्रधनुष्याचे झगझगीत रंग, सूर्यास्ताची लालभडक शोभा किंवा रुपेरी चंद्र यांना महत्त्व नव्हते, तर उन्हाचा चैतन्यमय स्पर्श, हळूहळू पडणाऱ्या पावसाची टिपटिप, रात्र होण्यापूर्वी येणारी वाऱ्याची शीतल झुळूक, एखाद्या सुरेख सकाळी हवेत भरणारा कापलेल्या गवताचा वास या गोष्टींना तेथे जास्त मोल होते.''

वेद दादरच्या अंधशाळेत आल्यावर डॉ. हॉल्डर त्याच्यावर व्यक्तिश: नजर

**शिक्षण हे जीवनाचे साध्य होऊ शकत नाही. प्रगत, उन्नत आणि उपयुक्त असे आयुष्य घालविण्याचे ते एक साधन आहे. आणि निश्चित ध्येय डोळ्यांपुढे नसेल तर शिक्षण साहाय्यकारी होण्याऐवजी त्याची एक अडचणच होऊन बसते.**

ठेवत. वेद त्यांच्या घरीच जेवे. तसेच वेद वर नजर ठेवायला देवजी नावाचा मोठा अंध मुलगा सोबत असे. तरीही या चिमुकल्याने शाळेची शिस्त बाणवली. स्वत: बिछाना घालणे, बुटांना पॉलिश करणे, तुटलेली बटणे शिवणे, घंटेच्या टोल्याबरोबर उठणे अंगवळणी पडले. भुसा भरलेले पशुपक्षी हाताळून, त्यांचा आकार मनात पक्का करून त्यांचे आकार व नावे यांची बिनचूक सांगड घालणे, लाकडी मण्यांच्या सहाय्याने आकडे मोजणे, गणित, गुणाकार-भागाकार, वाफ्यात भाजी लावणे व बागेची मशागत करणे, ब्रेलच्या सहाय्याने इंग्रजी लिहिणे-वाचणे, पोटात घंटा असलेल्या चेंडूने खेळणे, पत्ते, बुद्धिबळे अशा अनेक गोष्टी वेद दादर अंधशाळेत शिकला. तसेच देवजी व डॉ. हॉल्डर यांच्या सहवासाने ख्रिस्ती धर्मीयांबद्दल त्याला बरीच माहिती मिळाली. बोस्टन जवळ पर्किन्स इन्स्टिट्यूट ही अंधांसाठी सर्वोत्कृष्ट संस्था आहे हा बोध झाला. वेदसाठी तेथे प्रवेश मिळवण्याचे डॉ. हॉल्डरनी खूप प्रयत्न केले. पण यश आले नाही. दादरच्या मुक्कामात वेदला तेथील रोगट हवा न मानवून मलेरिया, टाइफॉइड इत्यादी जीवावरचे आजारही होऊन गेले. साधारण चारपाच वर्षे तेथे काढून वेद वडिलांकडे परत गेला. यानंतर घरात गायनमास्तरांच्या शिकवणीपलीकडे शिक्षण थांबले.

दादरच्या शाळेतील अनुभव वेदने अत्यंत चित्रदर्शी भाषेत कथन केले आहेत. मुलांमधील हेवेदावे, नवीन प्रवेश घेतलेल्या मुलाला दिला जाणारा त्रास आणि वेदची हुशारी जाणवण्यावर त्याला मिळणारी आपुलकीची वागणूक याचे सुंदर चित्र या प्रकरणात रेखाटले आहे.

ज्ञानासाठी तडफडणारा वेद लाहोरला मेहतांचा मुक्काम असताना इमर्सन इन्स्टिट्यूट या अंधशाळेत सहासात महिने गेला. तेथे ब्रेल, वेतकाम, संगीत याशिवाय प्रिन्सिपॉल खन्नांच्या स्वत:च्या शिकवणीखाली इतिहास, इंग्रजी इत्यादी विषय शिकला. प्रिन्सिपॉल खन्नांनी वेदच्या विचारांना एक दिशा दिली. निश्चित दृष्टीकोन दिला हे स्पष्ट करताना वेद म्हणतो, ''आत्तापर्यंत माझ्या भविष्याबद्दल मी फक्त 'नकारात्मक' विचार केला होता. म्हणजे आपल्याला काय करायचे नाही एवढेच मी ठरवले होते. मला पानवाला, फेरीवाला किंवा भिकारी व्हावयाचे नव्हते. पण पुढे आपल्याला निश्चित कोण व्हायचे आहे, काय करायचे आहे हेही



माहीत असणे आवश्यक होते. माझ्या वडिलांनी शिक्षणाचे महत्त्व मला चांगल्या रीतीने पटवून दिले होते. पण शिक्षण हे जीवनाचे साध्य होऊ शकत नाही. प्रगत, उन्नत आणि उपयुक्त असे आयुष्य घालविण्याचे ते एक साधन आहे. आणि निश्चित ध्येय डोळ्यांपुढे नसेल तर शिक्षण साहाय्यकारी होण्याऐवजी त्याची एक अडचणच होऊन बसते हे खन्नांनी मला दाखवून दिले.''

**वेदचे वडील फाळणीत आपली आयुष्याची कमाई लाहोरला सोडून आले होते. तीन मुली व तीन मुलगे यांची शिक्षणे व लग्ने होणे बाकी होते. नोकरीची थोडी वर्षे उरली होती. तरीही वेदला अमेरिकेत शिकायला पाठवण्याची वडिलांची जिद्द जागी होती.**

या सुमारास स्वातंत्र्य, फाळणी, रक्तपात, लाहोरचे रक्तरंजित अस्थिर वातावरण इत्यादीतून मेहता परिवार जीवानिशी बाहेर पडला. सर्व कमाई लाहोरला सोडून यावे लागले, पण सर्वजण सुखरूप वाचले. स्वातंत्र्यानंतर वेदच्या वडिलांचे सिमल्याला पोस्टिंग झाले. या वेळेपर्यंत वेद चौदा वर्षांचा झाला होता. दादर अंधशाळेतील साडेतीन-चार वर्षे व लाहोरचे पाचसहा महिने यावर वेदचे शिक्षण थांबले होते. पुढील ज्ञानार्जनासाठी त्याचा अंतरात्मा तडफडत होता. वडिलांचे प्रयत्न चालूच होते. सरतेशेवटी डेहराडूनला सेंट डन्स्टन हॉस्टेल या युद्धात अंध झालेल्या सैनिकांसाठीच्या संस्थेत ब्रेल व टंकलेखन शिकण्यासाठी वेदला प्रवेश मिळाला. तेथे त्याचे इंग्रजी सुधारते. ब्रेल लायब्ररीचा उपयोग करून त्याने खूप वाचन केले व त्याचे मन प्रगल्भ झाले. तेथे आठ महिने राहून तेथे शिकण्यासारखे सर्व शिकून वेद सिमल्याला परतला.

यावेळची एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी म्हणजे वेदचे वडील फाळणीत आपली आयुष्याची कमाई लाहोरला सोडून आले होते. तीन मुली व तीन मुलगे यांची शिक्षणे व लग्ने होणे बाकी होते. नोकरीची थोडी वर्षे उरली होती. तरीही वेदला अमेरिकेत शिकायला पाठवण्याची वडिलांची जिद्द जागी होती. भारतात आणखी अंध शिक्षण उपलब्ध नव्हते व हा एकच मार्ग शिल्लक होता. वेदने ब्रेलच्या प्रकाशन संस्थांकडून अंध शिक्षण संस्थांची यादी मिळवून अर्ज पाठवण्याचा सपाटा लावला. अनेक ठिकाणी नकार आल्यावर अर्कान्सस अंधशाळेने त्यांना प्रवेश व थोडी फीची सूट देणारे पत्र पाठवले. तेथे वेदला बारावीपर्यंतच्या शिक्षणाच्या जोडीला संगीत, व्यायाम व व्यवसाय यांचे शिक्षण मिळणार होते. पंधराव्या वर्षी हा अंध युवक एकटा शिक्षणासाठी अमेरिकेत पोहोचला. न्यूयॉर्कमध्ये महिना काढून वेद अर्कान्सस अंधशाळेत पोहोचला.

> 'कॉलेजच्या इमारतीत मी काही हाती न घेता वावरत असे याबद्दल मला कितीतरी जणांनी वारंवार छेडले. मला काठीची खरोखर आवश्यकता वाटत नसे हे काही मी त्यांना पटवून देऊ शकलो नाही.'

येथे अमेरिकन जीवनपद्धतीशी पंधरा वर्षांच्या व जगाच्या दुसऱ्या टोकाकडून, वेगळ्या धर्म, भाषा, संस्कृतीतून आलेल्या वेदने छान जुळवून घेतले.

वेदला येथे नववीत प्रवेश दिला असला तरी गणितात तो खूप मागे होता. तरी पाचवी-सहावीच्या गणिताच्या वर्गात बसून ती त्रुटी वेदने भरून काढली. ब्रेलचेही खूप वाचन केले. नागरिकशास्त्र, व्यायाम, पियानो, इंग्रजी यांची गोडी लागली. याखेरीज 'सोशल ॲडजस्टमेंट' नावाचा कोर्स त्यांना शिकवत. त्यात डोळसांच्या जगात आत्मसन्मानाने कसे वावरावे याचे प्रशिक्षण असे. पोशाखाचे संकेत, टेबल मॅनर्स, चेहऱ्याचे स्नायू संवेदनाक्षम बनवून हवेच्या दाबाच्या फरकावरून वाटेतले अडथळे ओळखणे, सूर्याच्या गालाला होणाऱ्या स्पर्शावरून पूर्व-पश्चिम ओळखणे वगैरे शिकवत. गावात डोळस मार्गदर्शकाबरोबर जाऊन एकट्याने कामे करून बसने परत येणे अशा अनेक गोष्टी करून घेत. वेदने येथे ग्रामोफोनवर एका नामांकित नटाच्या आवाजात ध्वनिमुद्रित केलेल्या अनेक कादंबऱ्यांच्या रेकॉर्डस् ऐकल्या. प्रथमच फील्डिंग, प्रूस्त, रोलाँ, डोरोव्हस्की, टॉलस्टॉय अशा महान साहित्यिकांच्या कलाकृतींशी वेदचा परिचय झाला. त्याचे विचारांचे, भावनांचे क्षितिज विस्तारले. शाळेत विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आले. पोहायला शिकले. सुटीत आइस्क्रीम पार्लरमध्ये नोकरी केली. सुट्ट्यांमध्ये अमेरिकेत खूप भ्रमंती केली. अर्कान्सास अंधशाळेतून त्यांनी पास झालेल्या मुलांमध्ये सर्वप्रथम येऊन पारितोषिक व हायस्कूल डिप्लोमा मिळवला.

अमेरिकेतील विविध धनिक व उदार व्यक्तींना व संस्थांना भेटून कॉलेज शिक्षणासाठी मदत मिळवण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. शेवटी एका संस्थेने वर्षाला दीड हजार डॉलर व अभ्यासाची पुस्तके वाचून घेण्यासाठी रीडरसाठी साडेसातशे डॉलर अशी मदत दिली व वेदने कॅलिफोर्नियात पोपोना कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. आपल्या कॉलेजमधल्या सुरुवातीच्या दिवसांत वेदला अडचणींना तोंड द्यावे लागले. पण आपल्या या अडचणी त्याने मोठ्या मिश्किल आणि खेळकर ढंगात चितारल्या आहेत. तो म्हणतो, 'कॉलेजच्या इमारतीत मी काही हाती न घेता वावरत असे याबद्दल मला कितीतरी जणांनी वारंवार छेडले. मला काठीची खरोखर आवश्यकताच वाटत नसे हे काही मी त्यांना पटवून देऊ शकलो नाही. प्रारंभी बहुतेक विद्यार्थ्यांना माझ्याविषयी विलक्षण कुतूहल वाटे. हळूहळू ते कुतूहल मावळले. माझ्या आंधळेपणामुळे प्रारंभी जो बुजरेपणा मुलांना वाटत असे तो पुढे वाटेनासा झाला. पण माझ्या वागण्यातल्या सराईतपणाचे नि आत्मविश्वासाचे आश्चर्य वाटे. मला दारे-खिडक्यांच्या जागा अचूक कळत. मी पायऱ्यांवरून कधीही अडखळून पडत नसे. गटार कोठे आहे, रस्त्याचे वळण कोठे आहे, हे सारे मला ठाऊक असल्याचे पाहून त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नसे. आंधळ्या माणसांना चेहऱ्याने पाहता येते असे मी त्यांना अनेकदा सांगितले पण ती गोष्ट त्यांना कधीही संभवनीय वाटली नाही.'

> **एका बावीस वर्षांच्या प्रतिभावान, सकारात्मक वृत्तीच्या, नवीन अनुभवांना उत्सुकतेने सामोरे जाणाऱ्या, अंधपणा सहजतेने स्वीकारून त्याचे भांडवल न करणाऱ्या वेदने या अल्पवयात विविध अनुभवांचे भांडार वाचकांपुढे ठेवून जीवनाचे सखोल व भेदक दर्शन घडवले आहे.**

१९५६ च्या जून महिन्यात वेदना पदवी मिळाली व त्यांनी ऑक्सफर्डला पुढील शिक्षणासाठी प्रयाण केले. अमेरिकेनेच हा खर्च उचलला. अमेरिकेने त्यांना विद्यावान, अनुभवसंपन्न केले. पायावर उभे केले. 'ॲटलांटिक मंथली' ह्या सुप्रसिद्ध मासिकाचे संपादक एडवर्ड वीक्स यांची वेदशी योगायोगाने भेट झाली. वेदची तीव्र आकलनशक्ती व आपले मनोभाव दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे त्यांच्या ठायी असलेले सामर्थ्य त्यांना जाणवले व त्यांनी त्याला लेखनास प्रवृत्त केले. वेद टाइपरायटरचा उपयोग करू शके व टेपरेकॉर्डरवर तासचे तास मजकूर सांगू शके व मित्राला तो उतरवून घ्यायला सांगे. अशा तऱ्हेने वेदचे 'फेस टू फेस' हे आत्मचरित्र जन्मले.

एका बावीस वर्षांच्या प्रतिभावान, सकारात्मक वृत्तीच्या, नवीन अनुभवांना उत्सुकतेने सामोरे जाणाऱ्या, अंधपणा सहजतेने स्वीकारून त्याचे भांडवल न करणाऱ्या वेदने या अल्पवयात आपल्या विविध अनुभवांचे भांडार वाचकांपुढे ठेवून जीवनाचे सखोल व भेदक दर्शन घडवले आहे. भारत व अमेरिकेचे त्यांच्या अंतचक्षुंपुढचे चित्र त्याने लेखणीद्वारे आपल्यापर्यंत असे पोहोचवले आहे की डोळसांनीही नतमस्तक व्हावे!

हे वेद मेहतांचे प्रथम पुस्तक. याला नॉर्मन कूझिन्सची सुरेख प्रस्तावना लाभली आहे. वेदने पुढे पत्रकारिता व लेखनात खूप यश मिळवले हे सांगणे नकोच!

**-सुनीती काणे**

**पृष्ठे : २५६ ● किंमत :१५०रु. ● सभासदांना :११३रु. ● पोस्टेज :२५रु.**

# स्ट्रगलर्स

**मुक्ता चैतन्य**




**९० रुपये**

**सभासदांना : ६८ रुपये**

पोस्टेज २० रु.

चित्रपटाच्या झगमगत्या दुनियेत स्टार होण्यासाठी पैसा आणि प्रसिद्धी कमवण्यासाठी आसुसलेली तरुणपिढी.

त्यांच्या जिद्दीचं, नैराश्याचं, सुखदुःखाचं एक स्वतंत्र विश्व आहे. ग्लॅमरच्या या अथांग सागरात काहीजण तरतात... काही बुडतात... तर काहीजण तो अवघा सागर व्यापून जातात. या स्ट्रगलर्सच्या दुनियेचा हा सर्वंकष वेध... कधी स्तिमित करणारा तर कधी सुन्न करणारा...

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**विश्वसाहित्यातील 'बेस्ट'**

# आयर्विंग वॅलेस




आयर्विंग वॅलेस..... अमेरिकेतील सिद्धहस्त कादंबरीकार. काळजीपूर्वक संशोधन, तौलनिक लिखाण आणि ओघवती भाषा यामुळे वॅलेसच्या एकूण सोळा कादंबऱ्यांचा खप पंचवीस कोटींच्या घरात आहे.

मूळचा शिकागो येथील असणारा वॅलेस काही काळ पत्रकार होता. 'द हॉर्स लॉफ' नावाचे लोकप्रिय सदर तो स्थानिक वृत्तपत्रातून चालवत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकन वायुदलातही त्याने सेवा केली.

लेखनाची जात्याच आवड असल्याने सुरुवातीला त्याने स्वतः काही नियतकालिकांमध्ये लिखाण चालू केले वाचकांना ते भावल्याने तो कादंबरी लेखनाकडे वळला. रशिया व अमेरिकेच्या शीतयुद्धादरम्यानचा तो कालखंड असल्याने वॅलेसच्या कादंबरीलेखनातही त्याचे प्रतिबिंब आढळले. त्याच्या बहुतांश कादंबऱ्यांचे भव्य अशा 'मोशन पिक्चर'मध्ये रुपांतर करण्यात आले व त्या चित्रपटांनाही प्रचंड प्रतिसाद मिळाला.

आयर्विंग वॅलेसच्या काही 'बेस्ट सेलर' कादंबऱ्यांचे हे उत्कृष्ट अनुवाद.




**द सेव्हन्थ सिक्रेट**

अनु. विजय देवधर

किंमत २००रु.




**सेकंड लेडी**

अनु. रवींद्र गुर्जर

किंमत १३०रु.

पोस्टेज प्रत्येकी २५रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

खास दीपावलीनिमित्त **फक्त सभासदांसाठी**

# दीप योजना

आमच्या प्रकाशनाची कोणतीही
दर्शनी २५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ८७५रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी २०००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ६००रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी १५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर
मिळवा दर्शनी ४००रु. किंमतीची पुस्तके मोफत!

---

**म्हणजेच २५००रु. द्या व ३३७५रु. ची पुस्तके मिळवा.**
**२०००रु. द्या व २६००रु. ची पुस्तके मिळवा.**
**१५००रु. द्या व १९००रु. ची पुस्तके मिळवा.**

**पोस्टखर्च वेगळा अंदाजे १००रु.**

**अंतिम मुदत ३१ डिसेंबर २००६**

योजनेचा लाभ घेण्यासाठी आजच सभासद व्हा.
संपूर्ण सूची मागवा.
योजना पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| | | |
|---|---|---|
| अभोगी | रणजित देसाई | १५०/- |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- |
| समिधा | रणजित देसाई | १००/- |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८०/- |
| आलेख | रणजित देसाई | १२०/- |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६०/- |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६०/- |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- |



| | | |
|---|---|---|
| दोन ध्रुव | वि. स. खांडेकर | १८०/- |
| क्रौंचवध | वि. स. खांडेकर | १८०/- |
| फुले आणि काटे | वि. स. खांडेकर | ६०/- |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५०/- |
| वेचलेली फुले (अनु.) | वि. स. खांडेकर | ५०/- |
| अविनाश | वि. स. खांडेकर | ५०/- |
| रानफुले | वि. स. खांडेकर | ७०/- |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५/- |
| माऊली | आनंद यादव | १२०/- |
| नटरंग | आनंद यादव | १४०/- |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११०/- |
| उखडलेली झाडं | आनंद यादव | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| उगवती मने | आनंद यादव | १००/- |
| पाणभवरे | आनंद यादव | १२५/- |
| ग्राम संस्कृती | आनंद यादव | १२५/- |
| वपु ८५ | व. पु. काळे | ६०/- |
| सखी | व. पु. काळे | १२०/- |
| रंग मनाचे | व. पु. काळे | १८०/- |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०/- |
| ही वाट एकटीची | व. पु. काळे | १२०/- |
| पाणपोई | व. पु. काळे | ५०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | व. पु. काळे | १६०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | व. पु. काळे | २००/- |
| चिअर्स | व. पु. काळे | १००/- |
| कथा ही दिवावादळाची (अनु.) | वि. स. वाळिंबे | १००/- |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३००/- |
| नेताजी (सुभाषचंद्र बोस) | वि. स. वाळिंबे | ३५०/- |
| ध्यानसूत्र | अनु. माधव कर्वे | १००/- |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही | अनु. मृणालिनी गडकरी | १००/- |
| विद्रोही | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |
| फरासि प्रेमिक | अनु. सुप्रिया वकील | २००/- |

| | | |
|---|---|---|
| चौघीजणी | शान्ता शेळके | ३००/- |
| पूर्व संध्या | शान्ता शेळके | ५०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १२०/- |
| सांगावेसे वाटले म्हणून | शान्ता शेळके | १००/- |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८०/- |
| ॲज आय सी... | अनु. माधुरी शानभाग | २००/- |
| निसर्गपुत्र (अनु.) | निरंजन घाटे | ८०/- |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३०/- |
| वेध पर्यावरणाचा | निरंजन घाटे | १५०/- |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५०/- |
| यंत्रलेखक | निरंजन घाटे | ११०/- |
| फार फार वर्षापूर्वी | निरंजन घाटे | १२०/- |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १००/- |
| विदेशी विज्ञान चित्रपट | निरंजन घाटे | १२०/- |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५०/- |
| हॅलो, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय | व. कृ. जोशी | १२०/- |
| रक्तदान | व. कृ. जोशी | १३०/- |
| निर्मनुष्य | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मध्यरात्रीचे पडघम | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६०/- |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७०/- |
| अन्नसंरक्षण | राजकुमार कांबळे | १२०/- |
| अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १००/- |
| अवस्था | अनु. उमा कुलकर्णी | ११०/- |
| डोंगराएवढा | अनु. उमा कुलकर्णी | ८०/- |
| नियती | माधवी देसाई | ६०/- |
| धुमारे | माधवी देसाई | ७०/- |
| किनारा | माधवी देसाई | ९०/- |
| शुक्रचांदणी | माधवी देसाई | १००/- |
| अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| वडवाई | अंजनी नरवणे | २००/- |
| तत्त्वमसि | अंजनी नरवणे | १४०/- |
| टेक् २५ | अनु. अंजनी नरवणे | ४००/- |
| गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |



| | | |
|---|---|---|
| काँगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६०/- |
| डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन | अनु. माधव कर्वे | २२०/- |
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| द फोर्थ के : मारिओ पुझो | अनु. वनिता सावंत | २००/- |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द हॉट झोन : रिचर्ड प्रेस्टन | अनु.डॉ.प्रमोद जोगळेकर | २००/- |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५०/- |
| द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १००/- |
| द ब्लाइन्ड असॅसिन : मार्गरेट ॲटवूड | अनु. चारुता नानिवडेकर | २५०/- |
| चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट : जॅक कूपर | अनु. सिंधू जोशी | १३०/- |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | अनु. भारती पांडे | १००/- |
| शिवा डान्सिंग : भारती कर्चनर | अनु. मंजुषा गोसावी | २५०/- |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/कानिटकर | ८०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| स्पीड पोस्ट : शोभा डे | अनु. अपर्णा वेलणकर | २५०/- |
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५०/- |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५०/- |
| अंतर-पर्व (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १३०/- |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३०/- |
| इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् : झुंपा लाहिरी | अनु. भारती पांडे | १७०/- |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया : नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३००/- |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४०/- |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६०/- |
| थॉट लीडर्स : श्रीनिवास पंडित | अनु. वकील / वाडकर | ३००/- |
| छत्रपती राजर्षी शाहू महाराज | तु. बा. नाईक | १००/- |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५०/- |
| चेहऱ्यामागचे चेहरे | महादेव मोरे | १५०/- |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२०/- |
| जीवनयात्रा : अभिनेता-दिग्दर्शक मा. विनायक | भाई भगत | १५०/- |

| | | |
|---|---|---|
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५०/- |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५/- |
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६०/- |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १००/- |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९०/- |
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| तारकांच्या विश्वात | पराग महाजनी | ३५०/- |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ६०/- |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ९०/- |
| कॉम्प्युटरच्या करामती | डॉ. बाळ फोंडके | ५०/- |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ७०/- |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २०/- |
| उष्णता | मीना किणीकर | २०/- |
| अन्न | मीना किणीकर | २०/- |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २०/- |
| रसायने | मीना किणीकर | २०/- |
| अवकाश | मीना किणीकर | २०/- |
| हवास्थिती | मीना किणीकर | २०/- |
| गती : चलन | मीना किणीकर | २०/- |
| ध्वनी | मीना किणीकर | २०/- |
| वाचनातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | १००/- |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : | अनु. मीना किणीकर | ७०/- |
| नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ६५/- |
| संभव असंभव | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ८०/- |
| मेंदू आणि वर्तन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ७०/- |
| देव?छे!परग्रहावरील अंतराळवीर | बाळ भागवत | १००/- |
| विज्ञान प्रपंच | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| ग्यानबाचं विज्ञान | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |
| नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी | सुरेशचंद्र नाडकर्णी | ८०/- |
| शेतकऱ्याचा असूड | संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले | ७०/- |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १००/- |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२०/- |
| एकवचनी | संजय राऊत | ३५०/- |
| प्रहार | प्रकाश पोहरे | १५०/- |
| आपल्या आत्म्यांची लुटालूट : अरुण शौरी | अनु. सुधा नरवणे | ३००/- |



| | | |
|---|---|---|
| द अदर साईड ऑफ सायलेन्स | | |
| उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५०/- |
| धर्मयुद्ध | डॉ. रवींद्र ठाकूर | २५०/- |
| भंडारभोग | राजन गवस | १५०/- |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५०/- |
| काट्यावरची पोटं | उत्तम बंडु तुपे | १००/- |
| वज्रकमळ घननीळ | धनंजय देशपांडे | २००/- |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६०/- |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ८०/- |
| रंगल्या रात्री | संकलनः अरुण शेवते | ८०/- |
| स्वप्नी जे देखिले | संकलनः अरुण शेवते | ९०/- |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| या सुखांनो | सुरेश नाईक | १७०/- |
| भारतीय शिल्प वैभव | सु. र. देशपांडे | १५०/- |
| ग्रामीण बोलीचा शब्दकोश | द. ता. भोसले | ११०/- |
| पत्रकारितेची मुलतत्त्वेः प्रभाकर पाध्ये | अनु. प्र. ना. परांजपे□/ | |
| | वसुधा परांजपे | ७०/- |
| चांगदेव पासष्टी | वा. पु. गिंडे | ३०/- |
| शिवार | विजय कुवळेकर | १००/- |
| ईगीन | महादेव मोरे | १५०/- |
| सामक्षा | सुमेध वडावाला(रिसबूड) | २००/- |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५/- |
| सिरसी | सतीश सुरवसे | ७०/- |
| शोधकथा इन्सपेक्टर व्ही अनंतांच्या | अनंत वाईकर | १६०/- |
| कोंडवाडा | दया पवार | ४०/- |
| उत्सव | सुप्रिया वकील | ५०/- |
| काळोख देत हुंकार | दिलीप परदेशी | ४०/- |
| नाटक | दिलीप परदेशी | १२/- |
| अखेरचा सवाल | वसंत कानेटकर | ७०/- |
| मराठी व्याकरण परिचय | राजशेखर हिरेमठ | ८०/- |
| कुसुमाग्रज/शिरवाडकर एक शोध | डॉ. द. दि. पुंडे | ७०/- |
| निवडक 'भाषा आणि जीवन' | संपा. कल्याण काळे/ | |
| | मृणालिनी शहा | २००/- |
| एकनाथांची निवडक भारुडे | डॉ. वसंत जोशी | ४०/- |

# चरित्रे / व्यक्तिचरित्रे

आधुनिक भारताचे प्रेषित

## स्वामी विवेकानंद


गौतम घोष
अनु. माधव मोर्डेकर



आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद यांची तेजोमयी जीवनगाथा

**१८०रु.**
**पोस्टेज २५रु.**

---




## नेताजी

वि. स. वाळिंबे

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अतीव साहसी व दुर्दम्य कर्तृत्वाचा सम्यक परिचय

**३५०रु.**
**पोस्टेज ३०रु.**


---

## इंदिरा

कॅथरीन फ्रँक

अनु. लीना सोहोनी

**४००रु.**
**पोस्टेज ३०रु.**




भारतीय राजकारणातील विद्युल्लता इंदिरा गांधी यांचे संपूर्ण जीवनचरित्र

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**आगामी...**




## लौकिक

महावीर जोंधळे

आपले लोकप्रतिनिधी, त्यांची जनमानसातील प्रतिमा, लोकशाही यंत्रणेविषयी त्यांची बांधिलकी याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून घेतलेला वेध


**किंमत १३०रु.**
**पोस्टेज २० रु.**

---

## जिहाद

हुसेन जमादार

जिहाद म्हणजे केवळ धर्मयुद्ध नव्हे. जी व्यक्ति सदासर्वकाळ आपल्या ध्येयाच्या धुंदीत मग्न असते, आपले धन, आपली वाणी आणि आपली लेखणी आदींनी ध्येयाच्या पूर्ततेसाठी प्रयत्नशील असते व त्यासाठी स्वत:ला शीणवत असते. ती वास्तवात 'जिहाद'च करत असते




**किंमत २२०रु.**
**पोस्टेज २५ रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## सार्धसुधं...

# अंबा निघाली खजिन्याला...

**प्रमोदिनी वडके-कवळे**

रोज सकाळी बरोब्बर सात वीसला आमच्या कंपनीची बस ठरलेल्या स्टॉपवर येते. हा स्टॉप माझ्या घरापासून बारा मिनिटाच्या अंतरावर आहे. एरवी माझं गणित कितीही कच्चं असलं तरी, रोज सकाळी घरातून बाहेर पडताना हे बारा मिनिटाचं गणित माझ्या डोक्यात 'बारा मिनिटं म्हणजे अकरा मिनिटं आणि साठ सेकंदच फक्त' इतकं पक्कं बसलेलं असतं. तिथे अर्ध्या मिलीसेकंदाचाही फरक नसतो. कारण सकाळी सातची वेळ म्हणजे माझ्यासाठी रोजचा समरप्रसंग! कोणतंही शस्त्र हातात नसताना मी घडयाळाच्या काटयांचा वेग थोपवण्यासाठी निकराने लढत असते. कंपनीची गाडी गाठायला मला ठराविक वेळेला घराबाहेर पडणं आणि ठराविक वेगाने कदमताल करणं आवश्यकच असतं. या क्रियेच्या मधे येणारा प्रत्येकजण माझा शत्रू ठरतो. या वेळात मला रेडिओवरची गाणी ऐकू येत नाहीत. फुलांचे, पदार्थांचे गंध खुणावत नाहीत. किंवा वाटेत येणारे दगडच काय पण कुत्रीमांजरं- अगदी ओळखीची माणसंसुद्धा दिसत नाहीत. जसं काही या वेळात मला कान,नाक, डोळे काहीही नसतं.

पण त्यादिवशी मात्र एक चमत्कार झाला. चपलेच्या डाव्या अंगठ्याची प्रकृती जरा गंभीर होती. म्हणून मी नेहमीच्या वेळेवर घराबाहेर पडून त्याची तब्येत सांभाळत जपून चालले होते. आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षात चालू असलेलं गाणं मला चक्क ऐकू आलं. त्यातले शब्दही माझ्या मेंदूपर्यंत पोचले... 'अंबा निघाली खजिन्याला होऽ निघाली खजिन्यालाऽ'

वेगवान चाल आणि गायकाचा खडा आवाज यामुळे ते शब्द नकळतच ऐकणाऱ्याच्या मनात घुसत होते. माझ्या मनात ते जरा जास्तच जोरात घुसले. कारण त्याच क्षणी चपलेच्या अंगठ्याने प्राण सोडला. आता इलाजच नव्हता. तीच रिक्षा करून खजिन्याच्या मोहिमेवर निघालेल्या अंबाबाईच्या सोबतीने मी पुढे निघाले. आपोआपच त्या गाण्याच्या पुढच्या ओळीही मनात शिरल्या. (अर्थात मधेच रिक्षावाल्याचा मोबाईल वाजून संभाषण सुरू झाल्यामुळे सगळे शब्द नीट सुसंगतपणे कळले नाहीत. तरीही) ते गाणं मनात रेंगाळत राहिलंच. कारण खजिना जिंकायला निघालेल्या अंबामातेने कसे सुंदर वस्त्रालंकार घातलेत, तिच्याजवळ कोणकोणती आयुधं आहेत आणि ती कुणाकुणाचा निःपात करत पुढे चाललीय याचं फार रसाळ वर्णन त्या गाण्यात केलेलं होतं. लोकगीत कम स्तोत्र असं त्या गाण्याचं स्वरूप होतं आणि त्यामुळेच रोजच्या वापरातले सहज साधे शब्द त्यात फार परिणामकारकरीत्या गुंफलेले होते. ते गाणं ऐकताऐकता मला किंचित हसू आलं. कारण मीही खजिन्याच्या मोहिमेवरच निघाले होते ना! चलनी संपत्तीचा कागदी खजिना!! मीही सकाळीसकाळी त्या अंबेसारखीच प्रसाधन वगैरे करून बाहेर पडले होते. माझ्या मार्गातही अनेक अडचणी. त्यांचा सपासप नि:पात करत माझं मार्ग आक्रमणंही अगदी त्या जगन्माता अंबेसारखंच.

गाण्यातल्या त्या अंबामातेच्या जागी स्वतःला ठेवल्यावर मला आमच्यातली कितीतरी साम्यस्थळं दिसायला लागली. केवळ माझ्यातिच्यातच नव्हे, तर आर्थिक खजिन्याच्या शोधात निघालेल्या माझ्यासारख्या अनेकजणींचं त्या आदिशक्तीशी साम्य होतं.

संसाराला आर्थिक हातभार लावण्यासाठी घराबाहेर पडणारी स्त्री ही आता कुतुहलाची किंवा कौतुकाची बाब राहिलेली नाही. महिलांनी वेगवेगळया क्षेत्रात कर्तृत्त्व गाजवणंही आता लोकांच्या पचनी पडून गेलंय. पण तरीही स्त्रीजवळची आयुधं आणि तिच्या मार्गातल्या अडचणींचा म्हणावा तितक्या गंभीरपणे विचार होत नाही. विशेषत: सर्वसामान्य नोकरी करणा-या मध्यमवर्गीय स्त्रीचा! तळागाळातल्या स्त्रियांवर होणा-या आर्थिक आणि शारिरीक अत्याचारांचं राजकीय भांडवल केलं जातं. त्यांना संघटनाचं पाठबळ जाहीर केलं जातं. त्यातून फलित किती बाहेर पडतं हा प्रश्न अलाहिदा असला तरी, त्यांच्या दुःखासमस्याटोचण्यांची नोंद तरी घेतली जाते. अगदी वरिष्ठ पदावर पोचलेल्या स्त्रियांनाही त्यांच्या म्हणून काही समस्या असतातच, पण त्यातल्या बऱ्याचशा समस्या त्या अधिकाराच्या जोरावर सोडवू शकतात. मात्र ज्या अगदीच अ-बल नाहीत आणि सगळया अडचणी टाचेखाली चिरडून मुक्त गगनभरारी मारण्याइतक्या कर्तृत्त्ववानही नाहीत अशा कामकरी मुंग्याचं काय? त्यांना मिळणारी साखर जगाला दिसते पण त्याच्या विश्वातले चिमुकले मेरूपर्वत?

बसस्टॉपवर रोज सकाळी मला एक आगळं जोडपं दिसायचं. 'ती' दिसायला तरतरीत. हसऱ्या चेहऱ्याची. अगदी व्यवस्थित आवरून पर्सबिर्स घेउन ऑफिसला जाण्याच्या तयारीत. तो दिसायला तिला शोभेसा असला तरी, पारोसा. मळकट. मद्द चेहऱ्याचा. नाईलाजाने तिच्याबरोबर आल्यासारखा. बसस्टॉपवरच्या बाकावर कितीतरी वेळ ती दोघं बसून रहायची. माझ्या मनात रोज प्रश्नचिन्हांचा पाऊस. शेवटी एक दिवस न राहवून विचारलंच तिला...

आणि तिची कहाणी ऐकल्यावर मला ती जास्तच सुंदर दिसायला लागली.

तो अतिशय कर्तबगार होता. त्या दोघांचा आंतरजातीय प्रेमविवाह झालेला. घरचे लोक तुटलेले. पण एकमेकांच्या प्रेमाभरवशावर दोघं मस्त मजेत जगत होती. अचानक ऑफिसमधल्या राजकारणाचा बळी ठरून त्याची नोकरी गेली आणि त्यामुळेच त्याला वैफल्याचा जबरदस्त झटका आला. आता तो घराबाहेर पडायलाही तयार नसतो. पण संसारासाठी तिला नोकरी चालू ठेवणं भागच

आहे. मग ती सकाळी सगळं लौकर आवरून, वेळेच्या दीडदोन तास आधी घराबाहेर पडते. त्याला घेऊन कधी बागेत, कधी बसस्टॉपवर त्याच्याशी गप्पा मारत बसते. हेतु हा की, त्याने बाहेरच्या जगाशी जुळवून घ्यावं. त्याने पुन्हा जुन्या आनंदी आयुष्यात परतावं यासाठी ती जास्तीतजास्त प्रयत्न करते. पण त्याच्यावर फारसा परिणाम नाही. भरीला तथाकथित समाजाचे तिच्यावरचे शेरेताशेरे. तिचं सौंदर्य, नवऱ्याच्या 'अशा' अवस्थेतही तिचं नीटनेटकं रहाणं, तिचा या परिस्थितीत मूल होऊ न देण्याचा निर्णय हे सगळे तिच्या नीतीमत्तेबद्दलचे कठोर निकष ठरतात आणि तिला दोषी फर्मावलं जातं. आडून मारलेले टोमणे, अज्ञानाचा किंवा सहानुभूतीचा आव आणून विचारलेले खवचट प्रश्न यांना तोंड देता देता ती अगदी रडकुंडीला येते .

'मी कशी आहे, माझं त्याच्यावर किती प्रेम आहे हे मला पूर्ण ठाऊक आहे ग. पण लोकांनी आपल्याला, आपल्या समस्यांना सहजपणे स्वीकारणं हा सुद्धा आपल्या आयुष्यातला केवढा मोठा आधार असतो ना? मग माझा काहीही दोष नसताना माझ्या पायाखालचा तो आधार का काढून घेतला जावा?' तिने कळवळून मला विचारलं.

माझ्यापाशी उत्तर तर नव्हतंच, पण तिच्या प्रश्नाला समांतर असे आणखी कितीतरी प्रश्नच होते.

आम्ही बायका काही साधुसंत नसतो. कुणी काहीही बोलू दे. माझं कातडं गेंडयाचं आहे. माझं काम मी चालूच ठेवणार. असा विचार करणं प्रत्येकीलाच नाही जमत. एखाद्या सावित्रीबाई फुले अशी जिद्द दाखवू शकतात. पण त्यांच्यामागे ज्योतिबांसारखा घट्ट मनाचा जोडीदार असतो. आम्ही सर्वसामान्य संसारी बायका! आम्हाला नवऱ्याचाही पाठिंबा शंभर टक्के नसतो. वेळ आणि प्रसंग बघून आमचा जोडीदार आमच्या बाजूने मत देणार. नाहीतर कधीकधी तोही विरोधी पक्षात जाणार. घरातली सासू, नणंद ही नातीच अशी की सुनेच्या पाठीशी उभं राहिलं तर त्या नात्यांचं पावित्र्य बिघडेल. आम्हा नोकरी करणाऱ्या बायकाना दुहेरी भूमिकेचं कौशल्य अगदी आवश्यकच असतं. कारण आम्ही जशा पूर्णवेळ कामगार असतो तशाच ( घरात नसलो तरी) पूर्णवेळ गृहिणीही असतो. दोन्ही ठिकाणी आमच्याकडून परिपूर्ण कामाची अपेक्षा केली जाते आणि आम्हीही ती जिवाचा आटापिटा करून पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतो. कारण आमचं सामान्यपण आम्हाला ठाऊक असतं आणि सामान्य स्त्रीने स्वतःच्या सुखाचा किंवा प्रगतीचा विचारही मनात आणायचा नसतो हे वेगवेगळया लेखाकथानाटकासिनेमासिरीयल्समधून सतत आमच्या मनावर बिंबवलं गेलेलं असतं.

जयश्री कुलकर्णी. वय वर्षे पन्नास. नावापासून व्यक्तीमत्त्वापर्यंत अगदी सर्वसामान्य बाई. मात्र त्यांचं काम आणि कामावरची निष्ठा असामान्य आहे. एका कंपनीच्या अकौंटस डिपार्टमेंटमधे त्या काम करतात. गेली पंचवीस वर्ष



त्यांची कंपनी त्यांच्या भरवशावर ऑडिटर्सना तोंड देत आलीय. त्यांचं काम किती चोख आहे हे वरिष्ठ अधिकाऱ्यापासून शिपायापर्यंत सगळयांनाच ठाऊक आहे. आपल्या ऑफिसबद्दल त्या खुश असतील असा माझा अंदाज होता. पण परवा रस्त्यात भेटल्या तेव्हा खूप वैतागलेल्या दिसल्या! ''माझा स्वभाव आहेच निष्ठेनं काम करण्याचा. पण त्यामागे एक भीतीही आहे.''

''भीती? कसली भीती?'' मी आश्चर्याने विचारलं.

''मला आमच्या ऑफिसमधे खूप असुरक्षित वाटतं. आपण कुठे कमी पडलो तर लगेच सगळेजणं त्याचं भांडवल करून आपली फजिती एन्जॉय करतील अशी भीती सतत माझ्या मनात असते. कारण आमच्या ऑफिसमधले पुरूष सहकारी दुस्वासापोटी माझ्या कामाबद्दलच्या निष्ठेची खिल्ली उडवतात. आपण बायका जेव्हा वेगवेगळी कामं करतो तेव्हा त्यात पूर्ण गुंतून जातो. तो खास बायकी स्वभावाचा विशेष गुणच आहे. आपण कोणतंही काम उरकायचं म्हणून करत नाही. प्रत्येक कामाशी भावनिक बांधीलकी जोडतो. पण ती बांधीलकीच कुणी लक्षात घेत नाही. पुरूष घर आणि ऑफिस असे वेगवेगळे कप्पे करून ठराविक वेळेपुरते ते बंद ठेवू शकतात. आपल्याला ते जमत नाही. ऑफिसमधल्या कामावातावरणाबद्दलही आपल्याला घरच्यासारखीच आपुलकी वाटते. म्हणूनच बघ, ज्या ऑफिसमधे बायका असतात तिथे जरी भांडणं असली तरी तिथलं वातावरण रूक्ष नसतं. आपण तिथे ओलावा आणतोच. मात्र हे कुणी समजून घेत नाही. नोकरीतून आपल्याला केवळ पैसा नको असतो, आपल्याला तिथली स्वीकृतीही हवी असते. पण ती मात्र सहजपणे नाहीच मिळत कुठल्याच ऑफिसमधे.

नोकरी करणाऱ्या स्त्रीचं स्त्री असणं, तिचं सौंदर्य, तिचं अबलपण सगळसगळं आपापल्या सोयीनुसार स्वीकारणारा समाज तिची ही भावनिक बांधिलकी का समजून घेत नाही?'' जयश्रीताई पोटतिडिकेने बोलत होत्या.

पुन्हा तोच प्रश्न.

'ती' जयश्रीताई आणि नोकरी करणाऱ्या सगळया भगिनी सगळयांचा प्रश्न एकच आहे आणि उत्तराची अपेक्षा कुणालाच नाही. कारण या असल्या प्रश्नांना उत्तर नसतात हे आता नोकरी करणाऱ्या स्त्रीला अनुभवाने कळलंय.

खजिन्याच्या मोहिमेवर निघालेल्या अंबेलाही ते कळलं असेल? तिला सुवर्णमुद्रा आणि रत्नामाणकांचं भांडार मिळालं असेल कदाचित. पण हा स्वीकृतीच्या समाधानाचा खजिना? तो तिलातरी सापडलेला असेल?

— — — — — — — — — — —

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

**बेस्ट सेलर कादंबऱ्या ... उत्कृष्ट अनुवादासह...**

येशू ख्रिस्त आणि ख्रिश्चन धर्माविषयीच्या ऐतिहासिक रहस्याचे गूढ उकलणारी थरारक, वेगवान कादंबरी

**द दा विंची कोड**

डॅन ब्राऊन

अनुवाद
**अजित ठाकूर**

३२० रु.

सनातनी राष्ट्र इराणमधील अभेद्य तुरुंगात डांबलेल्या आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुटकेसाठी एका कंपनीमालकाने केलेल्या चित्तथरारक संघर्षाची सत्यकहाणी

**ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स**

केन फोलेट

अनुवाद
**ज्योत्स्ना लेले**

२५० रु.

नवपरिणीत जोडप्यांची योजनाबद्ध हत्या करणारा विकृत खुनी आणि या खुनांचे रहस्य उलगडणाऱ्या चार धाडसी महिलांची खळबळजनक, रोमांचक कहाणी

**फर्स्ट टू डाय**

जेम्स पॅटरसन

अनुवाद
**रवींद्र गुर्जर**

२०० रु.

**पोस्टेज प्रत्येकी ३०रु. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






### * रॅमन मॅगसेसे पुरस्कार

वरिष्ठ सरकारी अधिकारी असूनही सरकारी यंत्रणेतीलच भ्रष्टाचारविरोधात जनतेला संघटित करणारे अरविंद केजरीवाल (वय ३८) यांना या वर्षीचा मानाचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला. दिल्लीतील 'परिवर्तन' या संघटनेचे प्रमुख असलेले श्री. केजरीवाल यांना 'उदयोन्मुख नेतृत्व' या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

भारतातील माहिती अधिकाराची चळवळ तळागाळापर्यंत नेण्यासाठी केलेले कार्य आणि दिल्लीतील गोरगरिबांना भ्रष्टाचारविरोधात संघटित करण्यासाठी केलेले प्रयत्न, यामुळे श्री केजरीवाल यांची निवड केल्याचे पुरस्कार संयोजन समितीने म्हटले आहे.

खरगपूर 'आयआयटी'तून १९८९ मध्ये मॅकॅनिकल इंजिनिअर झालेल्या केजरीवाल यांची १९९२ मध्ये भारतीय महसूल सेवेसाठी निवड झाली. सध्या ते प्राप्तिकर खात्यात अतिरिक्त आयुक्त या पदावर आहेत. २००० मध्ये त्यांनी सरकारी सेवेतून रजा घेऊन 'परिवर्तन' संघटनेची स्थापना केली होती. या माध्यमातून वीज मंडळ आणि प्राप्तिकर खात्याच्या विरोधात 'परिवर्तन'ने आघाडी उघडलेली आहे.

### * 'चतुरंग'चा जीवनगौरव पुरस्कार

'चतुरंग प्रतिष्ठान'च्या वतीने यंदाचा (२००६) सांस्कृतिक क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार 'ललितकलादर्श'चे अध्वर्यू आणि संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक नट नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भालचंद्र पेंढारकर यांची निवड केली असून 'ललितकलादर्श' या संस्थेचे शतकमहोत्सवी वर्ष असताना भालचंद्र पेंढारकर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर व्हावा, हा योगायोग असल्याचेही समितीने म्हटले आहे.

### * 'लता मंगेशकर पुरस्कार'

दैदीप्यमान संगीत कारकीर्दीबद्दल राज्य सरकारतर्फे देण्यात येणारा यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आणि गायिका जयमाला शिलेदार यांना जाहीर झाला. हा पुरस्कार म्हणजे नाट्यक्षेत्रातील गेल्या ६४ वर्षांच्या मेहनतीला मिळालेला आशीर्वादच आहे, अशी प्रतिक्रिया जयमालाबाईंनी व्यक्त केली.

एक लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून,

याआधीच्या दोन वर्षांतील पुरस्कारांचे मानकरी स्नेहल भाटकर आणि मन्ना डे यांच्यासह सहा ऑक्टोबर रोजी दिल्लीमध्ये त्याचे वितरण होणार आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समितीच्या बैठकीत जयमाला शिलेदार यांच्या नावाची शिफारस करण्यात आली.

लता मंगेशकर यांच्याबद्दल अतिशय आदराची भावना असून, त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिमान वाटतो, असे जयमालाबाईंनी सांगितले. जयमालाबाई ८१ व्या वर्षात पदार्पण करीत असल्यामुळे आईला वाढदिवसाची ही अमोल भेट मिळाली आहे, अशा शब्दांत त्यांच्या कन्या आणि प्रसिद्ध गायिका कीर्ती शिलेदार यांनी आनंद व्यक्त केला.

१९२६ मध्ये जन्मलेल्या जयमालाबाईंची नाट्य कारकीर्द सुरू झाली ती १९४२ पासून 'देशांतर' या नाटकाने. १६ संगीत नाटकांसह ४६ नाटकांमध्ये जयमालाबाईंनी ५२ विविध भूमिका साकारल्या.

## * महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक पुरस्कार

महाराष्ट्र शासनातर्फे निरनिराळ्या कलाक्षेत्रातील भरीव योगदानाकरिता देण्यात येणारे सांस्कृतिक पुरस्कार जाहीर करण्यात आले असून गेल्या तीन वर्षांच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये 'आविष्कार' नाट्यसंस्थेचे अध्वर्यू अरुण काकडे, मराठवाड्यातील नाट्यकर्मी त्र्यंबक महाजन, शास्त्रीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गायिका सरस्वतीबाई राणे, सईदुद्दीन डागर, अजय पोहनकर, उपशास्त्रीय संगीतात मुबारक बेगम, मणधुबाला चावला, चित्रपट अभिनेत्री शांता तांबे, अभिनेते श्रीकांत मोघे, कीर्तनकार बाबामहाराज सातारकर, तमाशा क्षेत्रातील चंद्रकांत ढवळपुरीकर, शाहिरी कलेतील जंगम स्वामी, नृत्यातील कुमुदिनी शंकर, संध्या पुरेचा, संगीतकार अनिल मोहिले आदींचा समावेश आहे. ५१ हजार रु. रोख आणि मानचिन्ह या स्वरूपातील हे सांस्कृतिक पुरस्कार १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद येथील सोहळ्यात प्रदान करण्यात येतील.

२००४, २००५ आणि २००६ सालासाठी १२ वेगवेगळ्या कला क्षेत्रात लक्षणीय योगदान दिल्याबद्दल ३६ कलावंतांची निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक मंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने पुरस्कार विजेत्यांची निवड केली. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक अजय अंबेकर यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. दरवर्षी निरनिराळ्या १२ कला क्षेत्रातील कलावंतांना या सांस्कृतिक पुरस्काराने गौरविण्यात येते.

## * आचार्य अत्रे पुरस्कार

बेळगाव येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे देण्यात येणारा यंदाचा आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार प्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार अरुण साधू यांना जाहीर करण्यात आला.



अकरा हजार रुपये रोख, मानचिन्ह व प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आचार्य अत्रे जयंतीनिमित्त १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या समारंभात ग्रंथाली चळवळीचे संस्थापक व लेखक दिनकर गांगल (मुंबई) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. वाचनालयातर्फे गेल्या वर्षापासून साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो.

## * सुलोचनादीदी यांच्या नावाची फाळके पुरस्कारासाठी शिफारस

मराठी व हिंदी चित्रपट क्षेत्रातील ज्येष्ठ कलावंत श्रीमती सुलोचना यांना दादासाहेब फाळके पुरस्कार दिला जावा, यासाठी सध्या जोरदार प्रयत्न सुरू आहेत. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री प्रियरंजन दासमुन्शी यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. महाराष्ट्रातील सर्वच पक्षाच्या खासदारांनीही या संदर्भात श्री. दासमुन्शी यांच्याकडे स्वाक्षऱ्यांचे निवेदन पाठवले असून, श्रीमती सुलोचना यांना चित्रपट जगातील प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार दिला जावा, असे सुचविले आहे. श्री. दासमुन्शी यांनीच ही माहिती प्रसारमाध्यमांना दिली. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनीही अशाच प्रकारचे पत्र पाठवले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान चित्रपट क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री सुचित्रा सेन यांच्या नावाचाही या पुरस्कारासाठी विचार केला जात असल्याचे समजते.

## * मृणालिनी गडकरी यांना अत्यंत मानाचा 'शरद पुरस्कार' जाहीर

कलकत्त्याला शरद समिती नावाची स्वयंसेवी संस्था आहे. ही संस्था अनेक सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवत असते. तसेच साहित्यिक उपक्रमही राबवत असते. विशेष म्हणजे शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या घरातच या संस्थेचे कार्यालय आहे.

१७ सप्टेंबर हा दिवस शरदचंद्रांचा जन्मदिवस असतो. शरदचंद्रांच्या नावाने पुरस्कार देऊन हा जन्मदिवस या संस्थेद्वारे साजरा केला जातो. या वर्षी शरदबाबूंच्या 'देवदास' या अजरामर कलाकृतीचा मराठी अनुवाद करणाऱ्या मृणालिनी गडकरी यांना हा शरद पुरस्कार जाहीर झाला आहे. 'देवदास' या मराठी अनुवादाला 'साहित्य अकादमी अनुवाद' पुरस्कारही यापूर्वीच प्राप्त झाला आहे. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले आहे.

रोख रुपये १०,००० व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

'शरदबाबूंच्या नावे त्यांच्या जन्मदिनी मिळणारा हा पुरस्कार म्हणजे माझ्या आयुष्यातील अनमोल ठेवा आहे', अशा शब्दात गडकरी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

❐

# २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **पांढरे ढग** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **फॉर युअर आईज ओन्ली** | | |
| : इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड** | | |
| :ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :**जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | अनु. माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **द दा विंची कोड** : डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर | ३२०/- |
| **लायन्स गेम** : नेल्सन डेमिल | अनु. अशोक पाध्ये | ६८०/- |
| **व्हाईट मुघल्स** : विल्यम डॅलरिंपल | अनु. सुधा नरवणे | ३५०/- |
| **गांधर्वी** : बाणी बसू | अनु. मृणालिनी गडकरी | १७०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्त्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |
| **परमवीरचक्र - रणांगणावरील आपले महान योद्धे** | | |
| : मेजर जनरल इयान कारडोझो | अनु. ज्योत्स्ना लेले | १८०/- |



| | | |
|---|---|---|
| **ललित** | | |
| **फुले आणि पत्री** | माधुरी शानभाग | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |
| **कलाकौशल्ये** | | |
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्ये | ५०/- |
| **लोकरीचे विणकाम** | आशा पत्रावळी | ३५०/- |
| **व्यक्तिमत्वविकसन** | | |
| **पुढाकार घ्या** | संजीव परळीकर | २००/- |
| **अनुभव कथन** | | |
| **स्ट्रगलर्स** | मुक्ता चैतन्य | ९०/- |
| **माहिती कोश** | | |
| **असे घडले सहस्त्रक** | निरंजन घाटे<br>प्रमोद जोगळेकर | ३००/- |
| **आरोग्य** | | |
| **वजन कमी करण्यासाठी योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |
| **औषधाविना आरोग्य** | डॉ. रमा /रवि मराठे | २००/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |
| **राजकीय** | | |
| **पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय** | | |
| : बी. जी. देशमुख | अनु. अशोक पाध्ये | ४००/- |
| **लौकिक** | महावीर जोंधळे | १३०/- |

**बाल वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **राजाचं गुपित आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **खरा मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **एकमेका साह्य करू आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **आजीचं घर आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **पैज जिंकली छोट्याने आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **पत्राचा प्रवास ाणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **आजीचा धडा आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **बदकाचा बूट आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |
| **गर्विष्ठ सूर्यफूल आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |

# असे घडले सहस्रक

**निरंजन घाटे**
**डॉ. प्रमोद जोगळेकर**



ह्या ग्रंथात पिरॅमिड युगापासून ते इ. स. २००० असा साधारण पाच हजार वर्षांचा मानवी प्रगतीचा पट आपल्यापुढे उलगडला आहे. विश्वाच्या कालमापनात मोजायचे झाले तर माणसानं इतक्या अल्पकाळात घेतलेली ही झेप थक्क करणारी आहे. ती इथं एकत्रित बघायला मिळेल.

**३०० रु.**
पोस्टेज ३० रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# आगामी.....



रशियन व मराठी भाषांचा अभिनव प्रीतिसंगम या साहित्यकृतीत आढळेल रशियन व मराठी या दोन भाषा, दोन देश, दोन संस्कृती यांच्या अपूर्व संगमाची अनुभूती देणारा कथासंग्रह

## आनंद भेट

**डॉ. सुनीती अशोक देशपांडे** **१२०रुपये**




रत्नाकर मतकरी यांनी मानवी मनातल्या गूढाचा घेतलेला वेध. वैशिष्ट्यपूर्ण रचना आणि हादरवणारा शेवट अशी असाधारण गुंफण असणाऱ्या या गूढकथा नव्या आकर्षक स्वरूपात

## निजधाम

**रत्नाकर मतकरी**

**१००रुपये**




आसपास घडणाऱ्या घटनांचे, आठवणींचे मनावर घडलेले संस्कार आणि त्यातून फुललेले ललितरम्य लेखन

## फुले आणि पत्री

**माधुरी शानभाग**

**१५०रुपये**

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## लेखक-वाचक हृद्य पत्रसंवाद

प्रिय श्रीधरपंत,

स.न.वि.वि.

आपले १० जूनचे पत्र काल मिळाले. उत्तर लिहायला घेणार तेवढ्यात साक्षात तुमचाच आवाज आला. वेव्ह लेंग्थ झकास जुळली. तुमच्या तत्परतेचे कौतुक करायलाच हवे. वाचक लेखकाच्याही स्नेहाचा भुकेला असतो, याचा सुखद प्रत्यय आला. तुमच्याप्रमाणेच औरंगाबादचे द्वारकाभाई पटेल यांनी ही संस्मरणीय नाते जोडले आहे. हुकलेल्या समक्ष भेटीची आस पूर्ण करणे प्राप्त आहे lets wait for that golden moment. माझे प्रकाशक व मी यात प्रसंगोत्पात वेगळा जिव्हाळा निर्माण झाला आहे. त्यामुळे मानधनात खळखळ नसते. व्यक्तिशः पैशापेक्षा स्नेहाचे मोल अधिक. अनुवादाच्या मानाबद्दल उगीचच एक संकेत पडलेला (की पाडलेला) आहे.

मी उपेक्षा समक्ष, जाहीरपणे बोलून दाखवतो. मूळ लेखकात अरुण शौरी, एन. के. सिंग, अजित वाडेकर यांची संस्मरणीय भेट झाली. एकूण साहित्यक्षेत्रात अनुवादाची अक्षम्य उपेक्षा होत असूनही आपल्यासारख्या वाचकांची या संदर्भातील दखल सुखावून जाते.

आपला

माधव मोर्डेकर



### श्रीधर वि. सहस्रबुद्धे

खरे सांगायचे तर माधव मोर्डेकर हे नाव मला मेहता पब्लिशिंगमुळेच समजले. माधवरावांनी अनेक पुस्तके अनुवादित केली आणि मेहतांनी ती प्रकाशित केली. त्यामुळेच तर अरुण शौरी, एन. के. सिंग इ. चा परिचय मराठी वाचकांना झाला. एन. के. सिंग यांच्या पुस्तकाचा अनुवाद वाचत असताना एक चपखल शब्द मला नवा वाटला. पण हा शब्द कोणत्या इंग्रजी शब्दाचा अनुवाद आहे ते जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. म्हणून मी थेट माधवरावांना पत्र पाठवले. माधवरावांचे उत्तर आले. शंकासमाधान झाले होते; पण त्यात समक्ष भेटीची इच्छा व्यक्त केली होती. पत्राच्या भाषेतला जिव्हाळा आपला होता. मी सांगलीचा असल्याने वरचेवर तिकडे जाणे असतेच. तेव्हा पत्रानुसार कोल्हापूरला माझे मित्र श्री. सुरेश राणे यांना बरोबर घेतले. पण थोडक्यात चुकामूक झाली. त्यासंदर्भातील एक पत्र सोबत दिले आहे. पत्र फार बोलके आहे.

माधवरावांना अनुवादक म्हणून प्रसिद्धी मिळाली खरी, पण एकंदर अनुवादकाची उपेक्षाच होते ही त्यांची व्यथा होती. त्यामुळे वाचकांचा संतोष उत्साहवर्धक वाटे हेच खरे. आणि म्हणून हुकलेल्या भेटीबद्दल भरपाई व्हावी म्हणून lets wait for that golden moments! हे शब्द वापरले असावेत. तेव्हा पुढील सांगलीभेटीत माधवरावांसाठी वेळ काढायचाच असा निश्चय मी केला होता. पण थोड्याच दिवसांत सुरेश राणे यांचा फोन आला, 'तुमचे अनुवादक मित्र माधवराव गेले'.

केवळ माधवरावांच्याच नव्हे तर माझ्याही Golden moment ला मी कायमचा अंतरलो. माधवराव अनुवादक असले तरी तो जिव्हाळा मात्र होता. त्याची आठवणरूप असणारे हे पत्र.

**श्रीधर वि. सहस्रबुद्धे**, पुणे.

# व. पु. काळे यांची पुस्तके



***कथा***

| | |
|---|---|
| वपु ८५ | ६० |
| संवादिनी | ७० |
| मोडेन पण वाकणार नाही | ८० |
| वलय | १०० |
| स्वर | १०० |
| इन्टिमेट | १०० |
| बाई बायको कॅलेंडर | १०० |
| वपुर्वाई | १०० |
| वन फॉर द रोड | १०० |
| हुंकार | १०० |
| गोष्ट हातातली होती! | १०० |
| कर्मचारी | ११० |
| का रे भुललासी | १२० |
| ऐक सखे | १२० |
| काही खरं काही खोटं | १२० |
| तप्तपदी | १२० |
| सखी | १२० |
| मी माणूस शोधतोय | १०० |
| दोस्त | १२० |
| महोत्सव | १३० |
| घर हरवलेली माणसं | १४० |
| भुलभुलैय्या | १२० |
| रंग मनाचे | १८० |

***वैचारिक***

| | |
|---|---|
| आपण सारे अर्जुन | ९० |

***कादंबरी***

| | |
|---|---|
| ठिकरी | ५० |
| तू भ्रमत आहासी वाया | ७० |
| ही वाट एकटीची (राज्य पुरस्कार १९७०-७१) | १२० |
| पार्टनर | १२० |

***ललित***

| | |
|---|---|
| दुनिया तुला विसरेल | ५० |
| पाणपोई | ५० |
| निमित्त | ८० |
| फॅण्टसी एक प्रेयसी | ९० |
| प्रेममयी | १०० |
| माझं माझ्यापाशी? | १०० |
| कथा कथनाची कथा | १२० |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | २०० |
| वपुर्झा | १८० |
| रंगपंचमी | २०० |

***व्यक्तिचित्र***

| | |
|---|---|
| सांगे वडिलांची किर्ती | ७० |
| चिअर्स | १०० |
| माणसं | १७० |

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## कॉलेज

छाया महाजन

सध्याच्या महाविद्यालयीन वातावरणातील मूल्यहीनतेचा सर्वंकष आलेख काढणारी, अंतर्मुख करणारी सामर्थ्यशाली कादंबरी

**किंमत २००रु.** पोस्टेज २५ रु.

## पांढरे ढग

वि. स. खांडेकर

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीच्या संस्कारांनी प्रेरित होवून, भोवतालच्या कौटुंबिक व आर्थिक पाशांना न जुमानता, ध्येयाच्या दिशेने अविचल मार्गस्थ होणाऱ्या पिढीचे वि. स. खांडेकरांनी केलेले चित्रण

**किंमत १५०रु.** पोस्टेज २० रु.

## डेअर टू पब्लिश

अनु.सुप्रिया वकील

भारतीय प्रकाशनक्षेत्राचे भीष्माचार्य दीनानाथ मल्होत्रा यांचे प्रेरणादायी मार्गदर्शक आत्मचरित्र.

**दीना एन. मल्होत्रा**

**किंमत २००रु.** पोस्टेज २५ रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# श्रद्धांजली

## * श्री. पु. गोखले

टिळक स्मारक मंदिराच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे 'टिळक स्मारक ट्रस्ट'चे विश्वस्त, लेखक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे कट्टर अनुयायी श्रीकृष्ण पुरुषोत्तम ऊर्फ श्री. पु. गोखले यांचे १ ऑगस्ट रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

टिळक पुरस्कार प्रदान समारंभाच्या व्यासपीठावर टिळक वंदनागीत सुरू असतानाच ही दुर्दैवी घटना घडली.

गोखले यांचा जन्म ३० डिसेंबर १९२० रोजी झाला. त्यांचे शिक्षण बडोद्यात आणि पुण्यात झाले. जयंतराव टिळक आणि माधवराव चिपळूणकर हे त्यांचे सहाध्यायी होते. १९४० पासून त्यांचा 'केसरी'शी संबंध होता. काही काळ त्यांनी 'अग्रणी' दैनिकामध्ये बातमीदार म्हणूनही काम केले. त्यांचे वडील पुरुषोत्तम गोखले 'अभिनव भारत' संघटनेच्या संस्थापकांपैकी एक होते.

कादंबऱ्या, नाटके आणि भाषांतरित पुस्तकांचे लेखन केलेल्या गोखले यांची पुस्तके 'लोकमान्य' आणि 'नवकमल' प्रकाशनांनी प्रकाशित केली आहेत. त्यांच्या ग्रंथसंपदेत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) अभ्यासक्रमांसाठी लागणाऱ्या आठ पुस्तकांचा समावेश आहे. 'अशी गर्जली वीरवाणी' हे त्यांनी स्वा. सावरकरांवर लिहिलेले पुस्तक गाजले. १९३७ मध्ये त्यांची सावरकरांशी भेटही झाली होती. मुंबईच्या 'स्वा. सावरकर ट्रस्ट'चे ते विश्वस्त होते. गोवा मुक्तिसंग्रामात आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी भाग घेतला होता.

## * म. दा. भट

ज्येष्ठ ज्योतिर्विद महादेव दामोदर तथा शंभूराव भट (वय ८१) यांचे दिनांक १२ ऑगस्ट रोजी पुणे येथे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

उत्तम शिक्षक असा नावलौकिक प्राप्त केलेल्या भट यांनी १९८५ मध्ये पुणे ज्योतिष परिषदेची स्थापना केली.

राजकीय आणि पर्जन्यविषयक भाकिते वर्तविण्यात भट यांचा हातखंडा होता. त्यांनी केलेले ग्रह आणि मेदिनीय ज्योतिषशास्त्रावरील संशोधन पायाभूत स्वरूपाचे मानले जाते. त्यांनी लिहिलेली 'संचितदर्शन', 'नामांशरस', 'आध्यात्मिक', 'सोहम् साधना- पंथराज', 'नवमांश रहस्य', 'हर्षल-नेपच्यून-प्लुटो', 'अमलानंददर्शन', 'स्वामी स्वरूपानंद- एक अलौकिक राजयोगी', 'सिद्ध-सिद्धांत पद्धती' आदी पुस्तके गाजली. 'संचितदर्शन' या त्यांनी विद्यार्थिदशेत असताना लिहिलेल्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. राज्यातील १००० मान्यवरांच्या कुंडल्याचे संकलन करून त्यांनी 'महाराष्ट्राचा कुंडलीसंग्रह' तयार केला. 'स्वातीचं पाणी' हे त्यांचे आत्मचरित्र. 'आगामी ग्रहयोग' हे त्यांनी 'केसरी'तून चालविलेले सदर लोकप्रिय ठरले. ज्योतिषाला वाहिलेल्या 'भाग्यसंकेत' या दिवाळी अंकाचे संपादक म्हणून त्यांनी सुमारे वीस वर्षे काम पाहिले.

## * उस्ताद बिस्मिल्ला खान

आनंदाच्या समारंभाला मांगल्याचा साज चढविणाऱ्या शहनाई या वाद्याला भारतीय अभिजात संगीताचा दर्जा देण्याचे महान कार्य करणारे उस्ताद बिस्मिल्ला खान यांचे २२ ऑगस्ट रोजी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. बिस्मिल्ला खान यांच्या निधनाबद्दल केंद्र सरकारने एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय संगीताचे स्वर गुंजत ठेवल्याबद्दल उस्ताद बिस्मिल्ला खान यांना पं. रवीशंकर व एम. एस. सुब्बलक्ष्मी यांच्याप्रमाणेच 'भारतरत्न' या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या स्मृत्यर्थ एक कोटी रुपये खर्चून संगीत अकादमी स्थापण्याचा निर्णय उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केला आहे.

दरबारी संगीत कलाकारांच्या मान्यवर घराण्यात उस्ताद बिस्मिल्ला खान यांचा २१ मार्च १९१६ रोजी जन्म झाला. त्यांचे काका अलिबक्ष विलायतू यांच्याकडून त्यांनी शहनाई वादनाचे धडे गिरविले. विलायतू हे नियमितपणे बनारसच्या काशी विश्वनाथाच्या मंदिरात पहाटे शहनाईवादन करीत असत. वयाच्या विसाव्या वर्षी (१९३६) कोलकाता येथील मानाच्या संगीत परिषदेचे बिस्मिल्ला खान यांनी जेव्हा प्रथम शहनाईवादन केले तेव्हा सारे श्रोते मंत्रमुग्ध झाले. पहिल्या स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट १९४७ रोजी बिस्मिल्ला खान यांच्या शहनाईच्या स्वर्गीय सुरांच्या हिंदोळ्यावर लहरत संसदेत प्रथम तिरंगा फडकला. पुढे २६ जानेवारी १९५० या पहिल्या प्रजासत्ताकदिनी उस्तादांच्या शहनाईचे मंजुळ स्वर लालकिल्ल्यावर घुमले. शहनाई हे वाद्य वाजवायला अतिशय अवघड आहे. ज्या फुंकरीने यातून मंगलमय सूर निघतात त्या सुरांचा गोडवा राखून त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे हे कौशल्याचे काम आहे. बिस्मिल्ला खान यांनी या वाद्यावर प्रभुत्व मिळविले होते. कोलकाता येथील मैफिलीनंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यानंतर सात दशके त्यांचे नाव संगीत क्षितिजावर तळपतच राहिले. ❒

# विचार, मन, बुद्धीचा कब्जा घेणाऱ्या सत्यकहाण्या.....

## एक झलक....




## केतकरवहिनी

उमा कुलकर्णी

ठरलेल्या तारखेला केस उभी राहिली. खरं सांगायचं तर पांडूच्या वकिलानं त्याच्या अज्ञानाचा फायदा घेतला होता. पांडूकडे असलेल्या कुठल्याशा कागदाला 'महत्त्वाचा कागद' म्हणत त्याला अज्ञानात ठेवलं होतं. त्यामुळेच तो तडजोडीच्या वेळी मस्तीत वावरला होता.

केस उभी राहिली. त्याचा वकील बरीच नाटकं करत होता. उगाच कुणाला तरी खुणाव, कुणाच्या कानात कुजबूज कर, तिसऱ्याला बोलावून घे- थोडक्यात केस बाईंच्या विरोधात जाणार अशी खात्री असल्यासारखं वातावरण तयार करत होता; पण मला संपूर्ण खटला ठाऊक असल्यामुळे मी त्याची नाटकं बघत बसले होते. माझ्या जबानीच्या वेळीही स्पष्ट शब्दांत माझी बाजू मांडली.

पांडू पुन्हापुन्हा वहिवाटीविषयी सांगू लागला तेव्हा सानेदादांनी त्याला जामलं, ''ती दांडगाईची वहिवाट आहे. त्यासाठी तू शिक्षाही भोगून आला आहेस. त्या बाईमाणूस असल्याचा तू गैरफायदा घेतला आहेस!''

अखेर ताबा मिळाला. जप्ती नेऊन ताबा घ्यावा लागला.

तीन वर्षांची नुकसानभरपाईही बरीच होती. कमी करण्यासाठी पांडूनं कृष्णाला मध्ये घातलं.

''कृष्णा हा गावचा पोलीसपाटील. मी त्याला तो अगदी लहान पोर असल्यापासून ओळखते. ज्याच्यावर शंभर टक्के विसंबून राहावं असा तो माझा उजवा हात. त्यामुळे त्याच्या मध्यस्थीनं सूट मिळेल असा पांडूला विश्वास होता.

कृष्णाही अतिशय कनवाळू. अनेकांना मदत करण्यासाठी तो नेहमीच पुढं असायचा. त्याच्या शब्दाखातर मीही अनेकांना मदत करायची. अर्थात त्यांच्या गरजाही किरकोळ पैसे किंवा धान्य अशाच प्रकारच्या असायच्या.

पण या वेळी मी कृष्णाला म्हटलं, ''अरे, मी फक्त तीन वर्षांची नुकसानभरपाई मागतेय. हा इतकी वर्षं भात खातोय! त्याला सगळी भरपाई द्यायला सांग. तिथं देईन हवी तितकी सूट!''

कृष्णालाही सगळी केस ठाऊक असल्यामुळे तोही निरुपायानं हसू लागला. मी पांडूलाही म्हटलं, ''अरे, सगळे खोत दुष्ट नसतात. मामा तुला सांगत होते, मी सांगत होते. तेव्हाच समझोत्याला आला असतास तर जमीन तुलाच राहिली नसती काय?''

याच पांडुरंगानं अंतुलेंच्या राज्यात पुन्हा रंग दाखवायला सुरुवात केली. अंतुलेंनी घोषणा केली होती, ज्यांच्या पूर्ण हक्काच्या जमिनी खोतांकडे गेल्या आहेत, त्यांनी दाद मागावी.

पांडुरंगनं पुन्हा केस केली. मला नोटीस आली. मी वैतागले. त्या वेळी गांधी नावाचे मामलेदार होते. त्यांना भेटून म्हटलं, ''या जमिनीपायी काय काय केलंय ठाऊक आहे ना? आणखी किती वर्षं चालणार हे?''

''सगळे कागद आणलेत ना?''

''होय. पण किती वर्षं हे कागद सांभाळू? यानंतर पुन्हा नोटीस आली तर वेगळ्या मार्गानं बघावं लागेल!''

म्हणाले इतकंच. प्रत्यक्षात काय करू शकणार होते मी?

अखेर, यांच्या हयातीत सुरू झालेलं प्रकरण अंतुलेंच्या राज्यानंतरही तीन वर्षं चाललं. अखेर निकाल माझ्या बाजूनं लागला. मी ढोलकऱ्याला निरोप पाठवला. त्या जमिनीवर प्रत्यक्ष गेले आणि गावकऱ्यांना समजावं म्हणून ढोल वाजवून जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला.

यानंतरही बारीकसारीक बाबतीत हा पांडू तापदायक व्हायचा. नंतरच्या काळात मात्र त्याची काही अडचणींच्या प्रसंगी मदत मिळवण्यात मला यश मिळालं.''

**पृष्ठे : १९६ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३रु. ● पोस्टेज : २०रु.**

## एक झलक....

# खाली जमीन वर आकाश

डॉ. सुनीलकुमार लवटे




*आम्हाला पहिलीला घडशी गुरुजी होते. बालमंदिरच्या बाई ननीताईचा ते पूर्ण 'व्यत्यास' होते, हे पहिल्या सलामीतच ते माझ्या लक्षात आलं. छडीशिवाय मी त्यांना कधी पाहिल्याचं आठवत नाही. शिकवायचे चांगले पण होते मोठे कठोर नि कर्मठ! आर्पणीची पोर ना तुम्ही? मागं बसा, असा त्यांनी सवयीने सोडलेला हुकूम अजून माझ्या कानी घुमतो आहे. दुसरीला ढवळे गुरुजी होते. ते मोठे प्रेमळ, साधे होते. मोठं झाल्यावरही आम्ही त्यांना शोधून काढून भेटायचो. ते घरी शेळ्या पाळायचे. साध्या घरात राहायचे. सारं साधं पण सांधणारं होतं त्यांचं! तिसरीला गोडसे गुरुजी होते. घोंगडे गल्लीत राहायचे. विजार, सदरा, टोपी असा पोषाख असायचा. तरतरीत नाक, उंच, शिडशिडीत, चेहरा लाल असायचा त्यांचा. 'थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा', 'चिऊताई चिऊताई, का ग तुझे डोळे ओले?' सारखी त्यांनी स्वत: नाचत, आम्हास बरोबर नाचायला लावून शिकवलेली गीते-ती आज ऐकली तरी माझा हात आपोआप कमरेवर जातो, पाय डोलायला लागतात, मन परत तेली मठात रुंजी घालू लागतं!*

*चार नंबरची ही शाळा, तिचा गल्लीभरचा नि आसपासचा सारा परिसर आम्हा आश्रमबंधूंचं नंदनवन झालं होतं! तेलाचे घाणे बघत फिरायचो. डोळे बंद करून बैल तेलघाणीभोवती फिरायचे. मोठं आश्चर्य वाटायचं? प्रत्येक घरासमोर शेणसडा, रांगोळी, बहुतेक*



**विचार, मन, बुद्धीचा कब्जा घेणाऱ्या सत्यकहाण्या.....**

*सर्व सकाळी शुचिर्भूत होऊन कपाळावर आडवी तीन बोटे गंध/ भस्म ओढणारे लिंगायत, स्वामी. रोज टाळ वाजवत येणारा वासुदेव. त्याची गाणी ऐकत आमची प्रभातफेरी दूरवर जात राहायची. कधी-कधी शाळेची प्रार्थना पण चुकायची. रोजच्या प्रार्थनेपेक्षा वासुदेवाची कहाणी, गाणी कानाला गोड वाटायची. तेल घाणीतली शेंगपेंड हा आमचा मधल्या सुट्टीतला त्यावेळचा ठरलेला फराळ असायचा. हा फराळ आवडायचा. नंतर कळलं की पेंड जनावरांसाठी असते. आमच्या आवडीचं रहस्य नंतर उलगडलं. आत्मभान आलं तेव्हा.*

*आम्ही शाळेत गेलेल्या वर्षीच पंढरपूरला महापूर आला होता (१९५६). शाळेस बरेच दिवस सुट्टी होती. वाईट वाटायचं. शाळा म्हणजे आश्रमातून सुटका असायची. आनंद वाटायचा. आश्रमातलं बंधन इथं नसायचं. गाई, म्हशी, घोडे, कोंबड्या, कुत्री, डुकरं (यांचीच संख्या अधिक असायची!), सारं पाहणं मोठं मोहक, मनोरंजक वाटायचं. शिवाय छोटी -छोटी घरं, कुटुंब, माणसांचे वेगवेगळे पोषाख (आमचे साऱ्यांचे कपडे एकाच ताग्यातले असायचे!) ते सारं डोळे भरून पाहावंसं वाटत राहायचं. आश्रमीय रुटीनच्या पलीकडच्या या विश्वानी मला नव्या नि वेगळ्या जगाचा पहिला चेहरा दाखवला होता. या काळातच मला मी आश्रमीय, अनाथ, निराधार असल्याची पहिली जाणीव अजाणतेपणी होत गेली होती. आपण इतरांसारखेच, मग आपणाला का हेटाळतात, फटकारतात, असं राहून राहून वाटायचं. आक्काला, करुणाला मी विचारायचो! मुलं का चिडवतात मला? त्या सांगायच्या, आपण मोठ्या आश्रमात राहतो ना, म्हणून! मग लक्षात आलं, ज्याला आपण 'घर' समजायचो तो 'आश्रम' होता. आपलं जगणं, आपलं जीवन जगापेक्षा न्यारं आहे हे आपसुक समजत, उमजत गेलं.*

**पृष्ठे : २१२ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना :११३रु. ● पोस्टेज :२०रु.**

## एक झलक....

# मयादा

जीन सॅसन

अनु. भारती पांडे



*मयादाची अस्वस्थता क्षणोक्षणी वाढतच होती. एक बुटकीशी, जेमतेम तिशीची असेल-नसेल अशी स्त्री धडपडत दुसऱ्या ध्वनिक्षेपकासमोर येऊन उभी राहिली. तिनं इराणी पद्धतीचा काळा अबाया पेहरला होता आणि त्याची टोकं हनुवटीखाली घट्ट धरून ठेवली होती. भयंकर भेदरलेल्या आणि संशयाच्या नजरेनं ती अली अल-माजीदकडे बघत होती.*

*तिचा मरणोन्मुख नवरा तिच्याकडे राग आणि अपेक्षाभंग अशा दोन्ही भावनांचं मिश्रण असलेल्या नजरेनं पाहात होता. अली मोठ्यानं पण खाजगी बोलावं तशा स्वरात त्या माणसाला म्हणाला, 'या रांडेला तू केव्हाच काडीमोड द्यायला हवा होतास. ती इराणी आहे. हे तुला माहीत होतं-तिचं एक हाड मोडून आत पाहिलं असतंस तर तुला आत घाण भरलेली दिसली असती.'*

*त्या माणसानं श्रोत्यांशी बोलायला सुरुवात केली. त्याला बोलताना फार कष्ट होत होते. असह्य दुःखानं त्याचा आवाज कापत होता. 'हे माझे हात पहा' त्यानं आपले हात पुढे धरले, 'माझी नखं कशी हातातून उपटून काढली गेली आहेत ते दिसतेय ना–दहा दिवस–रोज एक असं-सगळी नखं जाईपर्यंत–आणि माझ्या पायाची नखं'–त्यानं पाय उचलून दाखवण्याचा प्रयत्न केला, पण तो इतका अशक्त झाला होता की एका पायावर तोल सांभाळणं त्याला शक्यच नव्हतं. म्हणून त्यानं नुसतंच स्वतःच्या पायांकडे बोट दाखवलं. 'आता माझ्या पायांच्या बोटांना नखं नाहीत. आणखी दहा दिवस-रोज एक असं–*





*मग मला एका लहानशा खोलीत नेण्यात आलं आणि एका खुर्चीवर बसवण्यात आलं. माझे हात खुर्चीशी बांधण्यात आले. एक माणूस चिमटा घेऊन खोलीत आला आणि त्यानं एकामागोमाग एक असे माझे सर्व दात उपटले-अगदी सगळे दात जमिनीवर पडेपर्यंत–त्यानंतर मला ओढत नेऊन एका भट्टीमध्ये टाकण्यात आलं. ती भट्टी दोन माणसं राहू शकतील एवढी मोठी होती. त्या भट्टीमध्ये मला भाजून काढून मग कुत्र्यांसमोर टाकण्यात येणार आहे, असं मला सांगण्यात आलं. पण त्यांनी मला माझी कातडी जळेपर्यंत आणि माझे केस वितळून कातडीला चिकटेपर्यंतच त्या भट्टीत ठेवलं आणि मग बाहेर काढलं.' त्यानं आपल्या रक्ताळलेल्या हातांनी स्वतःच्या डोक्यावर थोपटल्यासारखं केलं. आपल्या बायकोकडे फार दुःखानं पाहात तो कसाबसा म्हणाला, 'आणि हे सगळं का घडलं? तर माझ्या बायकोनं रागाच्या भरात गुप्त पोलिसांना पत्र लिहून कळवलं की मी इस्लामिक पार्टीचा सदस्य आहे आणि ही पार्टी सरकारी अधिकाऱ्यांचे खून करण्याचे बेत आखत आहे.'*

*असा निर्दय सूड घेण्याची कल्पनाही तिला करवत नव्हती. तिच्या स्वतःच्या नवऱ्यानं आजपर्यंत अनेक वेळा तिची फार मोठी निराशा केली होती. पण त्याला काही इजा पोचेल असं काहीही काम तिच्या हातून कधीही घडलं नसतं. तिनं त्या स्त्रीचा चेहरा निरखून पाहिला. मयादाच्या मनात रागाची एक ठिणगी हळूहळू पेटू लागली. स्वतःच्या मुलांच्या वडिलांशी एखादी स्त्री असं कसं वागू शकते?*

*तो बिचारा माणूस आता रडू लागला होता. अली त्याला परोपरीनं समजावण्याचा प्रयत्न करत होता. एका चुकीच्या खोट्या आरोपावरून भोगाव्या लागलेल्या छळाची तुला भरपूर नुकसानभरपाई मिळणार आहे. एवढंच नव्हे, तर मी त्या अर्थाच्या कागदपत्रांवर सही सुद्धा केली आहे असं तो त्याला समजावून सांगत होता, पण त्या माणसाचं रडणं काही आवरत नव्हतं.*

**पृष्ठे : ३२० ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : ११८रु. ● पोस्टेज : २०रु.**

## एक झलक....

# द जॉय ऑफ कॅन्सर




अनुप कुमार
अनु. माधुरी शानभाग

*मी आसपास अनेक कर्करोगी पाहत होतो. रोगाने केलेल्या चढाईसमोर त्यानी हतबल होऊन शरणागती पत्करली होती. त्या रोगग्रस्त पेशींनी त्यांचे शरीरच पोखरून जिंकले नव्हते, तर त्यांचे मनोधैर्य, भावनिक बळ यावरही हल्ला चढवला होता. त्यांच्याकडे पाहिले की वाटे त्यांचा जीवनरस कर्करोगाने शोषून घेतला आहे, रोजचे व्यवहार नाइलाजाने पार पाडणे हेच एक कर्म त्यांच्यासाठी उरले आहे. रोगाशी लढण्याची इच्छाशक्ती ते हरवून बसले आहेत. त्यांच्या हालचालींतून, प्रतिक्रियांतून हे सहज नजरेला पडत होते. रुग्णालयाच्या विभागातून निरुद्देश, नि:सत्त्व चेहऱ्याने सावकाश पाय ओढत जाताना त्यांच्यासोबत कर्करोगाची काळी छाया सतत वावरत असल्याचे जाणवत असे. युद्धासाठी सज्ज असल्याची कोणतीही निशाणी तिथे दिसत नव्हती. या रोगाने शरीराबरोबर मनही व्यापलंय, मृत्यूच्या कल्पनेने त्यांचा ताबा घेतलाय, त्यांच्यासोबत असलेले नातेवाईक, स्नेही हेही त्याच भावनांची शिकार झाले आहेत, हे कळत होते.*

*मी युद्ध कसलेल्या सेनापतीप्रमाणे व्यूहरचना करून लढायचे ठरवले. त्यांच्या अस्तित्वामुळे मी हादरून गेलो आहे, हतबल झालो आहे असे त्यांना आणि स्वत:लाही वाटू द्यायचे नाही. माझे मनोधैर्य पाहून त्या पेशीच अस्वस्थ व्हायला हव्यात, गोंधळात पडायला हव्यात. कर्करोगाच्या उपचाराने शरीरमनाची होणारी अवस्था ही प्रत्यक्ष कर्करोगापेक्षा वाईट असते असे मी अनेकांकडून ऐकले होते. सर्व शक्ती एकवटून एक पाऊल रोगाच्या पुढे रोवायला हवे याचे भान कधीही सुटता कामा नये. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. केमोथेरपीच्या उपचारांनी कितीही वाईट अवस्था केली, वेदना दिल्या तरी ते उपचार मृत्यू देत नाहीत याची मला खात्री होती. त्यामुळे उपचारांनी उद्‌भवलेल्या लक्षणांना, आनुषंगिक परिणामांना घाबरायची गरज नाही, आपले मनोधैर्य, लढायची इच्छा कमकुवत होऊ द्यायची नाही, असे मी ठरवले.*



**विचार, मन, बुद्धीचा कब्जा घेणाऱ्या सत्यकहाण्या.....**

*मी जर माझे मनोबल टिकवू शकलो तरच युद्धासाठी आखलेले डावपेच प्रत्यक्षात आणू शकणार होतो. टॅक्सोटेट या औषधाचे थेंब माझ्या रक्तात प्रथम मिसळले. दुसरे दिवशी सुईतून सिस्प्लॅटीनने रक्तप्रवेश केला तेव्हा मी परिणामांना सज्ज होतो. नंतर माझ्या शरीराची रोगप्रतिकारशक्ती काळजी करावी इतकी खालावली. उलट्या, मळमळ यांचे प्रमाण अतोनात वाढले, भूक शून्य झाली. सक्तीने घशाखाली उतरवलेले अन्न पोटात टिकेनासे झाले. काही वेळा पोटात पाण्याचा थेंबही टिकत नसे. वजन झपाट्याने कमी झाले. केमोथेरपीचे माझ्या शरीरावर होणारे परिणाम पाहून नातेवाईक, मित्रमंडळी निराश झाली; पण मी मात्र जिद्द टिकवून ठेवली. निर्वाणीच्या वेदना होत तेव्हा मी माझ्या आयुष्यातले आनंदाचे क्षण आठवत मनाने त्या प्रसंगात, काळात फिरून येई. आनंददायी, आशावादी आठवणी अन् विचार, सृजनशील इच्छा मी मुद्दाम मनात घोळवत राही. मी सांगतो आहे तितके ते सोपे गेले नाही. काही वेळा अगदी असह्य होई; पण जसेजसे दिवस जात राहिले तसे माझ्या अंतर्मनात ऊर्जेचा फार मोठा साठा आहे याची माझी मलाच जाणीव झाली. मी इतक्या कणखर मनाचा असेन असे कधी वाटले नव्हते. तसा प्रसंगही उद्‌भवला नव्हता; पण कर्करोगाशी टक्कर देताना माझ्या सर्व अंत:प्रेरणा एकवटल्याचा अनुभव मला आला.*


**पृष्ठे : १९० ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३रु. ● पोस्टेज : २०रु.**

## एक झलक....

# फिटे अंधाराचे जाळे




भालचंद्र करमरकर


*प्रारंभी फार मजा येई. एखाद्या की वर बोट पडे ते जास्त जोरात– जोर एवढा की तेच अक्षर स्क्रीनवर एकदम ७/८ वेळा यायचं! आम्ही ते सारं हसून घालवायचो– त्याचं कारण ज्ञात होतं. वल्लरीच्या बोटाच्या हालचालींवर तिचा कंट्रोल होताच कुठे? अक्षरावर बोटाचा स्पर्श अबदार हळुवार हवा. अगदी रेशमी स्पर्श हवा. दाब नको ना. वल्लरीला मात्र त्याचा विषाद वाटे. कधी राग येई. क्वचित याच तिच्या वैगुण्यामुळे बोट एकदम दोन कीज (अक्षर) वर पडे. सारा तिच्या मूळ आजाराच्या कवित्वाचा परिणाम. कंट्रोल नसेच, अन् तिची पकड सुद्धा नियंत्रित नसे. जाम असे. सरावासाठी आम्ही आमचं बोट, सराव म्हणून तिचे हाती देत असू– अर्थात उजव्या हातीच. (डाव्याच्या बाबतीत अशक्यच!) ते ती पकडे आणि मग बळ लावून ते बोट सोडवून घ्यावे लागे. पण प्रदीर्घ कालाने का होईना सराव आणि व्यायाम यांच्या मदतीने पकड ढिली होत गेली. बोट पकडायलाही वेळ लागे अन् मूठ उघडायलाही वेळ लागे, कसरत करावी लागे. जोवर जुन्या मोडक्या कीबोर्डवर ती सराव करत होती तोवर हे ध्यानात यायचं कारण नसे. साधारणपणे वर्षभरानंतर तिला इंग्रजी टायपिंग चांगलं जमू लागलं. एका वेळी एकच की दाबली जाण्याचा प्रयत्न सरला तरी एकाच वेळी दोन कीज दाबताना फारच जिकीर होई. डाव्या हाताकडून सहकार्य फार अल्प होते. आरंभी कोणीतरी आम्ही अशावेळी शिफ्ट कीवर बोट ठेवत असू. ते तिच्या मनाविरुद्ध असे पण उपायच नव्हता असं करण्यावाचून. वल्लरीनं कळ काढायचं ठरवलं, मनावर घेतलं– तिला त्याची अपरिहार्यता समजलीच. कणाकणानं फरक पडत राहिला. आता डाव्या हाताच्या बोटानं शिफ्ट कीजवर बोट ठेवणं कसनुसं जमतं पण जिकीर आहेच. तीन चार वर्षांतही तो प्रश्न अजून पूर्णपणे सुटलेला नाहीच. जोवर इंग्रजी टायपिंगच केवळ करत होती तोवर डबल कीचा प्रश्न नव्हता. पण पुढे जास्त प्रगतीसाठी म्हणून मराठी लिपी लोड करून घेतली. श्रीलीपी आली अन् जास्तच मजा आली. सुमारे एक महिन्यात वल्लरीनं मराठी टायपिंगही जमवलं. मुख्य सांगायची गोष्ट म्हणजे की बोर्डवरच्या अक्षरांवर मराठी स्टिकर्स बसवणं आवश्यक होतं. म्हणून मी गावातल्या दुकानाला स्टीकर्ससाठी फोन करू लागलो तर वल्लरी म्हणाली, ''छे, छे, मुळीच स्टीकर्स नकोत मला.'' तिनं आग्रहच धरला तसा. तिची तिनंच खटपटीनं मराठी अक्षरे शोधली, सराव केला. आजही ती इंग्रजी कीबोर्डवरच इंग्रजीप्रमाणे मराठी टायपिंग करते. आता रोज एक पानभर मजकूर करणं शक्य आहे तिला. पण ती नियमितपणे काही ओळी रोज टायपिंग करते. सारं टायपिंग-इंग्रजी असो वा मराठी एका बोटानंच हं.*

*मराठी प्रमाणं तिनं आणखी एक अवघड काम जमवलं– करून दाखवलं. तिनं संस्कृतमध्ये मजकूर टाइप केला. संस्कृत तर खूपच अवघड– बिनचूक शुद्ध संस्कृत अजून जिकीरीचं. जोडाक्षरांचा सुकाळ. तीही अवघड. एकेका अक्षराला ६-७ वेळा कीचा वापर करावा लागतो. तसेच या संस्कृतात शिफ्ट कीचा खूपच वापर करावा लागतो. संस्कृत मजकूर पुष्कळ टाइप केल्याचा एक फायदा झाला तो असा की तिला मराठी टायपिंगचा खूप सराव झाला. आमचा प्रेस होता तिथं प्रश्नपत्रिका छपाई आमची स्पेशॅलिटी. त्यामुळं जुन्या प्रश्नपत्रिका होत्याच की आमच्याकडे, त्यातल्या संस्कृत प्रश्नपत्रिका तिनं सरावात टाइप केल्या.*

**पृष्ठे : १६४ ● किंमत : १२०रु. ● सभासदांना :९०रु. ● पोस्टेज :२०रु.**

# चाकाची खुर्ची

नसीमा हुरजूक




*एके दिवशी रात्रीचं जेवण लवकर तयार करून मिलिटरी महादेव बगीच्यात गेलो. लहान मुलांना तिथले प्राणी बघण्याची हौस होती. प्राण्यांजवळ जाण्याची वाट मंदिराच्या पुढून गेली होती. बागेत मी सावलीत एके ठिकाणी भेटायला आलेल्या मंडळींशी बोलत बसले आणि सर्व स्वयंसेवकांना मुलांना बाग फिरवून व प्राणी दाखवून आणण्याची विनंती केली. थोड्याच वेळात मी बसलेल्या ठिकाणी सर्वजण आले. वॉचमन मंदिरापुढून जाऊ देत नाही, पुढच्या बाजूनं वळसा घालून या, असं म्हणतो अशी तक्रार करू लागले. लहान लहान चालता न येणाऱ्या या मुलांना असं म्हणण्याचं धाडस केलेल्या त्या वॉचमनला समजावण्यासाठी मी स्वत:च गेले. समजून न घेता तो जोरजोरात बोलू लागला, ''तुमच्या पायात बूट आहेत, (कॅलिपरचे बूट) वाहनं आत नेण्यास सक्त मनाई आहे, ही पाटी दिसत असताना तुम्ही वाहनं (आमच्या व्हीलचेअर्स) कशी नेता? माझी नोकरी जाईल..'' वगैरे वगैरे. त्याच्या बोलण्याचा स्वर इतका अपमानास्पद होता, की त्याच्यापेक्षा मोठ्या आवाजात मी म्हणाले, ''तुझ्या अधिकाऱ्यांना जर तू या मुलांना अडवलंस हे कळलं, तर तुला नोकरीची काळजी करावी लागेल. उलट तू प्रेमानं यांना सहकार्य केलंस तर तुला बढती मिळेल. या चाकांच्या खुर्च्या वाहन नसून आमचे पाय आहेत. त्याशिवाय आम्ही आत जाऊ शकणार नाही.'' तर त्याचं उत्तर, ''इथूनच लांबून देवाचं दर्शन घ्या.'' माझं उत्तर होतं, ''देवाला बघण्यासाठी देवळात जाण्याची गरज आम्हाला नाही. या मुलामुलीत मला देव दिसतो. प्रयत्न केलास तर तुलाही दिसेल. आमची मुलं आली आहेत ती हरण, ससा, मोर वगैरे प्राणी बघायला. तुझे साहेब कोण आहेत? मी त्यांच्याशी बोलते. तू मुलांना जाऊ दे.'' तरी पण तो ऐकायला तयार झाला नाही. मग मी स्वयंसेवकांना सर्वप्रथम माझी व्हीलचेअर पुढे घ्यायला लावली. पाठोपाठ इतरांना यायला सांगितलं. तर त्यानं चक्क माझ्या व्हीलचेअरच्या हॅन्डरेस्टवर हात ठेवला. तो मला पुढे जाऊ देईना. आमचं उंच आवाजातलं बोलणं ऐकून आतापर्यंत बागेत आलेले सर्व लोक आमच्या भोवती जमले होते. आमच्या मुलांचे चेहरे पडले होते. ''दीदी! परत जाऊ या. तुम्ही त्रास करून घेऊ नका,'' असं ती सर्व मुलं म्हणू लागली. शकुंतला आणि डिसिल्व्हांचे चेहरेही सांगत होते, ''आमच्या गावात हा भांडण-तंटा नको...'' परंतु अपंगांना दिल्या जाणाऱ्या हीन वागणुकीनं माझ्या मनाला यातना होत होत्या. अपंगांना खरं तर आपलं अपंगत्व काही काळ विसरण्यासाठी असं बागेत किंवा सिनेमाला वगैरे जाणं किती गरजेचं असतं, हे या लोकांना कसं कळत नाही? यांचा मुलगा अपंग असता तर त्यांना हे असंच वाटलं असतं का? डोक्यात रागानं मुंग्या चावे घेत आहेत असं वाटत होतं. रागानं मी त्या वॉचमनला बजावलं, ''मुकाट्यानं माझ्या व्हीलचेअरवरचे हात काढ. मी तुझ्या हाताला धरून जर तो दूर केला, तर सर्व दुष्परिणामांची जबाबदारी तुझी असेल.'' जमलेल्या माणसांना उद्देशून म्हणाले, ''या मुलांना प्राणी बघू देत नाही हा वॉचमन. तुम्ही ही घटना मूकपणे फक्त पाहणारच का?'' माझं वाक्य संपायच्या आत अनेक जण पुढे आले आणि त्या वॉचमनला बाजूला घेऊन गेले. मुलांची इच्छा पूर्ण झाली. पण त्यातील आनंद नासला होता. प्रत्येक जण अस्वस्थ होता. न बोलता सर्वजण फिरले.*






**पृष्ठे : २३६ ● किंमत : १८०रु. ● सभासदांना : १३५रु. ● पोस्टेज : २०रु.**

## एक झलक....

# काळोखाची लेक



कॅथरीन दी जीजस

अनु. सरिता पदकी

*१२ जून : आज तीन वाजताच अंथरुणातून उठले. कारण झोप येत नसताना अंथरुणावर पडलं की मग भोवतालच्या दुःखांचेच विचार यायला लागतात. अंथरुणातून उठले न् लिहायला बसले. लिहीत असले की मला वाटतं की मी सोनेरी राजवाड्यात राहतेय, तो राजवाडा सूर्यप्रकाशात झगमगतोय, त्याच्या खिडक्या चांदीच्या आहेत आणि तावदानं हिऱ्यांची. माझ्या खिडकीतून फुलबाग दिसते. तिच्यात हजारो प्रकारची फुलं उमललेली असतात. आपण झोपडपट्टीत राहतोय हे विसरण्यासाठी मला अशी स्वप्नांची दुनिया उभी करावी लागते.*

*कॉफी करून घेतली अन् पाणी आणायला गेले. आभाळात चांदण्या चमचमत होत्या. चिखलात पचक्कन पाय पडला तेव्हा अगदी घाण वाटली.*

*माझ्या कल्पनेच्या किल्ल्यात मी राहते तेव्हाच मी खरी आनंदात असते.*

*व्हाल्डेमारनं ॲलेक्झांडरला कुदळीनं मारलं. काही बायका मधे पडल्या. ॲलेक्झांडरनं अगदी न डरता व्हाल्डेमारशी सामना दिला. झोपडपट्टीतल्या काही धीट बायकांनी हातातल्या केरसुण्यांनी न् चपलांनी व्हाल्डेमारला बडवून काढला, पण एखाद्याला कुणाची भीती वाटली की, तो जिंकतोच.*

*१३ जून : पोरांना कपडे घालून शाळेत पाठवून दिलं न् मी कागद शोधायला बाहेर पडले. कत्तलखान्याजवळच्या कचराकुंडीतले सॉसेजेस काढून खात होती एक तरणीताठी मुलगी. मी तिला म्हटलं, 'काहीतरी काम बघ. म्हणजे याच्यापेक्षा बरं अन्न खाशील!'*





*तिनं मला विचारलं, 'कागदं विकून पैसे मिळतात का?' मी म्हटलं, 'मिळतात की.' ती म्हणाली, 'मला पण पैसे मिळवायचेत अन् छानछान कपडे घालून मिरवायचंय.' ती पंधरा वर्षांची होती. या वयात जग किती सुंदर आहे असं वाटत असतं. याच वयात गुलाबाची कळी जणू उमलत असते. पुढेपुढे एकएक पाकळी गळून जाते न् फक्त काटे बाकी उरतात. मग ज्या कुणाला आयुष्याचा कंटाळा येतो, ते आत्महत्या करतात. कुणी चोऱ्या करतात. मी त्या पोरीच्या चेहऱ्याकडे पाहिलं. किती फोड उठलेले होते त्याच्यावर!*

*समुद्राच्या लाटा कशा वरवर चढतात तशा या किंमती वाढताहेत. येतेय ती लाट पहिलीपेक्षा जोरदारच आहे. लाटांशी कोण झगडू शकेल? ते फक्त शार्कनाच जमणार. सगळ्यात ताकदवान शार्क कोण ते माहीत आहे? त्याला खूप डोकं आहे. तो याच पृथ्वीवर राहतो. त्याचं नाव व्यापारी.*

*मुळे, १०० क्रुझीरो किलो मिळतात हे ऐकून काय भयंकर खुशी झाली मला! मी नाचले, गाणं म्हटलं, उड्या मारल्या अन् राजांचाही निवाडा करणाऱ्या देवाचे आभार मानले! कुठून आणू मी शंभर क्रुझीरो? जानेवारीत गुदामातून पाणी शिरलं अन् सगळं धान्य कुजून गेलं. छान झालं. स्वस्ताईनं धान्य विकण्याऐवजी हे व्यापारी किंमती वाढायची वाट पाहात बसतात. पोतीच्या-पोती तांदूळ व्यापाऱ्यांच्या नोकरांनी नदीत टाकलेला पाह्यलाय मी. सुकवलेली मासळी, चीज, मेवामिठाई, सगळं टाकलं. आम्ही इथं काम करून मरतो अन् उपाशी राहतो. माशांची मात्र काही काम न करता चंगळ झाली. असा हेवा वाटला मला त्यांचा!*

*आज मी वाचन केलं. रेसिफमधला आमदार नेई मरान्होच्या गुन्हेगारीबद्दल वाचत होते मी. इतर बायकांना ऐकू जावं म्हणून मोठ्यानं वाचलं. सगळ्या भयंकर भडकल्या अन् त्या खुन्याला शिव्या द्यायला लागल्या. त्याला शाप द्यायला लागल्या. झोपडपट्टीतल्या बायका काय काय शाप देतात ते मी पाह्यलेलं आहे.*

**पृष्ठे : १९८ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : ११३ रु. ● पोस्टेज : २० रु.**

## एक झलक....

# ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स



केन फोलेट

अनु. ज्योत्स्ना लेले

*रशिदने मनाशी विचार केला, 'क्रांतिकारी कमिटीच्या पुढाऱ्याची काय बरे मनोधारणा असेल? त्या नेत्याला बऱ्याच गोष्टी करावयाच्या असणार. त्याने नुकताच ह्या गावाचा ताबा घेतला आहे. पूर्वी कधीही तो सत्तेवर नव्हता. त्याला पराभूत सैन्यांशी जमवून घ्यायचे आहे. संशयित 'सावक' हेरांना पकडायचे आहे. त्यांची चौकशी करायची आहे. 'रशिद ह्या निष्कर्षापर्यंत आला की' नेत्याला कमी महत्त्वाच्या गोष्टींवर काट मारायची असावी. पळून जाणाऱ्या अमेरिकनांविषयी त्याला सहानुभूती नसणार व आता तेवढा वेळही नाही. त्याला निर्णय घ्यावाच लागला, तर प्रथम सर्वांना तुरुंगात टाकेल व नंतर सवडीने बघू, असा विचार करेल. म्हणून त्याने निर्णय त्यांच्यावर थोपण्याआधी, मलाच काहीतरी करावयास हवे.'*

*एका शाळेच्या खोलीकडे रशिदला जाण्यास सांगितले. तो नेता जमिनीवर बसला होता. उंच आणि दणकट होता. त्याच्या चेहऱ्यावर विजयाचा उन्माद होता, पण तो दमलेला, गांगरलेला, बेचैन वाटत होता.*

*रशिदबरोबरच्या माणसाने सांगितले, 'हा माणूस महाबादहून मुल्लाचे पत्र घेऊन आला आहे. त्याच्याबरोबर सहा अमेरिकन आहेत.'*

*रशिदला त्याने पाहिलेल्या एका सिनेमाची आठवण झाली. ह्या सिनेमामध्ये एक माणूस एका इमारतीच्या शस्त्रधारी चौकीदाराला तिथून जाण्याच्या परवान्याऐवजी स्वत:चे ड्रायव्हिंग लायसेन्स दाखवितो व निसटून जातो. जर तुमच्याकडे पुरेपूर आत्मविश्वास असला तर तुम्ही दुसऱ्याच्या संशयावर मात करू शकता.*





*रशिद म्हणाला, 'नाही, मी तेहरानच्या क्रांती कमिटीकडून आलोय. तेहरानमध्ये ५ ते ६ हजार अमेरिकन आहेत व आम्ही त्यांना घरी पाठवायाचे ठरविले आहे. विमानतळ बंद आहे म्हणून आम्ही त्यांना या रस्त्याने आणायचे ठरविले आहे. अर्थातच ह्या सगळ्या लोकांना नेण्यासाठी काही व्यवस्था करावी लागेल. हे कसे करायचे ते ठरवावे लागेल म्हणूनच मी आलोय. पण तुम्हांला पुष्कळ प्रश्न हाताळायचे आहेत, तेव्हा मी तुमच्या हाताखालच्या माणसांशी बोललो तर कसे?'*

*'बरं.' त्या नेत्यांनी संमती दर्शविली व बाहेर जाण्यास सांगितले.*

*धादांत खोटे सांगण्याचेही एक तंत्र असते. ते यशस्वी झाले. ते जसे खोलीबाहेर आले, तसे त्याच्या बरोबरच्या गृहस्थानेच सांगितले, 'मीच उपमुख्य नेता आहे.'*

*ते दुसऱ्या खोलीत गेले. तिथे ५/६ माणसे चहा पीत बसली होती. इतरांना ऐकू जावे, एवढ्या मोठ्याने रशिद त्या उपमुख्य नेत्याला म्हणाला, 'ह्या अमेरिकनांना घरी जायचंय आणि त्यांच्या मुलांबाळांना भेटायचं आहे. त्यांची ब्याद टळणार म्हणून आम्हीही खुश आहोत. आम्हीही त्यांच्याशी चांगले वागतोय. म्हणजे नव्या राजवटीबद्दल त्यांचेही चांगले मत होईल.'*

*उपमुख्य नेत्याने विचारले, 'तुझ्याबरोबर आता अमेरिकन लोक कसे?'*

*'ट्रायल म्हणून. ह्या प्रकारे जाताना, आम्हांला कोणत्या अडचणी येतात हे समजेल.'*

*'पण तू त्यांना सीमा ओलांडून देणार?' उपमुख्य नेत्याने विचारले.*

*'हो. ती चांगली माणसे आहेत. त्यांनी आपल्या देशाच्या विरोधात कोणतीच गोष्ट केलेली नाही. त्यांनाही बायका-मुले आहेत. त्यांतल्या एकाचे मूल तिथे इस्पितळात मरणाच्या दारात आहे. म्हणूनच तेहरानच्या क्रांतिकारी कमिटीने मला त्यांना सीमेच्या पलीकडे पोहोचविण्यास सांगितले आहे.'*


**पृष्ठे : ३५६ ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १८८रु. ● पोस्टेज : २५रु.**

## एक झलक....

# काबुलीवाल्याची बंगाली बायको

सुस्मिता बॅनर्जी

अनु. मृणालिनी गडकरी



*जाँबाज फार वाईट वागला होता. एक तर मला एकटीला इथं ठेवून हिंदुस्तानात निघून गेला आणि काल तो फोनवर माझ्याशी बोललाही नव्हता. मी मोठ्या मुश्किलीनं पाकिस्तानात येऊन पोहोचल्याचं साओमदनं कळवल्यावर त्यानं माझ्याशी बोलायला नको होतं?*

*आंघोळ उरकून स्वच्छ कपडे घातले. तेवढ्यात एक गृहस्थ पंधरा-सोळा वर्षांच्या मुलीला घेऊन आत आले. मी डोक्यावर दुपट्टा वगैरे घेतला नव्हता. पण त्यांना पाहताच दुपट्टा डोक्यावरून ओढून घेतला. साओमदनं त्या गृहस्थांशी माझी ओळख करून दिली. 'साहेब कामाल, हे माझे मामा आणि ही मामेबहीण. तुमच्याबद्दल बरंच ऐकलं होतं त्यांनी. म्हणून भेटायला आलेत.'*

*ते गृहस्थ मला 'मी पुन्हा अफगाणिस्तानात जावं,' हे सांगायला आलेत हे मी लगेच ओळखलें. ते म्हणाले, 'बेटी, तू जे केलंस ते बरं नव्हे.'*

*'काय बरं नव्हे? अफगाणिस्तानातून निघून आले ते?'*

*'हो. त्यामुळे तुझं नाव बद्दू होईल.' एखाद्या जख्खड म्हाताऱ्यासारखी ते मान हलवत होते.*

*'होऊ दे. नाव बद्दू होईल ह्या भीतीपोटी मी माझं आयुष्य बरबाद करणार नाही.' मी आत्मविश्वासानं म्हणाले.*

*'आयुष्य कशाला बरबाद होईल! तिकडे सगळे किती माया करतात तुझ्यावर, बेटी!'*

*'माया करतात! प्रेम, माया ह्याचा अर्थ आपल्याला समजतो ना? एखाद्याला दोनदा खायला दिलं की झालं? ह्यालाच प्रेम म्हणायचं? माया म्हणायचं? डोकं टेकायला जागा दिली की कर्तव्य संपलं? बायकोला भावांपाशी सोडून निघून जाणं हेच का नवऱ्याचं कर्तव्य?'*

*'नाही. नाही. तसं कसं! घरात कमावणारं दुसरं कोणी नाही म्हणून जाँबाजला हिंदुस्तानात जावं लागलंय. पण त्यानं तुझा अपमान कधीच केला नाही.'*

*'आणखी काय बाकी राह्यलाय अपमान व्हायचा? त्याचे भाऊ रोज मला त्रास देतात. मारझोड करतात. घाणेरड्या शिव्या देतात. माझ्या आईवडिलांनाही शिव्या देतात. माझ्या डोळ्यांदेखत आपल्या बायकांना चांगलंचुंगलं खायला घालतात आणि माझ्या नशिबी मात्र रोटी आणि बटाट्याची भाजी. त्यांच्या बायका मला एखाद्या कुत्र्यासारखं वागवतात. जाँबाजच्या भावांच्या भीतीनं मी खोलीत उंदरासारखी लपून बसते. थंडीत गारठून मरते तरी मला शेकोटीसाठी पुरेशी लाकडंसुद्धा देत नाहीत. मुशाखानची बायको मला मोजून चार लाकडं देते. कालाखानची बायको तर द्राक्षंही मोजून देते. मी मळ्यात जाऊन द्राक्षं तोडू नये म्हणून त्यांनी द्राक्षाच्या बागेला कुलूप घातलंय.'*

*अफगाणिस्तानात ह्याशिवाय जास्त काही होत नाही म्हणून ह्याच गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.*

*'समजतं मला सगळं. तरीही तू पुन्हा तुझ्या घरी जावं हे चांगलं.' ते मामा माझ्याकडे रोखून पाहात म्हणाले.*

*'आपलं म्हणणं मी कानानं ऐकलं. मनानं नाही.'*

*'बरं, आता तू विश्रांती घे. मी येईन पुन्हा. सध्या तुझ्या सोबतीला ह्या माझ्या पोरीला ठेवून जातो.'*

*ते गेले. मी इथूनही पळून जायचं ठरवलं. नाहीतर हे लोक मला बळजबरीनं पुन्हा अफगाणिस्तानात पाठवायला कमी करणार नाहीत. मग पुन्हा तोच भयंकर देश. तीच शरीअत, मूलतत्त्ववादी सरकार आणि तेच भयंकर तालिबान.*

**पृष्ठे : १५६ ● किंमत : १००रु. ● सभासदांना :७५रु. ● पोस्टेज :२०रु.**

# बालनगरी

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **बुद्धिमान सिंह** | **१०१** |
| **बोकडाची फसगत** | **१०४** |




## बुद्धिमान सिंह

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. त्याकाळी जंगलात राहणारे सर्व प्राणी मिळून मिसळून राहत. सिंह हा जंगलाचा राजा होता. इतर सर्व प्राणी त्याच्या आज्ञेप्रमाणे वागत.

एकदा सिंहाने सर्व प्राण्यांची सभा भरवली. सभेत तो म्हणाला, ''मित्रांनो, लवकर मनुष्यप्राण्याचे आपल्यावर आक्रमण होणार आहे. आपल्यापैकी काही जणांचा बळी घेऊन मनुष्य आपल्या कातड्यांचा, हाडाचा उपयोग करून घेतो. आपला हकनाक जीव जातो. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येऊन मनुष्यांविरुद्ध लढले पाहिजे, आपण संघटित राहिलो तरच वाचू शकतो.''

तेवढ्यात अस्वल उठून म्हणाले, ''महाराज, मनुष्याचा प्रतिकार करण्यासाठी आपल्याकडे काही योजना आहेत

का?''

सिंह म्हणाला, ''अरे, त्यासाठीच मी सर्वांना इथे बोलावले आहे. प्रत्येकाची जबाबदारी महत्त्वाची आहे.''

त्यानंतर कोल्ह्याकडे वळून सिंह म्हणाला, ''तू सर्व प्राण्यांमध्ये अत्यंत धूर्त आणि चतुर आहेस. शत्रूशी कसे लढावे याबाबत आपली योजना कशी असावी, याविषयी तू मला मदत करशील.''

अस्वलाकडे नजर वळवून सिंह म्हणाला, ''तू खूप दणकट आणि चपळ आहेस. एखाद्या मनुष्याला गपकन् पकडून त्याच्याजवळची सर्व शस्त्रास्त्रे काढून घेण्याचे काम तुझे असेल.''

त्यानंतर हत्तीकडे पाहून सिंह म्हणाला, तुझे शरीर आणि तुझी ताकद प्रचंड आहे. तुला लढाईसोबतच आवश्यक अशा गोष्टींची ने-आण करावी लागेल. तुझ्या लांबच लांब सोंडेचा वाहतुकीसाठी सहज उपयोग होईल.''



माकड बाजूलाच बसले होते, त्याला सिंह म्हणाला, ''तू झाडावर सरासरा चढू शकतोस. उड्या मारू शकतोस तेव्हा शत्रूवर नजर ठेवणाऱ्या हेराचे काम तुला करावे लागेल.''

अशी सर्वांच्या कामाची विभागणी झाल्यावर केवळ गाढव आणि ससाच उरला. सर्व प्राणी म्हणाले, ''महाराज, ही गाढवं खूप बेअक्कल असतात आणि हे ससे म्हणजे पाळीव प्राणीच! यांचा लढाईत काय उपयोग होणार?''

सर्व प्राणी गाढव आणि सशाची चेष्टा करू लागले. तेवढ्यात सिंहाने सर्वांना दटावले आणि म्हणाला, ''लढाईमध्ये निरुपयोगी असा कोणीही नसतो. गाढवाला आणि सशालाही उपयुक्त काम देण्यात येईल. गाढव हा कोणत्याही प्राण्यापेक्षा अधिक मोठ्याने ओरडू शकतो म्हणून जंगलातील सर्व प्राण्यांना सावध करण्यासाठी 'धोक्याची घंटा' म्हणून गाढवाचा उपयोग होईल. आणि सशाकडे वळून सिंह म्हणाला, ''ससा वेगाने पळू शकतो त्यामुळे लढाईच्या प्रसंगी आवश्यक गोष्टी पुरविण्यासाठी सशाचा उपयोग होऊ शकेल.''

''लक्षात घ्या, जगात निरुपयोगी म्हणून कोणीही जन्माला येत नसतो. प्रत्येकाच्या क्षमतेप्रमाणे काम दिल्यास सर्वजण उपयुक्त ठरू शकतात.'' सिंहाच्या या अर्थपूर्ण सल्ल्यावर सर्व प्राण्यांना 'सिंह आपला राजा का आहे?' हे कळून चुकले.

❐

## बोकडाची फसगत

एके दिवशी एक कोल्हा चुकून विहिरीत पडला. विहिरीत पाणी कमी होते म्हणून तो वाचला पण त्याला विहिरीबाहेर येताच येईना. बराच प्रयत्न करूनही काही उपयोग झाला नाही.

थोड्या वेळाने एक बोकड त्या विहिरीजवळ आले. विहिरीत काहीतरी खुसपूस ऐकू आली त्यामुळे बोकडाने डोकावून पाहिले. बोकडाला कोल्हा दिसला आणि कोल्ह्यानेही बोकडाकडे पाहिले. बोकड दिसल्यावर त्या धूर्त कोल्ह्याला हायसे वाटले. आपण या बोकडाचा उपयोग करून विहिरीबाहेर येऊ असे त्याने ठरवले. तेवढ्यात बोकड म्हणाला, ''काय कोल्होबा... विहिरीत कसे काय पडलात...?''

'मी... आणि पडलो...! अरे या विहिरीचं पाणी पिण्यासाठी उतरलोय... तुला माहितीये, किती गोड पाणी आहे या विहिरीचं...!'' कोल्हा धूर्तपणे म्हणाला.

''गोड पाणी आहे विहिरीचं...?'' बोकडाची उत्सुकता वाढली.

''अरे मग... तू स्वतः बघ किती सुंदर चव आहे या पाण्याची...!'' कोल्ह्याने आमीष दाखवले.

मग तहानलेल्या बोकडाने मागचा पुढचा विचार न करता सरळ त्या विहिरीत उडी मारली आणि पाणी पिऊन बघितले.



''तू म्हणतोस तशी चव आहे पाण्याला, पण फारसे गोडबीड नाही.'' बोकड बिचारा सरळ मनाने म्हणाला.

''पण आता विहिरीबाहेर निघायचं कसं...? बोकडाने कोल्ह्याला विचारले.

''अरे सोप्पयं... तुझ्या मोठ्या शिंगांवर उभा राहून मी आधी चढून जातो मग तुला लगेच वर ओढतो.'' कोल्हा म्हणाला.

बोकड बिचारे 'हो' म्हणाले आणि त्याच्या शिंगावर चढून कोल्हा सहजपणे विहिरीबाहेर आला.


विहिरीबाहेर आल्यावर इकडेतिकडे न बघता कोल्ह्याने जंगलाकडे जी धूम ठोकली, तो पुन्हा विहिरीकडे आलाच नाही.

इकडे बिचारा बोकड फसवले गेल्याचे समजल्यावर ओरडत बसला तो कायमचाच.

**तात्पर्य : कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मागचा पुढचा विचार करणे हे अधिक सोयीस्कर असते.**

❐

## ओळखा पाहू



मूळ भारतीय वंशाचे हे ब्रिटिश लेखक.

जागतिक साहित्यविश्वात यांना मानाचे स्थान आहे.

'सॅटॅनिक व्हर्सेस' ही वादग्रस्त कादंबरी लिहिल्यामुळे 'इराण' या देशाने यांची हत्या करण्याचा फतवा काढला आहे.

यांची ओळख पटवा व आम्हाला पत्राद्वारे कळवा.

ऑगस्ट अंकातील 'ओळखा पाहू' चे उत्तर

**विख्यात भारतीय लेखक - श्री. शशी थरूर**

अचूक उत्तर पाठवणारे वाचक

**सुधाकर भुतकर-रायगड, रफीक सतार, भगवान बनसोडे-नांदेड**




## ओळख अष्टविनायकांची

श्री गणपती हे आराध्य दैवत. सर्वांचंच आवडतं. आपल्या महाराष्ट्रात तर आठ विशेष गणपतींचं दर्शन महत्त्वाचं मानतात. हे अष्टविनायक त्यांची ठिकाणं आणि नावं :

| गाव | गणपतीचे नाव |
|---|---|
| रांजणगाव | महागणपती |
| पाली | बल्लाळेश्वर |
| महड | वरदविनायक |
| मोरगाव | मोरेश्वर |
| सिद्धटेक | सिद्धीविनायक |
| लेण्याद्री | गिरीजात्मक |
| ओझर | विघ्नेश्वर |
| थेऊर | चिंतामणी |

<u>**कोडं क्र : ३**</u>




**'अ' अक्षरातून सुरू होणारे शब्द -**

१) एक मुलाचे नाव किंवा सूर्य
२) एक फटाका
३) शेवट, अंत
४) जे खरे नाही ते
५) राक्षस, दानव
६) पूजा
७) पुष्कळ, खूप
८) वारा, पवन



# एक पान...... आणि एकच ओळ.....
# पहा ही पुस्तकांची गंमत.....

सौ
र
मा
लि
का

कोळी

सूर्य


मधमाशा

चंद्र

मुंग्या

पृथ्वी

खार





**किंमत प्रत्येकी ३०रु.**
**पोस्टेज एकत्रित २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# हे पहा करून...

बालमित्रांनो, काड्या संपलेली आगपेटी आपण फेकून देतो. पण या रिकाम्या आगपेटीचा ‘आगगाडी’ म्हणूनही उपयोग होवू शकतो...


कसे... प्रत्यक्ष करूनच पहा...




यासाठी लागेल फक्त एक रिकामी आगपेटी आणि दोन अडीच फूट लांबीची दोरी (सलगपणे सांधलेली).

१. प्रथम रिकाम्या आगपेटीला चित्रात दर्शवल्याप्रमाणे दोन आरपार बारीक छिद्रे पाडा...






२. दोन्ही छिद्रांमधून दोरी घाला आणि दोरीला सलगपणे सांधा.

३. चित्रात दर्शवल्याप्रमाणे दोरीच्या साहाय्याने चालणारी आगपेटीची आगगाडी तुम्हालाही बनवता येईल.

चला तर मग लागा कामाला...

## कोडं क्र : २ चे उत्तर

| | | |
|---|---|---|
| १) सनई | ८) जलतरंग | १५) तुतारी |
| २) बोंगो | ९) झांज | १६) पियानो |
| ३) संतुर | १०) ड्रम | १७) बासरी |
| ४) मेंडोलिन | ११) गिटार | १८) व्हायोलिन |
| ५) हार्मोनियम | १२) ढोलक | १९) तंबोरा |
| ६) तबला | १३) संबळ | २०) टाळ |
| ७) मृदंग | १४) सतार | |

## बाल / कुमार वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | २५ |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | २५ |
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | २५ |
| बिरबलाचे चातुर्य | निर्मला सारडा | २५ |
| बिरबलाच्या रोचक गोष्टी | निर्मला सारडा | २५ |
| शेखचिल्लीचे किस्से | निर्मला सारडा | २५ |
| तेनालीरामचे चातुर्य | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीरामच्या रोचक गोष्टी | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीराम विनोदवीर | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीरामच्या मनोरंजक कथा | मंजूषा आमडेकर | २५ |
| मन्नो २००५ | मंजूषा आमडेकर | २५ |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## चित्रमय रंगतदार कथा

| | | |
|---|---|---|
| चतूर बोकोबा आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| नशीबवान शेखर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा | चारुता पुराणिक | ३० |
| निद्राराणी आणि इतर कथा | विजया देशपांडे | ३० |
| जादूचं खीरपात्र आणि इतर कथा | अरुंधती पंडित | ३० |
| टिंबक टू आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| गम्मत गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| धमाल गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| मजेदार लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| आदर्श लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| राजाचं गुपित आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| गंपू चिंपू आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| मैत्रीचे मोल आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| सिंड्रेला आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| खरा मित्र आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |

| | | |
|---|---|---|
| आजीचं घर आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| पैज जिंकली छोट्याने आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| आजीचा धडा आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| बदकाचा बूट आणि इतर गोष्टी | उज्ज्वला केळकर | ३० |
| गर्विष्ठ सूर्यफूल आणि इतर कथा | उज्ज्वला केळकर | ३० |

## संस्कारक्षम कथा

| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | वि. स. खांडेकर | ३० |
| यज्ञकुंड | वि. स. खांडेकर | ३० |
| मध्यरात्र | वि. स. खांडेकर | ४० |
| घरटे | वि. स. खांडेकर | ३० |
| अस्थी | वि. स. खांडेकर | ३० |
| राजा हरिश्चन्द्र | संपादक : अनंत पै | २० |
| अभिमन्यू | संपादक : अनंत पै | २० |
| विक्रमादित्य | संपादक : अनंत पै | २० |
| छत्रपती शिवाजी | संपादक : अनंत पै | २० |
| भीष्म | संपादक : अनंत पै | २० |
| पृथ्वीराज चौहान | संपादक : अनंत पै | २० |
| सम्राट अशोक | संपादक : अनंत पै | २० |
| राणा प्रताप | संपादक : अनंत पै | २० |
| प्रल्हाद | संपादक : अनंत पै | २५ |
| श्रीरामाची कथा | संपादक : अनंत पै | २५ |
| कर्ण | संपादक : अनंत पै | २५ |
| चाणक्य | संपादक : अनंत पै | २५ |

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**